# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

# पश्चिम महाराष्ट्रातील भटके गोसावी समाजाच्या सामाजिक - आर्थिक परिस्थितीचा अभ्यास



**प्रमुख मार्गदर्शक**

**श्री.धम्मज्योती गजभिये**

महासंचालक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे

सन २०२१

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
## (महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतगर्त एक स्वायत्त संस्था आहे. समता आणि सामाजिक न्याय यावर आधारित सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांच्या विकासासाठी ही संस्था कार्यरत आहे. सदर संस्था दि. २२ डिसेंबर ७९७८ रोजी मुंबई येथे शासनाच्या सांस्कृतिक व्यवहार, क्रीडा आणि पर्यटन विभागाद्वारे " डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता विचारपीठ " या नावाने स्थापित झाली. सन १९७८ साली संस्था पुणे येथे स्थलांतर झाली व तिला सन २००८ या वर्षी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे' या नावाने स्वायत्त दर्जा प्राप्त झाला.

**संस्थेची प्रमुख उद्दिष्ट्ये :-**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समतेचे विचार जनसामन्यात रुजवणे
- महाराष्ट्रातील मागासलेल्या व वंचित जाती विशेषत:अनुसूचित जातींच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधन करून शासनास धोरणात्मक शिफारसी करणे
- प्रशिक्षण व कौशल्य विकास या माध्यमातून विविध उपक्रम राबवणे
- सामाजिक न्याय विभागातील विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्या क्षमता वृद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे
- समता, सामाजिक न्याय, बंधुत्व, राष्ट्रीय एकात्मता, समाजामध्ये परस्पर सद् भावनावृद्धी, जातीय विद्वेषाचे उच्चाटन, वैज्ञानिक जाणीव इत्यादी उद्देशाने प्रशिक्षण, संमेलने, व्याख्याने, चर्चासत्र, परिसंवाद असे कार्यक्रम आयोजित करणे. तसेच याविषयी वाचन साहित्य, संशोधनात्मक अहवाल, प्रबंध, नियतकालिके इत्यादी प्रकाशित करणे.
- शासनाने वेळोवेळी सोपवलेल्या योजना व कामे पार पाडणे

उपरोक्त उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी बार्टी अंतर्गत संशोधन, मूल्यमापन, प्रशिक्षण, कौशल्य विकास, अधिछात्रवृत्ती व शिष्यवृत्ती, समतादूत, स्पर्धा परीक्षा, प्रकाशन व प्रसिद्धी असे विविध विभाग कार्यरत आहेत. तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी, ग्रंथालय, विशेष कक्ष, महिला सक्षमीकरण, सफाई कामगारांच्या मुला-मुलींची निवासी शाळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड अशा विविध प्रकल्पांच्या माध्यमातून बार्टी संस्था मोलाची कामगिरी बजावीत आहे.

# पश्चिम महाराष्ट्रातील भटके गोसावी समाजाच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास



**प्रमुख मार्गदर्शक**

**श्री. धम्मज्योती गजभिये,**

**महासंचालक**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

**(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)**

**सन-२०२१**

# पश्चिम महाराष्ट्रातील भटके गोसावी समाजाच्या - सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास

## अहवाल

**विशेष योगदान**

श्री. उमेश घुले (प्राध्यापक तथा निबंधक)
श्री. मेघराज भाते (विभाग प्रमुख)

**संशोधन अधिकारी**

श्रीमती. शुभांगी सुतार
श्रीमती. शिल्पा शिवणकर - कांबळे
श्रीमती. मेघाराणी गायकवाड
श्रीमती. प्रमोदिनी नाईक

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे**

# प्रास्ताविक

भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटना दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी लिहून पूर्ण केली आणि दिनांक २६ जानेवारी १९५० ला संविधान भारतात लागू करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतेच्या कल्याणासाठी संविधानात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्वांचा समावेश केला आहे. भारतीय संविधानाच्या कलम १५ नुसार धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थळ या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंध, कलम १७ नुसार अस्पृश्यता निवारण करणे, व कलम ४६ नुसार अनुसूचित जाती, जमाती व इतर दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबधांना चालना देणेबाबत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांची स्वायत्त संस्था असून विशेषतः अनुसूचित जातींच्या विकासासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यासाठी कटीबद्ध आहे. बार्टी संस्थेमार्फत समाजातील वंचित घटकांचे संशोधन करून शासनास धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शिफारशी करण्यात येतात. गोसावी समाज महाराष्ट्र राज्याच्या भटक्या जमाती-ब मध्ये क्र. १ वर नमूद आहे.

अखिल भारतीय भटके गोसावी समाज महासंघ भारत, सांगली यांनी दिनांक १७.०१.२०१७ अन्वये तत्कालीन मा. मंत्री महसूल व मदत पुनर्वसन, सावर्जनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून ) यांना सादर केलेल्या निवेदनात भटके गोसावी समाजाचे संशोधन होऊन आदिवासी समाजाच्या सवलती मिळण्याबाबतची मागणी केली होती. तद्नंतर बार्टी संस्थेमार्फत गोसावी समाजाच्या दोन चर्चासत्राचे आयोजन करून त्यांच्या मागण्या तसेच सर्वेक्षणासाठीची प्रश्नावली यांची चर्चा करण्यात आली. याअनुषंगाने बार्टी संस्थेमार्फत या समाजाचे सामाजिक, आर्थिक सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेतले. यामध्ये पुणे व सांगली या दोन जिल्ह्यातून १५८५ कुटुंबांतून माहिती गोळा करण्यात आली.

सदर संशोधन अभ्यासामध्ये भटके गोसावी समाजाच्या सद्यस्थितीची विस्तृत मांडणी केली आहे. यामध्ये प्रामुख्याने भटके गोसावी समाजाची शैक्षणिक स्थिती, आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे आढळून आले. समाज भटकंती करत असल्यामुळे राहण्याचे स्थान निश्चित नाही. समाज भूमिहीन असल्याचे

आढळून आले आहे. या समाजाकडे १९६१ पूर्वीचा दाखला नसल्यामुळे शासकीय तसेच शैक्षणिक इत्यादी योजनांचा लाभ घेता येत नाही.

सदर माहिती गोसावी समाजाच्या जीवन पद्धती, शैक्षणिक, आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकणारी असून या संशोधन अहवालाचा उपयोग शासन व गोसावी समाज व भावी संशोधकांना नक्की होईल, याचा मला विश्वास वाटतो.

वरील सर्व बाबींचा विचार करता या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनास अहवालाद्वारे धोरणात्मक शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. या शिफारशीच्या अनुषंगाने गोसावी समाजाच्या हितासाठी समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सकारात्मक निर्णय घेईल, अशी मला पूर्ण खात्री आहे.

**धम्मज्योती गजभिये**
**महासंचालक**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था, पुणे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | तक्ते तपशील | I ते III |
| | गोषवारा | IV ते XI |
| प्रकरण १ | : प्रस्तावना | १ ते १४ |
| प्रकरण २ | : संशोधन पद्धती | १५ ते १८ |
| प्रकरण ३ | : संदर्भ साहित्याचा आढावा | १९ ते २३ |
| प्रकरण ४ | : गोसावी समाजाची सामाजिक स्थिती | २४ ते ६१ |
| प्रकरण ५ | : गोसावी समाजाची आर्थिक स्थिती | ६२ ते ७४ |
| प्रकरण ६ | : चर्चासत्र (लक्ष्य गट चर्चा) गोसावी समाजाच्या प्रतिनिधी यांनी दिलेली माहिती | ७५ ते ९३ |
| प्रकरण ७ | : निष्कर्ष व शिफारशी | ९४ ते ९९ |
| | संदर्भसूची | १०० ते १०१ |
| परिशिष्ट- १ | : गोसावी समाजाची अभ्यासाची 'कुटुंब मुलाखत अनुसूची' | |
| परिशिष्ट- २ | : महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती , भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास वर्गीयांची यादी | |

# तक्ते तपशील

## गोसावी समाजाची सामाजिक स्थिती

तक्ता क्र. १ उत्तरदात्याचे वय
तक्ता क्र. २ उत्तरदात्याची वैवाहिक स्थिती
तक्ता क्र. ३ उत्तरदात्याचा धर्म
तक्ता क्र. ४ उत्तरदात्याची जात
तक्ता क्र. ५ उत्तरदात्याचे शिक्षण
तक्ता क्र. ६ कटुंबातील सदस्यांचे वय
तक्ता क्र. ७ कटुंबातील सदस्यांची वैवाहिक स्थिती
तक्ता क्र. ८ कटुंबातील सदस्यांचे शिक्षण
तक्ता क्र. ९ कटुंबातील सदस्यांचे बेरोजगारी
तक्ता क्र. १० बोलीभाषा
तक्ता क्र. ११. स्थलांतरित होण्याचे प्रमाण
तक्ता क्र. १२ स्थलांतराचे कारण व त्याचे प्रमाण
तक्ता क्र. १३ स्थलांतर
तक्ता क्र. १४ स्थायिक  कालावधीचे प्रमाण
तक्ता क्र. १५ व्यसनाधीनता
तक्ता क्र. १६ इतर जातीय समारंभात सहभाग
तक्ता क्र. १७ इतर जातीय समारंभात सहभागी न होण्याची कारणे
तक्ता क्र. १८ इतरांचा सहभाग
तक्ता क्र. १९  इतर समुहाचे या समुहाच्या समारंभात सहभागी न होण्याचे कारणे
तक्ता क्र. २० इतर समुहाकडून मिळणारी वागणूक
तक्ता क्र. २१ समुहाने राहणे
तक्ता क्र. २२ हुंडा पद्धत
तक्ता क्र. २३ हुंडा देणेबाबत स्थिती
तक्ता क्र. २४ रोटी-बेटी व्यवहार
तक्ता क्र. २५ जात पंचायत
तक्ता क्र. २६ जात पंचायतींकडून सोडविल्या जाणाऱ्या समस्या
तक्ता क्र. २७ जात पंचायतींकडून देण्यात येणाऱ्या शिक्षा
तक्ता क्र. २८ शासकीय योजनेची माहिती
तक्ता क्र. २९ महिती असणाऱ्या योजना
तक्ता क्र. ३० योजनेचा लाभ न मिळाल्याची कारने व त्याचे प्रमाण
तक्ता क्र. ३१ जिल्हा निहाय संघटनेचे प्रमाण

तक्ता क्र. ३२ संघटनेकडून मदत करण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ३३ संघटनेकडून मदतीसाठी मागणी करण्यात येण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ३४ कुटुंबातील सदस्यांचे जात प्रमाणपत्र असण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ३५ कुटुंबातील सदस्यांकडे आधार कार्ड असण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ३६ कुटुंबातील सदस्यांकडे मतदान कार्ड असण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ३७ बाबा-बुवा यांना मानण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ३८ जिल्हा निहाय धार्मिक विधीसाठी प्राणी बलिदान देण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ३९ पत्रिका जुळवून विवाहाची स्थिती
तक्ता क्र. ४० जिल्हा निहाय जादूटोणा मानणाऱ्याचे प्रमाण
तक्ता क्र. ४१ जादूटोणा केला आहे का?
तक्ता क्र. ४२ अंगात येणाऱ्याचे प्रमाण
तक्ता क्र. ४३ मासिक पाळी असता बाजूला बसविणे
तक्ता क्र. ४४ स्त्रीयांना जटा
तक्ता क्र. ४५ मुलीचे लग्नाच्या वयाची स्थिती
तक्ता क्र. ४६ भिक्षा मानणाऱ्याचे प्रमाण
तक्ता क्र. ४७ बाळंतपणात विटाळ मानणे
तक्ता क्र. ४८ मुल जन्माच्या ५ व्या दिवशी सटवाईची पूजा करणे
तक्ता क्र. ४९ आजारी पडल्यास उपचाराबाबत स्थिती
तक्ता क्र. ५० कुटुंबात दिर्घकालीन आजाराबाबत स्थिती
तक्ता क्र. ५१ गोवर आजार पाळणाऱ्याचे प्रमाण
तक्ता क्र. ५२ इतर समाजाची दहशत
तक्ता क्र. ५३ दहशत असलेल्या समुहाचे नाव
तक्ता क्र. ५४ क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ कायद्याविषयी माहिती
तक्ता क्र. ५५ क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ च्या अंतर्गत गुन्हा दाखल
तक्ता क्र. ५६ यात्रामध्ये जाण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ५७ सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रमाण
तक्ता क्र. ५८ बाळाच्या जन्मापूर्वी विधी केल्या जातात का
तक्ता क्र. ५९ बाळाच्या जन्मापूर्वी केले जाणारे विधी
तक्ता क्र. ६० बाळ जन्मल्यानंतर केले जाणारे विधी
तक्ता क्र. ६१ मुलींना प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधी करणाऱ्याचे प्रमाण
तक्ता क्र. ६२ लग्न विधी चालण्याचा कालावधी
तक्ता क्र. ६३ आंतरजातीय विवाह करण्याचे प्रमाण
तक्ता क्र. ६४ आंतरजातीय विवाहास विरोध
तक्ता क्र. ६५ महिलांचे पुनर्विवाह करण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६६ महिलांना घटस्फोटानंतर पोटगी मिळण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ६७ जिल्हानिहाय अंत्य संस्काराच्या पद्धतीचे प्रमाण

तक्ता क्र. ६८ जिल्हानिहाय दशक्रिया विधीच्या दिवसाचे प्रमाण

तक्ता क्र. ६९ जिल्हानिहाय मांसाहाराचे प्रमाण


## गोसावी समाजाची आर्थिक माहिती


तक्ता क्र. ७० कुटुंबाचा व्यवसाय

तक्ता क्र. ७१ कुटुंबातील कमवती व्यक्ती

तक्ता क्र. ७२ मासिक उत्पन्न

तक्ता क्र. ७३ घराची मालकी

तक्ता क्र. ७४ राहण्यासाठी जागा

तक्ता क्र. ७५ गायरान जमीन

तक्ता क्र. ७६ घराचे बांधकामाची स्थिती

तक्ता क्र. ७७ घराचा प्रकाराची स्थिती

तक्ता क्र. ७८ घरातील खोल्याची स्थिती

तक्ता क्र. ७९ घराचे क्षेत्रफळाची स्थिती

तक्ता क्र. ८० स्वत:च्या मालकीची जमीन

तक्ता क्र. ८१ जमीन खंडाने घेण्याची स्थिती

तक्ता क्र. ८२ खंडाने घेतलेल्या जमीनीचे प्रमाण

तक्ता क्र. ८३ महिना मुलभूत खर्चाचे प्रमाण

तक्ता क्र. ८४ उपभोग्य गरजांवर प्रती महिना खर्च

तक्ता क्र. ८५ कर्ज घेण्याचे प्रमाण

तक्ता क्र. ८६ कर्ज घेण्याची कारणे

तक्ता क्र. ८७ पूर्वज करत असलेल्या व्यवसायाचे प्रमाण

तक्ता क्र. ८८ पारंपारिक व्यवसायानुसार भीक मागणाऱ्यांची स्थिती

# गोषवारा

भारतीय राज्यघटनेने समाजात समता प्रस्तापित करण्यासाठी तसेच सामाजिक भेदभाव मिटविण्यासाठी, स्वातंत्र्य, समानता, बंधुता या तत्वांचा अंगिकार केला. या अनुषंगाने समाजातील विविध वंचित घटकांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या विकसित होण्यासाठीचे मुलभूत हक्क प्राप्त होतात. परंतु अद्याप समाजातील अनेक घटक मुलभूत हक्कांपासून वंचित असल्याचे आढळते, यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटके-विमुक्त जमातींचा समावेश होतो.

महाराष्ट्र शासनाच्या भटके जमाती (ब) मधील क्रमांक १- वरील गोसावी हा समाज अत्यंत मागासलेला व भटका समाज असल्याचे आढळून येते. या समाजाचे संशोधन अत्यंत कमी प्रमाणात झालेले आहे. तसेच गोसावी समाजावर संशोधनपर पुस्तके ही खुप कमी प्रमाणात प्रसिध्द झाल्याचे आढळून आलेले आहे. याअनुषंगाने बार्टी संस्थेमार्फत गोसावी समाजाचे सामाजिक व आर्थिक संशोधन करण्यात आले.

सदर संशोधनाची उद्दिष्ट्ये प्रामुख्याने:-

१) गोसावी समाजाची सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) गोसावी समाजाची आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) प्राप्त निष्कर्षाच्या आधारे धोरणात्मक शिफारशी करणे.

सदर अभ्यासात प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रातील पुणे व सांगली या दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली. गोसावी समाज भटकंती करत असल्याने त्यांचे निश्चित स्थान नसते. त्यामुळे गोसावी समाजाच्या संघटनेकडून प्राप्त माहितीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातून १०६८ व सांगली जिल्ह्यातून ५१७ नमुना संख्या यादुच्छिक पध्दतीनुसार काढण्यात आली व एकुण १५८५ लोकांकडून गोसावी समाजाची सामाजिक व आर्थिक घटकांवर आधारित प्रश्नावली भरण्यात आली.

प्राप्त माहितीच्या आधारे विश्लेषण व तक्तीकरण करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने गोसावी समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्याचे आढळून आले. स्त्री शिक्षणाचे प्रमाण खुप कमी आहे. या समाजातील नोकरी करण्यांची संख्या अत्यंत कमी आहे. या समाजात प्रामुख्याने भंगार गोळा करणे, भिक्षा मागणे, मासेमारी करणे अशा प्रकारचा व्यवसाय करणाऱ्यांची संख्या जास्त आहे.

सदर समाज भटकंती करत असल्याने मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. तसेच भटकंती समाज असल्याने मुलभूत गरजांपैकी 'निवारा' या समाजाकडे नसल्याचे आढळून आले आहे. अनेक

कुटुंबाकडे स्वत:चे घर नसल्याचे या अभ्यासातून आढळून आले आहे. ७४.१% समाज हा कच्च्या घरात वास्तव्यास आहे. ७३.८% लोकांचे मासिक उत्पन्न १०,०००/- पेक्षा कमी असल्याचे आढळून आले आहे. बेरोजगारीचे प्रमाण या समाजात जास्त आहे. त्याचबरोबर समाजात व्यसनाधिनतेचे प्रमाण सुध्दा जास्त आहे.

समाज सतत भटकंती करत असल्याने स्थलांतरणाचे प्रमाण ५४.२०% एवढे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गरीबीमुळे व उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. सदर अभ्यासात २८.९% लोकांनी त्यांना इतर समाजाकडून मिळणारी वागणूक भेदभावाची असल्याची माहिती नोंदविली आहे. या समाजात हुंडा पध्दती आहे. (४०.४%) गोसावी समाजात जात पंचायत असल्याची माहिती या अभ्यासातून प्राप्त झालेली आहे. या समाजातील लोकांना शासकीय योजनांची माहिती नसल्याचे आढळून आले आहे. गोसावी समाजाकडे ८३.९३% लोकांकडे जात प्रमाणपत्र नाहीत. सदर अभ्यासाव्दारे या समाजात अंधश्रध्दा आढळून येते. यामध्ये बाबा-बुवा मानने (४७.८%), प्राणी बलिदान (९५.७%), पत्रिका जुळविणे (४४.६%), जादू टोणा माणने (३३%), अंगात येणे (४०.३%) इत्यादी गोसावी समाजात बाल विवाह करण्यात येतो. यावर आवश्यक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. गोसावी समाजावर इतर समाजाची दहशत आहे. या समाजातील बऱ्याच लोकांना क्रिमिनल ट्राइब ॲक्ट बद्दल माहिती नाही.

- **गोसावी समाजाच्या कुटुंबाची सामाजिक स्थिती :**

  सर्वेक्षणातून भरण्यात आलेल्या १५८५ गोसावी समाजाच्या कुटुंबाच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषण केले आहे.त्यातील मुख्य बाबी खालीलप्रमाणे

  - **वयाचे प्रमाण**
    - १८ वर्षा पेक्षा कमी — ०.६%
    - १८-३५ वर्षे — ३३.६%
    - ३५-६० वर्षे — ५४.४%
    - ६० वर्षापेक्षा जास्त — ११.३%
  - **वैवाहिक स्थितीचे प्रमाण**
    - अविवाहित — २.३ %
    - विवाहित — ८७.०%
    - घटस्फोटीत — ०.३%
    - परितक्त्या — ०.९%
    - विधवा — ९.५%

- **हिंदू धर्माचे प्रमाण**
    - पुणे १००%
    - सांगली १००%
- **गोसावी जातीचे प्रमाण**
    - पुणे १००%
    - सांगली १००%
- **शिक्षणाचे प्रमाण**
    - अशिक्षित ३७.८%
    - प्राथमिक २७.४%
    - माध्यमिक २४.५%
    - उच्च माध्यमिक ७.३%
    - पदवीधर २.४%
    - उच्च शिक्षित ०.५%
- **कुटुंबातील सदस्यांचे वयाचे प्रमाण**
    - १८ वर्षा पेक्षा कमी ३६.११%
    - १८-३५ ३५.७५%
    - ३५-६० २३.०६%
    - ६० वर्षापेक्षा जास्त ४.८%
- **बोलीभाषेचे प्रमाण**
    - गुजराती ०.३%
    - मराठी २.४%
    - संमिश्र गोसावी ९७.३%
- **स्थलांतरित होण्याचे प्रमाण**
    - होय ५४.२०%
    - नाही ४५.८०%
- **स्थलांतरित होण्याच्या करणाचे प्रमाण**
    - गरिबी ४५.७०%
    - उदरनिर्वाह ४०.१०%
    - रोजगारासाठी १३.००%
- **आंतरजातीय विवाहाचे प्रमाण**
    - होय ६.३%
    - नाही ९३.७०%

- **व्यसनाधीनतेचे प्रमाण**
  - होय ५६.८%
  - नाही ४३.२%
- **इतर जातीय समारंभात सहभागी होण्याचे प्रमाण**
  - होय ७७.१%
  - नाही २२.९%
- **समारंभात इतर जातीच्या लोकांचे सहभागी होण्याचे प्रमाण**
  - होय ७४.५%
  - नाही २५.५%
- **इतर समूहाकडून मिळणाऱ्या वागणुकीचे प्रमाण**
  - भेदभाव २८.९%
  - समानता ७०.०%
  - दोन्ही १.१ %
- **समूहाने राहण्याचे प्रमाण**
  - होय ९२.९%
  - नाही ७.१%
- **हुंडा पद्धतीचे प्रमाण**
  - होय ४०.४%
  - नाही ५९.६%
- **रोटी-बेटी व्यवहाराचे प्रमाण**
  - होय २७.९%
  - नाही ७२.१%
- **जात पंचायतीचे प्रमाण**
  - होय ३८.०%
  - नाही ६२.०%
- **शासकीय योजनेची माहिती असण्याचे प्रमाण**
  - होय २.८%
  - नाही ९७.२%
- **योजनेचा लाभ न मिळाल्याच्या करणाचे प्रमाण**
  - योजनेची माहिती नव्हती ६४.०%
  - कागदपत्रे पूर्तता करण्यास असमर्थ १२.१%
  - इतर ७.८%

- **जिल्हा निहाय संघटनेचे प्रमाण**
    - होय १३.८%
    - नाही ८६.२%
- **कुटुंबातील सदस्यांचे जात प्रमाणपत्र असण्याचे प्रमाण**
    - होय १६.०७%
    - नाही ८३.९३%
- **कुटुंबातील सदस्यांकडे आधारकार्ड असण्याचे प्रमाण**
    - होय ९०.८७%
    - नाही ९.१३%
- **कुटुंबातील सदस्यांकडे मतदान कार्ड असण्याचे प्रमाण**
    - होय ५३.७६%
    - नाही ९.६९%
    - लागू नाही ६.५२%
- **बाबा-बुवा यांना मानण्याचे प्रमाण**
    - होय ५४.१%
    - नाही ४५.९%
- **धार्मिक विधीसाठी प्राणी बलिदान देण्याचे प्रमाण**
    - होय ९५.७%
    - नाही ४.३%
- **पत्रिका जुळवून विवाहाचे प्रमाण**
    - होय ४४.६%
    - नाही ५५.४%
- **जादूटोणा मानणाऱ्याचे प्रमाण**
    - होय ३९.०%
    - नाही ६१.०%
- **अंगात येणाऱ्यांचे प्रमाण**
    - होय ४०.९%
    - नाही ५९.१%
- **मासिक पाळी असताना बाजूला बसविण्याचे प्रमाण**
    - होय ९३.३%
    - नाही ६.७%
- **स्त्रियांना असणाऱ्या जटांच्या स्थितीचे प्रमाण**
    - होय ३.८%
    - नाही ९६.२%

- ❖ **मुलीच्या लग्नाच्या वयाची स्थिती**
  - १०ते १८ वर्ष — ४५.० %
  - १८ च्या पुढे — ५३.८०%

**भिक्षा मानणाऱ्याचे प्रमाण**
  - नाही — ७४.३ %
  - होय — २५.७ %
- ❖ **इतर समाजाची दहशत**
  - नाही — ७४.४ %
  - होय — २५.६%
- ❖ **क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ ची माहिती**
  - नाही — ९२.१ %
  - होय — ७.९ %
- ❖ **क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ च्या अंतर्गत गुन्हा दाखल**
  - नाही — ९७.७ %
  - होय — २.३ %
- ❖ **आंतरजातीय विवाह करण्याचे प्रमाण**
  - नाही — ९३.७० %
  - होय — ६.३० %
- ❖ **आंतरजातीय विवाहास विरोध**
  - नाही — ९३.७० %
  - होय — ६.३० %
- ❖ **महिलांचे पुनर्विवाह करण्याचे प्रमाण**
  - नाही — ३२.४ %
  - होय — ६७.६ %
- ❖ **अंत्य विधीचे प्रमाण**
  - जाळणे — ५८.० %
  - पुरणे — ४०.२ %
- **गोसावी समाजाची आर्थिक माहिती :-**

गोसावी समाजातील पुणे व सांगली या दोन जिल्ह्यातील एकूण १५८५ लोकांची माहिती सर्वेक्षणाद्वारे गोळा करण्यात आली. प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यात आले त्यानुसार गोसावी समाजाची आर्थिक माहिती मधील मुख्य बाबी खालीलप्रमाणे

- **कुटुंबाचा व्यवसाय :**
  - इतर मोलमजुरी १७.८%
  - शेतमजुरी १७%
  - व्यवसाय १४.४%
  - भंगार गोळा करणे १२.४%
  - भिक्षा मागणे १०%
- **कुटुंबातील कमवत्या व्यक्तींची संख्या**
  - १ व्यक्ती ५४.१%
  - २ व्यक्ती २९.९%
- **मासिक उत्पन्न**
  - १०,००० पेक्षा कमी ७३.८%
  - १०,००० ते २०,२०००० च्या दरम्यान २२.१%
  - २०,००० पेक्षा अधिक ४.१%
- **घराची मालकी**
  - स्वत:चे ६९.७%
  - भाड्याचे ५.७%
  - अतिक्रमित २४.६%
- **राहण्यासाठी जागा**
  - नाही २५.६%
  - होय ७४.४%
- **गायरान जमीन**
  - नाही ९०.०%
  - होय १०.०%
- **घराचे बांधकाम**
  - कच्चे ७४.१ %
  - पक्के २ ५.९ %
- **स्वत:च्या मालकीची जमीन**
  - नाही ९८.२ %
  - होय १.८ %
- **मुलभूत खर्चाचे प्रमाण**
  - २५०० पेक्षा कमी ४६.८%
  - २५००-५००० पर्यंत ३८.७%
  - ५००० ते १०००० रुपये ११.६%

❖ **उपभोग्य गरजांवर प्रती महिना खर्च**

| | |
|---|---|
| • ५००० पेक्षा कमी | ८७.१% |
| • ५००० ते १०००० पर्यंत | ११.२ % |
| • १०००० पेक्षा जास्त | १.६% |

❖ **कर्ज घेण्याचे प्रमाण**

| | |
|---|---|
| • नाही | ६१.३ % |
| • होय | ३८.७ % |

# प्रकरण पहिले

## प्रस्तावना

स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचे तत्व स्वीकारून भारतीय राज्यघटनेने सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी विशेष तरतूदी केल्या आहेत. घटनेच्या तिसऱ्या प्रकरणात प्रदान केलेले मुलभूत हक्क कोणत्याही नागरीकापासून हिरावून घेतले जावू शकत नाहीत. यानुसार गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. पण वर्षानुवर्षे समाजाच्या उतरंडीतील खालच्या थरातील जाती ह्या नेहमीच विकासापासून वंचित राहिल्या आहेत. जाती व्यवस्था मनुष्याच्या जन्मापासूनच उच्च नीच असा कायमस्वरूपी स्तर देते. परिणामत: जातिव्यवस्थेची खोलवर गेलेली मुळे उच्च समाजाला खालच्या थरातील लोकांचे शोषण करण्यासाठी संस्थात्मक सामाजिक चौकट देते (Mandal B.P १९८०).

गोसावी समाज हा याच जाती व्यवस्थेतील उतरंडीमधील खालच्या थरातील समाज आजही मागासलेल्या अवस्थेत जीवन जगताना दिसून येतो. ब्रिटीश राजवटीमध्ये वसाहतवादामुळे उपेक्षित, दुर्लक्षित व दडपून गेलेल्या अनेक भटक्या जातीं पैकी गोसावी ही एक जात आहे. भारतीय संविधानाच्या कलम १४ ने समतेचे तत्व सांगितले आहे. कलम १६ हे समान संधी उपलब्ध करून देण्याबाबत आहे. तर कलम ३८ नुसार राज्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करून समाज कल्याणासाठी तरतूदी करण्याबाबत सांगितले आहे. तथापि भटक्या विमुक्त समाजाच्या अभ्यासासाठी १९६५ साली नेमलेल्या लोकूर समितीने लक्षात आणून दिले की अनुसूचित जाती अनुसूचित जमातीसाठी असलेल्या योजना या कमी लोकसंख्या व सतत स्थलांतर करण्याच्या प्रवृत्तीमुळे भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी फायद्याच्या नाहीत (Department of Social Security १९६५).

भटक्या समाजाची नक्की लोकसंख्या किती याबाबतही अद्ययावत माहिती उपलब्ध नाही. तसेच रूढी व परंपरांचा पगडा, शिक्षणाचा अभाव, प्रभावी नेतृत्वाचा अभाव, भूमिहीन, आर्थिक मागासलेपणा या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. पूर्वापार भटका समाज स्वत:च्या मालकीची जमीन व मालकीच्या घरापासून वंचित राहिला आहे. (Idate B.R. २०१७) मुळात आपण कोण आहोत (स्व ओळख) याबाबतच भटक्या समाजात द्विधा मनस्थिती दिसून येते. या सर्व कारणामुळे गोसावी हा भटका समाज स्वातंत्र्याच्या ७४ वर्षानंतर ही मागास राहिला आहे. या अनुषंगाने महाराष्ट्रात गोसावी समाजाची नक्की काय स्थिती आहे, त्यांची शैक्षणिक व आर्थिक

मागासलेपण आहे काय, व  या समाजाची वैशिष्ट्ये कोणती, त्यांच्या उन्नतीसाठी काय करता येईल या बाबींचा अभ्यास करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संशोधन संस्था पुणे यांनी सदर संशोधन हाती घेतले आहे.

स्वतंत्र महाराष्ट्राला भटक्या विमुक्तांचे मुख्यमंत्र्यांच्या रूपाने १२ वर्षे नेतृत्व  लाभले आहे. मा.वसंतराव नाईक व कन्नमवार यांच्या माध्यमातून या जमातींचा प्रश्न तसूभरही हलला नाही. भटक्या विमुक्तांनी भारतात राहायचे तर, रेशनिंग कार्ड नाही आणि भारत सोडून जायचे तर, पासपोर्ट मिळत नाही. यामुळे भटक्या विमुक्तांनी कसे जगायचे हा प्रश्न आजपर्यंत सुटलेला नाही. भीमराव जाधव, दौलतराव भोसले, लक्ष्मण माने, बाळकृष्ण रेणके, मोतीराज राठोड, लक्ष्मण गायकवाड, भीमराव गस्ती, वसंतराव चव्हाण, व्यंकप्पा भोसले आणि आताच्या भटक्या विमुक्त आयोगाचे अध्यक्ष मा.दादा इदाते हे नेतृत्व प्राप्त झाले. यांनी अनेक पातळयांवर प्रयत्न केला परंतु भटक्या विमुक्तांचे प्रश्न मात्र सुटलेले नाहीत. (जाधव २०१८)

आज देशातील सर्वांत तळागाळातले, गरीब, निरक्षर, निराधार आणि वंचित घटक म्हणजे भटके-विमुक्त होत. भटक्या-विमुक्तांना ६५ वर्षांनंतरही स्वातंत्र्याचे कोणतेही लाभ मिळालेले नाहीत. गावात घर नाही, रानात शेत नाही, प्रतिष्ठित व्यवसाय नाही, पराभूत आणि परिस्थिती शरण मानसिकता असलेल्या या समुदायाच्या प्रश्नांची गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्रात चर्चा चालू आहे. वेगवेगळ्या माध्यमांतून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. सभा, संमेलने, मोर्चे आणि शोध यात्रा यातून भटक्या विमुक्तांच दुखणं प्रस्थापित समाजापर्यंत आणि शासनापर्यंत पोहचविण्याचे काम त्यांच्यातील कार्यकर्ती मंडळी करीत आहेत. परंतु अजूनही हवं तसं यश त्यांना मिळालेल नाही. मात्र त्या निमित्ताने या समाजात होत असलेली जागृती ही त्यातल्या त्यात मोठी जमेची बाजू आहे. कोणत्याही समाजाच्या प्रश्नांचा विचार करीत असताना त्यांच्या समाज जीवनाकडे दुर्लक्ष करून चालत नाही. त्यांचे अनेक प्रश्न हे त्यांच्या जनजीवनाशी निगडीत असतात. म्हणून त्यांच्या जगण्याची ओळख होणे आवश्यक वाटते.

पिढ्यान-पिढ्या ज्यांच्या वाट्याला केवळ उपेक्षाच आली, वेशीच्या आत किंवा वेशीबाहेर ही ज्यांना स्थान मिळाले नाही, किंबहुना उपरेपणाचे, दुर्लक्षित व अस्थिर जीवन ज्यांच्या वाट्याला आले किंवा गुन्हेगार जमात म्हणून ज्यांना समाज प्रवाहापासून दुर ठेवण्यात आले आणि त्यांचे जगणे मरणेच गुन्हा ठरविण्यात आले . या जमातींमधीलच एक जात म्हणजे गोसावी भारतीय हिंदू धर्म समाज व्यवस्थेत गोसावी हे संन्यासी वृत्तीचे प्रतिक मानले गेलेले आहे. पूर्वीच्याकाळी अखंड बालब्रह्मचारी अवस्थेत जंगलात एकांतात योग अभ्यास

करणारे किंवा तपश्चर्या करीत आयुष्य घालविणारे अनेक ऋषी-मुनी होऊन गेलेले आहेत. त्यांची परंपरा पुढच्या काळात चालू ठेवण्याचे काम गोसावी हा समाज करतो आहे. मात्र या परंपरेत पूर्वी ब्रह्मचर्य हे व्रत मानले जात असे. तसे व्रत हल्ली गोसावी समाजात मानले जात नाही. प्रपंच करून परमार्थ साधने हा त्यातला प्रमुख उद्देश मानला जातो. गोसावी आणि ऋषी किंवा संन्याशी यामध्ये महत्वाचा असा आणखी एक फरक आहे कि गोसावी लोक पूर्वीप्रमाणे जंगलात किंवा गीरीकंदरात ध्याणधारणा, तपश्चर्या करताना क्वचित आढळतात. जटा वाढवायच्या, गळ्यात रुद्राक्षांची माळ घालायची, भगवी वस्त्रे नेसायची आणि देवाच्या नावाने दारोदार पै-पैसा मागत फिरायच हा हल्लीच्या गोसावी लोकांचा उद्योग आहे.(चव्हाण १९८९)

गेल्या अनेक वर्षापासून अशा प्रकारे, संन्याशाच्या वेशात दारोदार भिक्षा मागून स्वतःची उपजीविका करणारा विशिष्ट्य जमातीचा समूह भटकत आहे. त्यांना 'भटके गोसावी' या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र शासनाने 'गोसावी' ही भटकी जमात म्हणूनच नोंद केलेली आहे. यांना 'गाव गोसावी' असेही म्हणतात. या गोसावी समाजामध्ये गिरी, पुरी, भारती, सरस्वती, वन, आख्य, तीर्थ, आश्रम आणि सागर असे भेद आहेत. या सर्वाना मिळून दशनाम गोसावी असे म्हटले जाते. (चव्हाण १९८९)

**भटके म्हणजे काय**

भटके हा शब्द 'नोमॅड' या इंग्रजी शब्दाचे रुपांतर आहे. नोमॅड हा शब्द 'नेमो' या ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. 'नेमो' या शब्दाचा अर्थ 'पशुपालक' असा होतो. युरोपियन देशांमध्ये दाट जंगलाच्या अभावामुळे व कुरणांच्या उपलब्धतेमुळे तेथील मानवी समूह दीर्घकाळ पशुपालक अवस्थेमध्ये होते. या तत्कालीन अवस्थेमुळे 'नेमो' शब्दाची उत्पती झाली. 'नेमो' पासून 'नोमॅड' चे रुपांतर 'भटके' अशा प्रकारे 'भटका' हा शब्द आचरणात आलेला आहे. परंतु भारतामध्ये मात्र पशुपालक, शिकारी व अन्नशोधक या तिन्ही प्रकारच्या मानवी समूहाला भटके न म्हणता या तिन्ही मानवी समूहाला एकत्रित 'भटका' समाज असे म्हटले जाऊ लागले.

हा 'भटका' समाज आजही भटकत असून 'भटका' याच नावाने ओळखला जातो. शासनाने या भटक्या जमातीचे तीन गट केले आहेत. भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क आणि भटक्या जमाती -ड इत्यादी होय. या तिन्ही गटातील मिळून एकूण २९ भटक्या जमाती आहेत. (चव्हाण २०१३)

**विमुक्त म्हणजे काय ?**

इंग्रज राजवटीत भटक्या जमातीतील काही जमातींना गुन्हेगार म्हणून घोषित करण्यात आले होते. तेव्हा इंग्रज सरकारने १८७१ साली 'गुन्हेगार जमाती कायदा' पारित केला. या कायद्यानुसार गुन्हेगार ठरविलेल्या जमातींना सेटलमेंटमध्ये (तारेच्या कुंपनात) बंदिस्त करण्यात आले होते. या जमाती भारत स्वतंत्र होईपर्यंत बंदिस्त होत्या, परंतु १९५२ साली स्वतंत्र भारताच्या पार्लमेंटने हा कायदा रद्द करुन या जमातींना बंदिवासातून मुक्त केले. तेव्हा पासून या जाती गटाला 'विमुक्त जाती' असे नाव पडले.

महाराष्ट्रात या जमाती आजही 'विमुक्त' याच नावाने ओळखल्या जातात. महाराष्ट्र सरकारने या विमुक्त जमातीला स्वतंत्र आरक्षण दिले आहे. विमुक्त जातीचा 'विमुक्त जाती - अ' असा स्वतंत्र गट आहे. या गटात एकूण १४ जाती आहेत.

महाराष्ट्रात एकूण विमुक्त जाती १४ तर भटक्या जमाती २९, मिळून ४३ विमुक्त-भटक्या जाती-जमाती आहेत. या विमुक्त-भटक्यांच्या काही पोट जाती / तत्सम जाती आहेत. त्यांची संख्या जवळ पास १२० एवढी आहे. यापैकी शहरी भागात राहणाऱ्यांमध्ये थोडी फार सुधारणा जाणवते. परंतु जे ग्रामीण भागात राहतात ते आजही अत्यंत निकृष्ट आणि हिन जीवन जगत आहेत. (चव्हाण २०१३)

**विमुक्त-भटक्या जमातीची व्याख्या-**

विमुक्त-भटक्या जमातींची परंपरा, चालीरिती, विधी, दैनंदिन जीवन जगण्याची पध्दत अशा विविध बाबी विचारात घेऊन काही व्याख्या करण्यात आल्या आहेत. त्यापुढीलप्रमाणे-

**श्री. शंकर खरात** यांच्या मते "ज्यांना स्वत:चे गाव नाही, राहायला घर नाही, कसण्यासाठी शेती नाही, कायम उत्पन्नाची साधने नाहीत. पोट भरण्यासाठी सतत गावोगावी भटकणाऱ्या, भिक्षेवर जगणाऱ्या, विविध जातीच्या नावाने जीवन जगणाऱ्या लोक समुहाला भटके असे म्हणतात. (चव्हाण २०१३)

**डॉ. नारायण भोसले** यांच्या मते 'अन्न गोळा करीत, भिक्षा मागत भटकणाऱ्या जमाती, ज्यांना पोट भरण्यास भिक्षे शिवाय पर्याय नाही. 'धर्म' म्हणून गावो-गावी भीक मागत भटकणाऱ्या आणि वेळ प्रसंगी चोऱ्या करणाऱ्या जमातींना विमुक्त-भटके असे म्हणतात.' (चव्हाण २०१३)

**प्रा. मोतीराज राठोड** यांच्या मते "शेती व गृहोपयोगी वस्तू तयार करणाऱ्या जमाती, घराचे व मंदिराचे बांधकाम करणाऱ्या जमाती, नंदी बैल, साप, माकड, उंट, अस्वल असे प्राणी सोबत घेऊन खेळ करीत, भीक

मागणाऱ्या जमाती, भविष्य सांगणाऱ्या व देवाच्या नावावर भीक मागत फिरणाऱ्या जमातींना एकत्रित भटके-विमुक्त असे म्हणतात." (चव्हाण २०१३)

**जे. जे. रॉयबरमन** यांच्या मते "विमुक्त-भटक्या जमाती हा एक भारतीय समाजातील सामाजिक गट आहे. आर्थिक दुर्बलतेमुळे त्यांना प्राचीन काळी एक विशिष्ट व्यवसाय देण्यात आला. त्या व्यवसायाला अनुसरुन ती जात निश्चित झाली. त्यात काही विमुक्त तर काही भटक्या जमाती म्हणून ओळखल्या जातात." (चव्हाण २०१३)

**श्री. प्रभाकर मांडे** यांच्या मते "चित्र विचित्र वेशभुषा करणाऱ्या जमाती, तोंडावर भडक रंग लावणाऱ्या व बैल (नंदी) सोबत घेऊन भीक मागणाऱ्या जमाती, तसेच जंगली जडी-बुटी, औषधी देऊन पोट भरणाऱ्या जमाती, जादूटोणा करणाऱ्या जमाती, भविष्य पाहणाऱ्या जमाती, कसरती करुन पोट भरणाऱ्या जमाती, इत्यादी जमातींना भटक्या-विमुक्त जमाती असे म्हणतात." (चव्हाण २०१३)

**श्री. लक्ष्मण माने** यांच्या मते "काही विशिष्ट लोकांच्या गुन्हेगार प्रवृत्तीमुळे सर्व जमातीलाच इंग्रज सरकारने गुन्हेगार ठरवून त्या जमातींना वेगळया वसाहतीत (सेटलमेंट कॉलनी) ठेवले. त्या मुळे एक समाजच बंदिस्त झाला. इतर समाजाच्या सामाजिक प्रवाहा पासून अलग झाला. या समाजालाच विमुक्त जाती (Nomadic Tribes) असे म्हणतात." तर दुसरीकडे पिढयान पिढया स्वत:चे घर व व्यवसाय नसल्यामुळे अन्न व निवाऱ्याच्या शोधात सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरणाऱ्या समाजाला भटक्या-जमाती असे म्हणतात.

वरील सर्व प्रकारच्या व्याख्या विमुक्त-भटक्यांच्या अर्थकारणावरुन तयार झालेल्या आहेत. भटक्यांना व्यवसाय, परंपरा, जीवन शैलीला महत्त्व देऊन व्याख्या करण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केलेला आहे. भटक्या-विमुक्तांचा व्यवसाय, त्यांची परंपरा, त्यांची कला, खेळ करण्याच्या पध्दती, भीक मागण्याच्या पध्दती या सर्व बाबींमुळे त्यांच्यात वेगळेपण निर्माण होते, आणि त्यांच्यातला हाच वेगळेपण विमुक्त-भटक्यांची विशेष ओळख करुन देतो.

महाराष्ट्र राज्यामधील गोसावी समाजाची स्थिती फारच दयनीय आहे. बाराही महिने भटकंती करणारा हा समाज आहे. गावांत घर नाही, शिवारात शेत नाही, या गावातून त्या गावात पोटाची भूक भागविण्यासाठी भटकंती करत राहायच अशी या समाजाची अवस्था आहे. महाराष्ट्र राज्यामधील गोसावी समाज मुळचा राजस्थान येथील असल्याचे म्हटले जाते. सन १५७६ मध्ये मुघल आणि महाराणा प्रताप यांच्यात यांच्यात झालेल्या हल्दी-

घाटातील युध्दात मोघलांचा विजय झाला. यावेळी पराजित झालेला बहुसंख्य समाज जीवन जगण्याची गरज व मोगलांच्या जाचातून मुक्तता या उद्देशाने राजस्थान मधून स्थलांतरित होऊन विविध राज्यात भटकू लागला. गोसावी समाज हा त्यापैकीच एक असल्याचे म्हटले जाते. पोटाची भुक भागवण्यासाठी भिक्षा मागून उदरनिर्वाह करू लागल्याने या समाजास महाराष्ट्र राज्यात गोसावी असे म्हटले जाऊ लागले. गुजरात,कर्नाटक,राजस्थान या राज्यामध्ये या समाजाला डुंगरी-गरासिया या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्र राज्यामधील गोसावी समाजाचे कर्नाटक तसेच गुजरात राज्यात रोटी-बेटी, व्यवहार होतात. त्यांची भाषा, दैवते, व्यवसाय, रिती-रिवाज, चाली-रिती, गोत्र, दफन-पध्दत, न्याय-व्यवस्था, देवदेवता, शिकार, मासेमारी या सर्व बाबींमध्ये साम्य असल्याचे गोसावी समाजाचे म्हणणे आहे. (एल. चव्हाण २०१९)

**गोसावी समाजाची सामाजिक स्थिती**

गोसावी जमातीचे समाजामधील स्थान हे अस्थिर आहे. पोटाची भूक भागविण्यासाठी आज इथे तर उद्या तिथे असे करत असताना नदी किंवा माळरान तसेच पाण्याचे ठिकाण बघून त्या ठिकाणी पाल मांडायचे व हे करत असताना त्या गावामधील कोतवालाची परवानगी घ्यावी लागत असे. कारण हे लोक आपल्या गावात चोऱ्या-माऱ्या करतील व आपले गाव अस्वच्छ करतील हा त्यामागे हेतू होता. अश्या प्रकारे आपला फाटका-उघडा संसार त्या ठिकाणी उभा करायचा. एका गावांत तीन दिवसापेक्षा जास्त राहण्याची परवानगी नसलेने चौथ्या दिवशी भल्या पहाटे कोतवाल त्या ठिकाणी हजर व्हायचा आपआपले साहित्य व पसारा बांधून दुसऱ्या गावाला जावे म्हणून गावांच्या शिवाराबाहेर घालवत यायचा. मग अश्या वेळी असे जीवन जगत असताना जन्म, मृत्यु, लग्न हे कुठे झाले याचाही विसर पडायचा.

पिढीजात आणि पारंपारिक असा कोणताही व्यवसाय नसल्याने, त्याचबरोबर भूमिहीन असलेने सतत भटकंती करत असलेने इतर समाजाशी एकरुप न होता. प्राण्यांची शिकार मारुन भाजून खाणे, दाढी व केस वाढवून गलिच्छ असे राहणीमान, भटकंतीमुळे संस्काराचा अभाव, निरक्षरता, बालविवाह, भिक्षा मागणे, व्यसनाधिनता इत्यादी कारणांमुळे गोसावी समाज ही मुख्य प्रवाहापासून अलिप्तच राहिली. गोसावी जमातीमधील लोक एकमेकांशी आदराने वागतात. एखादया कुटुंबावर दु:ख किंवा संकट कोसळले तर सर्वजन एकत्र येऊन त्याचा सामना करतात. गोसावी समाजामध्ये होळी, दसरा, लग्न समारंभादरम्यान एखादी दु:खद घटना घडल्यास सण, उत्सव साजरे केले जात नाहीत. (एल. चव्हाण २०१९)

**शैक्षणिक स्थिती**

शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले गेले आहे. शिक्षणामुळे समाजात शांतीयुक्त क्रांती निमार्ण होते. आजमितीला महाराष्ट्रामधील खेडो-पाड्यात शिक्षणाची गंगा पोहचली आहे. परंतु आमच्या गोसावी समाजामध्ये सतत भटकंतीचे जीवन, अस्थिरता, दारिद्रय, अज्ञान, मागासलेपणा या व इतर अश्या गोष्टीमुळे शिक्षणाची गंगा गोसावी जमाती पर्यंत पोहोचलीच नाही. परिणामी बाहेरील जगाच्या घडामोडीपासून हा समाज दूरच राहिला. गोसावी जमातीमधील १०/२० टक्के मुला व मुलींना शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला. परंतु १९६१ पूर्वीचा रहिवाशी पुरावा अश्या जाचक अटीमुळे शासनाच्या विविध सोयी-सवलती गोसावी जमातीस न मिळू शकल्याने शिक्षण व गोसावी समाज यांच्यात दुरावा निर्माण होत गेला. त्यामुळे समाजात अज्ञान व अंधकार पसरला गेला म्हणूनच गोसावी समाजाची शैक्षणिक स्थिती सुधारु शकली नाही. भटक्या जमातीस असणाऱ्या शैक्षणिक जाचक अटी शिथिल करुन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले तरच गोसावी जमातीचा सर्वांगीण विकास होणे शक्य आहे. (एल. चव्हाण २०१९)

**गोसावी समाजाची बोलीभाषा**

गोसावी समाजाची स्वतंत्र अशी एक बोलीभाषा आहे. राजस्थानी, गुजराती, हिंदी अशी मिश्रित स्वरुपाची भाषा गोसावी समाजाची आहे. यांस गोसावी बोलीभाषा असे म्हटले जाते. लहान मुले-बाळे ही त्या कुटुंबामधील वातावरणातच वाढत असल्याने वंशपरंपरेने तीच भाषा आपोआप अवगत होत जाते व ती गोसावी भाषा बोलू लागतात. गोसावी भाषेची नोंद शासन दरबारी कोणत्याही ठिकाणी आढळून येत नाही. परंतु गोसावी बोलीभाषा संपूर्ण भारत देशात कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश तसेच विविध राज्यांमध्ये एकसारखीच बोलली जाते.

महाराष्ट्र शासनाच्या भटक्या विमुक्त-ब (NT-B) प्रवर्गात गोसावी समाजाच्या एकूण १३ तत्सम जाती आहेत. त्या पुढीलप्रमाणे १) बावा २) बैरागी ३) भारती ४) गिरी गोसावी ५) भारती गोसावी ६) सरस्वती पर्वत ७) सागर ८) बाण किंवा वान ९) तीर्थ आश्रम १०) अरण्य ११) घरभारी १२) संन्याशी १३) पुरी. या जातींपेक्षा गोसावी समाजाची बोलीभाषा पूर्णपणे भिन्न आहे. गोसावी समाजाची बोलीभाष ही फक्त याच समाजा अंतर्गत बोलली जाते. महाराष्ट्र शासनाच्या एन. टी. ब. च्या प्रवर्गातील गोसावी समाजा अंतर्गत तत्सम १३ जातींचा गोसावी समाजाशी कोणताही संबंध असलेचे आढळून येत नाही. या १३ तत्सम जातीमध्ये व गोसावी

समाजामध्ये रोटी-बेटीचे व्यवहार आजीबात होत नाहीत. त्याचप्रमाणे रुढी-परंपरा, चाली-रिती, संस्कृती ही यामध्ये देखील भिन्नता आढळून येते. (एल. चव्हाण २०१९)

**गोत्र व पोटजाती**

गोसावी समाज अंतर्गत अनेक पोटजाती (गोत्र) आहेत. गोसावी जमातीत चंवाळ यांस सर्वश्रेष्ठ व उच्च मानले जाते. यांनाच बारापाटीचे चंवाळ किंवा लाल गादीचे चंवाळ असे संबोधले जाते. गोसावी जमातीचे नेतृत्व चंवाळ करीत असत. न्याय पंचायतीमध्ये त्यांना फार महत्व आहे. जमातीत एखादा वाद विवाद झाल्यास त्याची सोडवणूक चंवाळ करीत असत. कालांतराने हा मान पुन्हा पडियार या पोटजातीकडे आला व त्यांना महाथळ असे संबोधले जाऊ लागले. तसेच चंवाळ या पोटजातीस अजूनही गांवघर म्हणून प्रथम मान-सन्मान दिला जातो. प्रत्येक गोत्रांची वेगवेगळी नावे असतात. गोत्रांचे नांव हे पूर्वज, गोत्रातील व्यक्ती, गोत्रातील देव किंवा वस्तीवर आधारित असते. जशी जात जन्मत: माणसाला मिळते तसेच गोत्राचे आहे. जात ज्याप्रमाणे जात नाही त्याचप्रामणे गोत्राचे सदस्यत्व सोडता येत नाही किंवा दुसऱ्या गोत्रात प्रवेश करता येत नाही. पित्याकडून आलेले सदस्यत्व मुलाला स्वीकारावे लागते. जन्मापासून मरेपर्यंत एकच गोत्र असते. गोत्रातील प्रत्येक सदस्य देवकाविषयी आदराची भावना जपतो. देवकाची पूजा करतात, देवका संदर्भात असणारी सर्व कार्ये करतात. (एल. चव्हाण २०१९)

**विवाह व गोत्र**:

गोसावी समाजामध्ये देवक व गोत्र याला फार महत्व आहे. समान देवक असलेल्या गोत्रामध्ये विवाह होत नाहीत. विवाह जुळविताना गोत्रास समोर ठेऊन विवाह जुळविले जातात. गोत्र हे बहिर्विवाही समूह असल्यामुळे एकाच गोत्रामध्ये विवाह होत नाहीत. एकाच गोत्रातील स्त्री-पुरुषांचे विवाह झाल्यास त्यास गोसावी समाजामध्ये पाप असे म्हटले जाते. गोसावी समाज त्या गोत्रावर बहिष्कार घालते व जात- पंचायतीद्वारे त्या कुटुंबास सव्वाशे तीन बारा रुपये दंड करते. गोसावी समाजातील एकाच गोत्रातील रक्ताच्या नात्यामधील स्त्री त्याच गोत्रातील पुरुषाने पळवून नेली तर त्यास या समाजामध्ये पाप समजले जाते. हे पाप ठोस पुराव्यासहित सिद्ध झाल्यास त्या दोघांच्या केसांची एक-एक बट काढली जाते. यास कात्री लावणे असे म्हणतात. तसेच त्या दोघांच्या पायाला ऊसाच्या पाल्याची पाचट बांधतात व दोघांना पुढे चालावयास सांगतात व पाठीमागून शेण मारतात. या पळून गेलेल्या दोघांकडून सव्वाशे तीन बारा रुपये दंड घेऊन अश्या प्रकारे त्यांचे पाप उतरविले जाते. मुलगी कुवारी असेल तर बापाच्या ताब्यात दिली जाते किंवा एखादया पुरुषाची बायको असल्यास त्यास परत दिली जाते.

गोसावी समाजामध्ये पडियार हे तसे एकच गोत्र आहे. कधीकाळी पडियार गोत्रामधील मुलाने त्याच गोत्रामधील मुलगी पळवून नेली. म्हणजे समाजाच्या दृष्टीने त्याने हे पाप केले होते. तेव्हा या समजामधील जात पंचायतीने सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड (गोळीबार) या ठिकाणी पंचायत भरविली होती. यावेळी पंच मंडळींनी त्या मुलीला माळण्या पडियार असलेचे घोषित केले. त्या मुलाचे व मुलीचे कुलदैवत हे वेगवेगळे असल्याने त्यांना लग्न करण्यास काही हरकत नाही असा निवाडा केला. त्यावेळेपासूनच खंडोबाचे पडियार यांनाच हाडरा पडियार असे म्हणतात. तर माळण्या पडियार व हाडरा पडियार असे दोन वेगवेगळे गोत्र निर्माण झाले आणि त्यांच्यामध्ये सोयरिक निर्माण होऊ लागली. (एल.चव्हाण २०१९)

गोत्रामुळे गोसावी समाजामध्ये संघटन वाढण्यास मदत होते असे या समाजातील लोकांचे म्हणणे आहे. गोत्रातील सदस्य एकमेकांचे रक्ताचे नातेवाईक असल्यामुळे एकमेकाविषयी स्नेह, आपुलकी, प्रेम, निर्माण होते. गोत्रातील सदस्यावर आपत्ती ओढवल्यास इतर सदस्य धावून जातात व सहकार्य करतात. गोत्रातील सदस्यावर दुखाचा प्रसंग ओढवल्यास त्या गोत्रामधील नातेवाईक कोणतेही शुभकार्य किंवा देवक पूजा करत नाहीत. गोसावी समाजामध्ये अनेक गोत्र किंवा पोटजाती आस्तित्वात आहेत. एका गोत्रातील सदस्याने दुसऱ्या गोत्रातील सदस्यांसोबत प्रेम, स्नेह, सहकार्य तसेच व्यवहार नीती सुक्ष्म व आदराने करुन त्यांच्यामध्ये संघर्ष किंवा वाद निर्माण होणार नाहीत याची सर्व गोत्रे मिळून काळजी घेतात.

**राहणीमान**

गावाबाहेरील माळरानासारखे ठिकाण बघून त्या ठिकाणी पाल (झोपडी) मांडायची, त्या पाला मध्येच एका कोपऱ्यात तीन दगडाची चूल मांडायची जवळपास लागणारी भांडी ठेवायची सगळ काही उघडयावरच पडलेले असते. रानातून लाकूड-काटक्या गोळा करुन जळणासाठी वापरले जात. गोसावी समाजामध्ये लिंब, आंबा, पिंपळ, वड हे अलौकिक शक्तीचे प्रतिक समजून या झाडांची लाकडे अजूनही चुलीमध्ये जळण म्हणून वापरत नाहीत. शिकारीसाठी असणारी कुत्री ही तिथेच कुठेतरी बाजूला बांधायची, मासे मारण्याची जाळी ही त्या झोपडीला असलेल्या काठीला कुठेतरी लटकवून ठेवायची, कुटुंबातील लहान मुलांच्यासाठी त्याच झोपडीत दोन्ही बाजूंच्या काठीला दोरी बांधून त्या दोरीला चादर गुंडळून त्याचा पाळणा तयार करायचा, महिलांना अंघोळ करण्यासाठी त्या झोपडीला लागून दोन-तीन काठया उभ्या करुन त्यास जुनी फाटकी लुगडी गुंडाळून आडोसा तयार केला जात असे. मुलं-बाळं, माणसं आजारी पडली तर झाडपाल्याच्या औषधाने बरी करायची. काही

वेळेला भक्तांचे अंगी देवी बोलावून देवी समोरील राखेचा अंगारा त्या आजारी व्यक्तीच्या कपाळी लावून एक-दोन दिवसात बरे होईल असे सांगितले जायचे. आरोग्याची तमा नाही, रोग-राईची काळजी नाही, ऊन-वारा, पाऊस याची कसलीही भीती न बाळगता निसर्गावर भरोसा ठेऊन व त्याचा धैर्याने सामना करुन येणारा प्रत्येक दिवस हा आपली व आपल्या कुटुंबातील लोकांची भूक भागवण्यासाठीच जगायचं महिलांच्या प्रसूतीची कोणतीही सुविधा नसल्याने जन्मही त्या पालामध्येच व्हायचा. असं भटकं जीवन जगताना सोबत कुत्री, मांजर, कोंबडी, मुलं-बाळं, कुटुंब-संसार घेऊन या गावातून त्या गावांत सतत फिरत राहायचे. त्यामुळेच गोसावी समाजाची  शासन दरबारी कोठेही नोंद होऊ शकली नाही. मुलांना शिक्षण नाही, घर नाही, जमीन नाही, सरकारी योजनेचा लाभ नाही, व नागरिकत्वाचा पुरावा देखील या समाजाकडे नाही अशी गोसावी समाजाची  शोकांतिका आहे. (चव्हाण एल. २०१९)

परंपरागत असा कोणताही व्यवसाय नसल्यामुळे भगवी कपडे परिधान करुन, कपाळाला राख फासून, काखेमध्ये झोळी घेऊन उदरनिर्वाहासाठी हा समाज भिक्षा मागू लागू लागला. नदी-नाले, ओढ्याकाठी खेकडे व मासे पकडू लागला. आजही या समाजामधील महिला लहान मुलांनापाठीवर बांधून काच, पत्रा, बाटली, कागद (भंगार) गोळा करताना. यांवरच कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असत.

**वेशभूषा**

पूर्वीपासून गोसावी समाजातील पुरुष आपल्या अंगावर सदरा किंवा मेखळी व धोतर ऐवजी आडवा पंचा लावत असत. तसेच डोक्याला पागोटे गुंडाळत असत. केस व दाढी वाढलेली असे. भगवी कपडे परिधान करुन, कपाळाला राख किंवा गंधाचे पट्टे ओढून अंगाला भस्म फासून, हातात किटली व काखेमध्ये झोळी अडकवून गोसावी पुरुष भिक्षा मागत असत. जवळ असणाऱ्या गांवामधून भिक्षेमध्ये शिळे अन्न  किंवा काय मिळेल ते "वाढ ग माय"अशी आरोळी देत या समाजाकडून भिक्षा मागितली जाते. गोसावी समजाच्या स्त्रियांचा पारंपारिक पोशाख म्हणजे चोळी व घागरा होय. या स्त्रिया हातात चांदीचे गोट, पायात तोडे (पैंजण), गळयात चांदीचा चोरसा किंवा हासडी, कमरेला कमरपट्टा, जोडवी, बाजूबंद तसेच वांक्या असे चांदीचे दागिने घालत असत. तसेच त्या अजूनही चेहऱ्यावर किंवा शरीरावर गोंदण काढतात. (चव्हाण एल. २०१९)

**खानपान**

पूर्वीपासून गोसावी समाज जंगलात राहत असल्याने शिकार करणे हा आवडीचा छंद होता. गोसावी समाज हा मांसाहारी समाज आहे. या समाजास शिकारीसाठी वागरी, कुत्री, फासे, पिंजरे पाळण्याचा छंद होता. शिकारीमध्ये भूंगर (मुंगुस), गेंदर (कोल्हा), लोकडी (खोकड), मिनकी (मांजर), चीपट (घोरपड), सालगो (खवल्यामांजर), रुदडा (उदमांजर), शेवं(साळींदर) टिलोडी (खारुटी), पोसडी (भाट), कोळसो (इजाट), बलाडो (रानमांजर), रानकोंबडी, ससा, तितर अश्या प्रकारचे विविध प्राणी व पक्षी मारून ते भाजून खाल्ले जात असत. कालांतराने शासनाने शिकारीवर बंदी आणल्याने गोसावी समाजाने शिकार करणे बंद केले. परंतु मांसाहार करणे अजूनही सोडलेले नाही. त्याचबरोबर नदी-नाले व ओढयामधील खेकडे व मासे पकडून आणून ते आवडीने भाजून खात असत. या समाजात आहारामध्ये मांसाहार सोबत मदयपान केले जाते. त्याचबरोबर पान खाणे हा एक छंद गोसावी समाजातील पुरुष व महिलांमध्ये आढळून येतो. (चव्हाण एल. २०१९)

गावामधून भिक्षा मागून आणली जाते. त्यामध्ये शिळी भाकरी, कालवण, भात असे हे सर्व एकाच पिशवीत भरलेले असत. कालवणासाठी भांडे वापरले जात असत. हीच मागून आणलेली भिक्षा कुटुंबाची भूक भागवत असे. काही अन्न शिल्लक राहिले तर ते तसेच झाकून ठेवायचे आणि सायंकाळी पुन्हा तेच खायचे मग ते अन्न खराब झाले किंवा नाही याची पर्वा करत नसत.

**गोसावी जमातीचे सण व उत्सव**

गोसावी जमातीचा देवी-देवतांवर फार मोठा विश्वास आहे. प्रामुख्याने होळी व दसरा हे पारंपारिक प्रमुख सण आहेत. हा सण-उत्सव साजरा करण्यासाठी भटकंतीसाठी गेलेला समाज पुन्हा एकत्र येतो व मोठया उत्साहाने व आनंदाने हे सण साजरे केले जातात. विविध गोत्रानुसार त्यांची दैवतेही वेगवेगळी आहेत. त्यानुसारच सण व उत्सव साजरे केले जातात. साधारणत: होळी सणासाठी सर्वजण एकत्र येत असल्या कारणाने समाजामध्ये भांडण-तंटे यावेळी मिटविले जात असत. तसेच सगाई, लग्ने ही याचवेळी ठरविली जात असत. (चव्हाण एल. २०१९)

**होळी (धुलवड) व दसरा**

पूर्वीच्या काळी गोसावी समाज भटकंती करत उदरनिर्वाह करत असे हे करत असताना होळी या मुख्य सणासाठी एखादे गाव ठरवून त्या ठिकाणी गोसावी जमाती मधील लोक एकत्र येत व आपआपल्या झोपड्या

(पाल) मांडत असे. होळीच्या दिवशी झोपडयांपासून थोडया लांब अंतरावर होळी उभारली जाते. सकाळी पहाटे लवकर उठून महिला व सुवासिनी पाण्यानी भरलेल्या कळश्या किंवा हंडे घेऊन होळी भवती फेर धरुन प्रदक्षिणा घालत होळीला पाणी घालून शांत केले जाते. गोसावी समाज होळी व धुलवड या सणामध्ये महिलांचा मोठया प्रमाणात आदर व सन्मान करतात. महिलांसाठी हा दिवस आनंदाचा, उत्साहाचा व भाग्याचा असतो. धुलवडी दिवशी देवीची स्थापना व पुजा अर्चा करुन उद, धुप, अगरबत्ती लावल्या जातात. देवीस कोंबडयाचा बळी दिला जातो. हातावर केलेल्या गव्हाच्या चपात्या यालाचा "बाटया असे म्हणतात. त्या बाटयावर कोंबडयाचे मटण ठेवून देवीसमोर नैवेद्य दाखविला जातो. यावेळी समाजामध्ये भगत यांच्या अंगी देवी संचारते व सर्वांना देवी समोरील राखेचा अंगारा लावून सर्वांची दु:खे दूर करुन सर्वांना सुखी समाधानी ठेवण्याचे वचन देते.

गोसावी समाजामध्ये होळीप्रमाणे दसरा हा सण सुध्दा मोठया आनंदाने व उत्साहाने दहा दिवस साजरा केला जातो. या उत्साहा दरम्यान कोणत्याही प्रकारचे मासांहार किंवा मद्यपान केले जात नाही. अगदी गरिबातील गरिब माणूस देखील दसरा हा उत्सव साजरा करतोच. वेळो प्रसंगी उधार-उसणवार, कर्ज यातूनही नाही जमले तर घरामधील जुनी भांडी-कुंडी भंगारमध्ये विकून हा सण साजरा करतात. एवढे अनन्य साधारण महत्त्व गोसावी समाजामध्ये दसरा ह्या सणाला आहे. दररोज देवी समोरील अंगण शेणाने सारवून तसेच विविध फुलांनी व रांगोळी काढून सजविले जाते. सतत नऊ दिवस तेलाचा दिवा देवीसमोर तेवत ठेवला जातो. घंटी वाजवून देवीची आरती गोसावी भाषेमध्ये बोलली जाते. गोसावी जमातीमधील सण-उत्सव हे इतर तेरा तत्सम जातींपेक्षा पूर्णपणे भिन्न व वेगळे आहेत.

**गोसावी समाजाची आर्थिक स्थिती**

मुळातच गोसावी समाज भूमिहीन असल्याने शेतमजुरी व मोलमजुरी शिवाय उपजीविकेचे कोणतेही दुसरे साधन या समाजाकडे नाही. सतत भटकंती करणारा हा समाज आहे. पिढीजात व पारंपारिक असा कोणताही व्यवसाय या समाजाकडे नाही. मासेमारी, भंगार वेचणे, भिक्षा मागणे, अशी कामे करून या समाजात उदरनिर्वाह केला जातो. गोसावी पुरुष नदी, नाले किंवा ओढयाकाठी मासेमारी व खेकडे पकडून व त्याची घरोघरी जाऊन विक्री करून जे उत्पन्न मिळेल त्यावर कुटुंबाची गुजराण करत असे. पुरुषांच्या बरोबर महिलांही लहान मुल असेल तर पाठीवर बांधूनच काच, पत्रा, बाटली, कागद (भंगार) गोळा करून कुटुंबाचा चरितार्थ चालवतात. काही महिला देव-देवतांचे फोटो घेऊन भिक्षा मागतात. भिक्षेमध्ये तांदूळ, पीठ असे मागून आणले

जाते. त्याचप्रमाणे जुनी वापरलेली फाटकी कपडे ही मागून आणली जात असत व तीच कपडे वापरत असत. दैनंदिन जीवनात कष्ट करुन केवळ आजच्या पुरती कमाई करायची आणि भविष्याचा विचार न करता जे मिळेल त्याच्यावर आपला चरितार्थ चालावा एवढाच विचार केला जातो. अशा प्रकारे गोसावी समाजाची आर्थिक स्थिती ही खूपच हलाखीची व बिकट आहे. (चव्हाण एल. २०१९)

**व्यवसाय**

पोटाची खळगी भरुन जीवन जगण्यासाठी गोसावी जमातीकडे कोणतेही साधन नसलेने सतत भटकंती करत असलेने, जंगलात राहत असलेने, गोसावी जमातीचा पिढीजात पारंपारिक व्यवसाय जंगलामध्ये शिकार करणे होय. शिकारीमध्ये जंगली प्राणी मारुन ते भाजून खाल्ले जात असत. गोसावी समाज संपूर्ण जीवन जंगलात जगत असल्याने विविध औषधी वनस्पतींची त्यांना माहिती होती. त्याच औषधी वनस्पतींच्या माध्यमातून ते काही आजारांवर उपचारही करत. कालांतराने भिक्षा मागण्याबरोबरच काच, पत्रा, बाटली, कागद (भंगार) गोळा करणे, खेकडे पकडणे, मासेमारी करणे या व्यवसायांचा स्वीकार केला.

गोसावी समाजामध्ये शिक्षणाचा अभाव असल्या कारणाने नोकरी किंवा उदयोग-धंदा याची माहितीही नाही. परिणामी कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी भटकंती करत भिक्षा मागण्याशिवाय मार्गच उरला नाही. त्याचप्रमाणे संपूर्ण गोसावी समाज ही भूमिहीन असल्याने दुसऱ्याच्या शेतावर जाऊन रोजगार करुन जीवन जगणे पसंद करतात. गोसावी जमातीमधील कुटुंबे रोजगार व अन्नाच्या शोधात विविध खेडयामध्ये किंवा शहरामध्ये स्थलांतर करतात. धकाधकीच्या जीवनामध्ये पारंपारिक व्यवसायावर जीवन जगणे कठीण होत असल्याने मिळेल तो रोजगार व उदयोगधंदा करण्याकडे कल वाढलेला आहे. पुरुष मंडळी मजुरी, छत्र्या दुरुस्त करण्याबरोबर गावोगावी जाऊन बेनटेक्स, सुगंधी अत्तार, तसेच झाडपाल्यांपासून बनवलेली औषधे विक्री करण्याचे काम करतात. महिलाही केसावर फुगे, बेनटेक्स विक्री, मजुरी, भांगलन करतात त्यासोबतच गुरांना चारा आणण्याचे ही काम करतात. (चव्हाण एल. २०१९)

**शिकार करण्याची पध्दत व साधन -**

शिकार करण्यासाठी गोसावी समाज कुत्री, पिंजरे, वागरी, फासे, भाला या व इतर साधनांचा वापर करत असत. आठ-दहा जणांचा समूह कुत्री घेऊन जंगलामध्ये शिकारीसाठी जातात व विविध प्राण्यांची शिकार करुन त्याच्या समसमान वाटण्या केल्या जातात व ते प्राणी भाजून खाल्ले जात असत. शिकारीमध्ये भूंगर

(मुंगूस), गेंदर (कोल्हा), लोकडी (खोकड), मिनकी (मांजर), चीपट (घोरपड), सालगो (खवल्यामांजर), रुदडा (उदमांजर), शेवं (साळींदर), टिलोडी (खारुटी), पोसडी (भाट), कोळसो (इजाट), बोका (बलाडो), रानकोंबडी, ससा, तितर अश्या प्रकारचे प्राणी व पक्षी मारले जात असत. कुत्र्यांचा उपयोग शिकार मारणेसाठी तसेच आपल्या कुटुंबाची राखण करण्याकरिता केला जातो. नदी किंवा ओढयाच्या काठी पिंजरे किंवा फासे लावले जातात. पिंजऱ्यामध्ये थोडेसे मासे फडक्यात बांधून विशिष्ट अश्या एका तारेला आडकविले जातात त्या माश्यांच्या दुर्गंधीमुळे प्राणी त्या पिंजऱ्यामध्ये आकर्षित होतात व ते मासे खाण्यासाठी येणारे प्राणी त्या पिंजऱ्यात बंदिस्त होतात. (चव्हाण एल. २०१९) काळाच्या ओघामध्ये शासनाने शिकारीवर बंदी आणलेने शिकार मारणे गोसावी जमातीने बंद केले आहे.

# *प्रकरण दुसरे*

## संशोधन पद्धती

**२.१ संशोधनाचे महत्व:**

गोसावी समाज भटकंती करत असल्यामुळे त्यांचे सामाजिक, आर्थिक , शैक्षणिक विकास झालेला नाही, अशी माहिती दुय्यम साहित्यांचा आढावा घेतल्यानंतर प्राप्त झालेली आहे. त्यामुळे गोसावी समाजाचे सामाजिक, आर्थिक स्थितीचे सर्वेक्षण होणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे बार्टीमार्फत गोसावी समाजाच्या कुटुंबांचे सर्वेक्षण करून गोसावी समाजाच्या अडचणी व समस्या कोणत्या आहेत त्या शोधून काढण्यात आलेल्या आहेत. यासाठी गुणात्मक व संख्यात्मक माहितीचे विश्लेषण करणे आवश्यक असल्याने गुणात्मक व संख्यात्मक माहिती गोळा करण्यात आलेली आहे. सदर संशोधनाच्या निष्कर्षांव्दारे गोसावी समाजासाठी शासनास सामाजिक, आर्थिक विकासाच्या दृष्टीने योग्य पावले उचलण्यास मदत होईल.

**२.२ संशोधनाचे प्रश्न:**

१. पश्चिम महाराष्ट्रातील गोसावी समाजाची सामाजिक, आर्थिक स्थिती काय आहे?
२. भटके गोसावी समाजाला कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते?
३. पश्चिम महाराष्ट्रातील गोसावी समाजातील लोकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याविषयीची काय मते आहेत?

**२.३ संशोधनाचे उद्देश:**

पश्चिम महाराष्ट्रातील गोसावी समाजाच्या समाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्याकरिता पुढील उद्देश निश्चित करण्यात आले आहे.

१. पश्चिम महाराष्ट्रातील गोसावी समाजाच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. पश्चिम महाराष्ट्रातील गोसावी समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. गोसावी समाजातील शैक्षणिक स्थिती यांचा अभ्यास करणे.
४. गोसावी समाजात असणाऱ्या श्रद्धा, अंधश्रद्धा यांचा अभ्यास करणे.
५. गोसावी समाजातील महिलांच्या स्थितीचा अभ्यास करणे.

६. पश्चिम महाराष्ट्रातील गोसावी समाजातील लोकांना शासकीय योजनांचा लाभ मिळतो का तसेच लाभ घेताना येणाऱ्या अडचणी यांचा अभ्यास करणे.

७. प्राप्त निष्कर्षाच्या आधारे गोसावी समाजाच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी शासनास धोरणात्मक शिफारशी करणे.

**२.४ गृहीतके :**

१) पश्चिम महाराष्ट्रातील गोसावी समाजाची आर्थिक स्थिती हलाखीची आहे.

२) गोसावी समाजात शिक्षणाचा अभाव आहे.

३) गोसावी समाजात अंधश्रद्धा आहे.

४) गोसावी समाजात महिलांना दुय्यम स्थान आहे.

**२.५ संशोधन पद्धती:**

सदर संशोधनासाठी संख्यात्मक व गुणात्मक (Qualitative and Quantitative ) अशी मिश्र संशोधन पद्धती वापरण्यात आली

**२.६ नमुना निवड पध्दती:**

गोसावी समाजाचे वास्त्यव्य संपुर्ण महाराष्ट्रात आहे. परंतु सदर समाज भटकंती करत असल्यामुळे त्यांचे निश्चित स्थान नसते. भारतीय जनगणना सन २०११ नुसार गोसावी समाजाची लोकसंख्या प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे गोसावी समाजाच्या संघटनेने दिलेल्या माहितीनुसार पश्चिम महाराष्ट्रातील सांगली व पुणे या दोन जिल्ह्यात गोसावी समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. समाजाच्या संघटनेमार्फत प्राप्त लोकसंख्येनुसार पुणे व सांगली या दोन जिल्ह्यातील एकूण १५८५ कुटुंबाकडून सर्वेक्षणासाठी प्रश्नावली भरण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **तालुका** | **नमुना संख्या** |
|---|---|---|---|
| १ | पुणे | पुणे शहर, बारामती, जुन्नर, दौंड, मावळ, भोर | १०६८ |
| २ | सांगली | मिरज, तासगाव, पलूस, वाळवा, खानापूर, शिराळा | ५१७ |

उपरोक्त नमुना यादुच्छिक पद्धतीनुसार (Random Sampling) काढण्यात आलेला आहे.

**२.७ अभ्यास क्षेत्र :**

**पुणे जिल्हा**




**सांगली जिल्हा**




**२.८ माहिती संकलन करण्यासाठीचे तंत्र:** प्राथमिक माहितीचे संकलन Structured and Semi-structured Interview Scheduleच्या माध्यमातून घरोघरी जाऊन सामाजिक, आर्थिक बाबींची माहिती घेण्यात आली.

**२.९ निरीक्षण:** निरीक्षण पद्धत ही गुणात्मक पद्धत आहे. व्यक्तीच्या वर्तनावर, तसेच कुटुंबाच्या परिस्थितीची माहिती मिळविण्याकरिता ही पध्दत अवलंबण्यात आली.

**२.१० गटचर्चा:** गटचर्चेच्या माध्यमातून एकाच वेळी मोठ्या प्रमाणात प्राथमिक माहिती संकलन अनेक व्यक्तींच्या माध्यमातून एकाच जागेवर करता येत असल्यामुळे, गोसावी समाजाच्या सदस्यांबरोबर गटचर्चा

घेण्यात आली. सदर गटचर्चेमधुन गोसावी समाजाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थिती तसेच सण, उत्सव, प्रथा परंपरा, चालीरिती यांची माहिती घेण्यात आली.

**२.११ माहिती संकलनाचे स्त्रोत:** माहिती संकलन हे दोन स्त्रोतांच्या माध्यमातून करण्यात आले. प्राथमिक व दुय्यम स्त्रोत घरातील ज्या व्यक्तीला घराविषयी व घरातील प्रत्येक सदस्याविषयी संपूर्ण माहिती आहे, अशा व्यक्तीकडून माहितीचे संकलन करण्यात आले आहे. तसेच निरीक्षण व गटचर्चेच्या माध्यमातून प्राथमिक माहितीचे संकलन करण्यात आले आहे. तसेच निरीक्षण व गटचर्चेच्या माध्यमातून प्राथमिक माहितीचे संकलन करण्यात आले. प्रसिध्द झालेले लेख, नियतकालिके, वृत्तपत्र, पुस्तके, विषयाशी संबंधित माहितीपट, अहवाल, प्रसार माध्यमानी प्रसारित केलेल्या बातम्या, संशोधक व अभ्यासकांचे लिखाण इत्यादी.

**२.१२ पूर्वचाचणी:** संशोधनात पूर्वचाचणी हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. माहितीचे संकलन करण्यासाठी जी प्रश्नावली तयार केली जाते ती प्रश्नावली वस्तूनिष्ठ व व्यवहार्य आहे कि नाही, अभ्यासाचे उद्देश प्रश्नावलीच्या प्रश्नांच्या माध्यमातून पूर्ण होऊ शकतील कि नाही, तसेच त्या प्रश्नावलीच्या माध्यमातून उत्तरदात्याच्या वैयक्तिक भावना दुखावल्या जाऊ नये. ही महत्वाची कारणे या पुर्वचाचणी करण्यासाठीची असतात. या कारणामुळे प्रश्नावलीमध्ये योग्य ते बदल पूर्वचाचणी नंतर व उत्तरदात्याच्या अभिप्रायानुसार करण्यात येतात. गोसावी समाजाच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांना बोलावून पूर्वचाचणी करण्यात आली.

**२.१३ संकलन केलेल्या माहितीचे विश्लेषण:** जी माहिती संकलित करण्यात आली होती. त्या माहितीचे विश्लेषण दोन प्रकारे करण्यात आले आहे. मिश्र पध्दत असल्यामुळे गुणात्मक माहितीचे "Narrative " विश्लेषण करण्यात आले. तसेच संख्यात्मक माहितीचे विश्लेषण SPSS(Stastical Package for Social Science) सॉफ्टवेअर व Excel द्वारे करण्यात आले.

**२.१४ अभ्यासाच्या मर्यादा:**

गोसावी समाज संपूर्ण महाराष्ट्रात भटकंती करत असल्या कारणाने त्यांची मूळ लोकसंख्या प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे संघटनेकडून प्राप्त माहितीच्या आधारे नमुना निवडण्यात आलेला आहे. या अभ्यासामध्ये संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यासाठी सद्य परिस्थितीवर लिखाण कमी प्रमाणात उपलब्ध आहे. तसेच संघटनेच्या लोकांना संशोधनाचे महत्व पटवून देणे खूप अडचणीचे गेले तसेच त्यांच्या मागणीप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात संशोधन करण्यात आले नाही.

# प्रकरण तिसरे
# संदर्भ साहित्याचा आढावा

**१) भि. रा. इदाते १९९९ "विमुक्त जाती व भटक्या जमातील अभ्यास व संशोधन समिती अहवाल खंड - १"** च्या मांडणीनुसार महाराष्ट्रातील भटके व विमुक्त समाज हा आपली आगळी जीवन पध्दती, सांस्कृतीक मुल्ये आणि विविध कला कौशल्ये अंगी बाळगणारा यासाठी प्रसिध्द आहे. या समिती पुढे गोसावी जाती संबंधात विविध प्रकारची निवेदने आली. प्राचीन ग्रंथातील संदर्भापासून आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा त्यात घेतला आहे. या अहवालामध्ये भटके व विमुक्तांची संख्या महाराष्ट्रात किती व ती जिल्हावार व जाती जमातीप्रमाणे कशी विभागली आहे, याची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. महाराष्ट्र शासनाने १९७०-७५ दरम्यान एक यादी प्रकाशीत केली. या यादीत भटके व विमुक्तांची जिल्हावार संख्या दिलेली आहे. पण जाती निहाय नाही. या समितीने सर्वेक्षणातील संकलित माहितीच्या आधारे संशोधन करुन शासनास शिफारशी केल्या आहेत.

**२) अभय टिळक १९९९ यांच्या "महाराष्ट्रातील भटके व विमुक्तांची सामाजिक आर्थिक पाहणी"** या पुस्तकातील मांडणीनुसार गोसावी समाजाचा इतिहास, गोसावी समाजाच्या दशनाम गोसावी समाज, संन्यासी, नाथजोगी, नाथसमाज, किंवा नाथपंथी व कानफाटे गोसावी या चार जाती, गोसावी समाजाची व्यवहारातील मराठी भाषा व सांकेतिक भाषा तसेच गोसावी समाजाचे विदर्भ, खानदेश, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील वास्तव्य व लोकसंख्येची वितरण तसेच भटकंती समाजाची स्थिरता प्रमुख चालीरीती मध्ये जात पंचायतीच्या रुढीचे पालन, गोसावी समाजाचे भीक्षा मागण्या सोबतच दुग्ध व्यवसाय गुरांची खरेदी विक्री, नोकरी मोलमजुरी व किरकोळ व्यापार व हिंदु धर्मीय परंपरा पाळणे इत्यादी सामाजिक आर्थिक बाबींचा अभ्यास केलेला आहे.

**३) रामनाथ चव्हाण २००२ यांच्या "भटक्या विमुक्तांची जात पंचायत, नाथपंथी डवरी गोसावी"** या पुस्तकातील मांडणीनुसार महाराष्ट्रात गोसावी समाजाच्या अनेक जाती, पोटजाती आहेत. उदा. बैरागी, सारंग, सरस्वती, भारती, बाबा संन्यासी आणि गिरि गोसावी या प्रमुख असून नाथपंथी डवरी गोसावी ही त्यापैकीच एक पोटजात आहे. याशिवाय भराडी या स्वतंत्र जातीची नोंद महाराष्ट्र शासनाच्या भटक्या जातीच्या यादीत असून त्या जातीच्या पोटजाती म्हणून किंवा तत्सम जाती म्हणून किंगरीवाले, नाथबाबा, नाथजोशी, लवंगी, बाळसंतोषी आणि डवरी या नावाच्या पोटजातीचा समावेश केलेला आहे. या सर्व जाती स्वतंत्र समजल्या जातात. त्यांची

जात परंपरा, देव-देवता, लग्नविधी, मयताचे विधी व भाषा ही वेगळी असून जाती-पोटजातीत रोटी - बेटी व्यवहार होत नाहीत. प्रत्येकाच्या जात पंचायतीचे, स्वरुप, शिक्षा आणि त्याची अंमलबजावणी पध्दत वेगळी आहे. मात्र शिक्षा, कृती किंवा उपजीविका करण्याचे साधन एकच, भिक्षा मागून जगणे असले तरी त्यांचे भिक्षा मागण्याचे प्रकारही वेगळे आहेत. प्रत्येक जमातीची बोली भाषा ही वेगळी आहे. त्याचप्रमाणे इतर व्यक्तीला किंवा जाती बाहेरच्यांना आपले व्यवहार अथवा बोलणे कळू नये म्हणून पिढयान पिढया एक वेगळी सांकेतिक भाषा बोलली जाते. त्या भाषेला गुप्त भाषा किंवा पारुषी भाषा असे म्हणतात. या समाजात जात पंचायत आहे ती पिढयान पिढया चालत आलेली आहे. समाजातील तंटे, चोरी, मारी, गवशी, शिंदळकी (अनैतिक संबंध) सोयरे - संबंध, काडीमोड अशा अनेक प्रकरणांचा छडा लावण्यासाठी समाजातील प्रकरणे जात पंचायतीत मांडली जातात आणि त्यांचा निकाल दिला जातो व त्वरीत शिक्षेची अंमलबजावणी ही केली जाते. प्रत्येक जाती जमातीत नियम शिक्षेचे प्रकार जसे वेगवेगळे आहेत तसे या समाजात ही आहेत. प्रायव्हेट (जाती बाहेर) मारामारी झाली तर त्यांनी खुशाल पोलीस चौकीत जावे. जात पंचायतीचा त्या बाबतीत विरोध नाही. मात्र जातीतील जातीत मारामारी केली तर मात्र ती तक्रार जात पंचायती मध्येच करावी लागते. जात पंचायत जो निकाल देईल तो उभयतांना मान्य करावा लागतो अशा प्रकारचे विश्लेषण केलेले आहे.

**४) डॉ. नारायण भोसले २००८ यांच्या ''भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत परंपरा आणि संघर्ष''** या पुस्तकातील मांडणीनुसार नाथपंथी डवरी गोसावी- इतिहास आणि समाजजीवन वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. महाराष्ट्रात ज्या अनेक भटक्या जाती जमाती आहेत त्यात नाथपंथी डवरी गोसावी ही एक जमात. यात भीक मागणाऱ्या अनेक जमातीपैकी ही एक जमात. शिक्षणाचे प्रमाण अर्धा टक्याच्या वर नाही भिक्षेसाठी दारोदारी गावोगावी, महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर भटकणे नेहमीचेच असल्याने एकदा लग्न होवून गेलेली १२-१३ वर्षाची मुलगी पुन्हा भेटणे जवळ-जवळ अशक्य असते. आई वडील एका प्रातांत तर सासू सासरे वेगळया प्रातांत भटकत असतात पत्र पाठविण्याची सोय नाही की सुख-दुखाची खबरबात मिळण्याची शक्यता नाही. अशा वेळी नाथाची वार्षिक यात्रा हेच भेटयाचे अलिखित ठिकाण ठरते.

आज महाराष्ट्रात प्रत्येक जिल्हयात ही जमात आढळते. साधारणत: या जमातीची लोकसंख्या २५ ते ३० लाख सांगितली जाते या जमातीचे सखोल असे संशोधन होणे गरजेचे आहे. संशोधनामध्ये या जमातीचा उगम, त्याची कारणे, ती वाढण्याचे कारण, तिने आत्मसात केलेली संस्कृती जमातीच्या निर्मितीनंतर कोणता धर्म स्विकारला व त्यांची कारणे, भिक्षा हाच व्यवसाय का स्विकारला, सध्याची सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक,

आर्थिक स्थिती व ती सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत. तसेच खासकरुन समाजातील स्त्रिया मुले यांची परिस्थिती काय आहे याचा विचार संशोधनात व्हावा.  या बाबींचा अभ्यास केलेला आहे.

**५) उत्तम कांबळे २०१० "भटक्यांचे लग्न"** या पुस्तकातील मांडणी नुसार गोसावी समाजाचे वास्तव्य महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आसाम, राजस्थान, पश्चिम बंगाल या प्रदेशात असून महाभारत, रामायण आणि इतर महाकाव्यांत, बौध्द ग्रंथात गोसावीचा संदर्भ सापडतो. जगज्जेता सिकंदरने भारतावर स्वारी केली, तेव्हा पंजाबात गोसाव्यांचे राज्य होते. वैदिक धर्माच्या प्रसारासाठी गोसाव्यांकडून प्रयत्न झालेला आहे. या समाजात मुलाकडून मुलीला हुंडा दयावा लागतो. पूर्वी हादर साठ रुपये होता. तो आज दोन हजार रुपयांच्या पुढे गेला आहे. भिन्न गोत्रातील मुला – मुलीचे लग्न होते. मोती विकणारे, भिक्षा मागणारे, बुवा होणारे अशा अनेक उपजाती या समाजात आहेत. लग्नाला सहसा जास्त खर्च येत नाही किंवा लग्नात बडे जाव केला जात नाही. झोपडयांमध्येच आंब्याच्या डहाळया बांधल्या जातात. दारात वाकळ अंथरली जाते. भटजी येऊन लग्न लावतो. लग्नाच्या दिवशी हळदी समारंभ जुन्या कपडयावरंच होतो. नवरीला फक्त एक साडी-चोळी आणि तिच्या आई वडिलांना कपडे घ्यावे लागतात. सर्वांच्या जेवणचा खर्च नवऱ्या मुलाकडे असतो.

लग्नानंतर काही कारणाने मुलीच्या आई वडिलांनीच मुलगी परत नेण्याचा, तिला न नांदवण्याचा निर्णय घेतला, तर मुलगी नेण्यापूर्वी मुलाला लग्नाचा खर्च दयावा लागतो. पती पंचांना पाच रुपये देतो त्यानंतर पंच पदर (साडीचे कापड) फाडतात. एक खड्डा खणून त्यात तो पुरतात. याला पदर फाडणे म्हणतात. पदर फाडलाकी सोड चिठ्ठी झाली (घटस्फोट) असे मानले जाते अशा प्रकारचे विश्लेषण केलेले आहे.

**६) रामनाथ चव्हाण २०१३ "भटक्या विमुक्तांचे अंतरंग"** या पुस्तकातील मांडणीनुसार भारतीय हिंदू धर्म समाज व्यवस्थेत गोसावी हे संन्यस्त वृत्तीचे प्रतीक मानले गेलेले आहे. पूर्वीच्या काळी अखंड बालब्रम्हचारी अवस्थेत जंगलात एकांतात योग अभ्यास करणारे किंवा तपश्चर्या करीत आयुष्य घालविणारे अनेक ऋषी-मुनी होऊन गेलेले आहेत. गोसावी समाजात साडेबारा जाती किंवा साडेबारा पंथ मानले जातात. यामध्ये कुंभ मेळयातले संन्यासी आणि दसनामींचा समावेश आहे. याशिवाय नाथपंथातील आदिनाथ, उदयनाथ, सतनाथ, संतोषनाथ, अचल पीरनाथ, अच्छबेनाथ, गजबलाकंथळनाथ, ज्ञानपारशी, चौरंगीनाथ, मायारुपी मच्छिंद्रनाथ आणि पवन रुपी गोरक्षनाथ यांचा समावेश होतो. साडेबारा पंथातील पंथ आहे, तो कानात अर्धी मुद्रा घालणारा

पंथ म्हणून ओळखला जातो. या साडेबारा जाती शिवाय आणखी तीन मुख्य दल मानले गेले आहेत. त्यात पाला मानणारे समदल शिवाला मानणारे शंभूदल आणि छटदर्शनी दलअसे मुख्य तीन आहेत.

जात पंचायतीचे वर्चस्व इतर भटक्या समाजा प्रमाणे या ही समाजात जातपंचायतीचे अस्तित्व आहे. समाजा अंतर्गत प्रमुख कार्यासाठी किंवा लग्न प्रसंगी जात पंचायतीला मानाचे स्थान दिले जाते. जाति अंतर्गत भांडण- तंटयाचा निवाडा करणे, आर्थिक व्यवहार करताना कोणी जाती जातीत फसवणुक केली तर व्यवहारात योग्य न्याय देणे हे काम पंचायतीच्या पाच पंचांना करावे लागते किंवा जातीच्या स्त्री अथवा पुरुषाने जातीत किंवा जाती बाहेर अनैतिक संबंध ठेवले तर संबंधीत व्यक्तींना जाति बहिष्कृत करण्याची शिक्षा जात पंचायत देते.

या समाजातील विवाहाची प्रथा इतर समाजांप्रमाणे नाही विशेष म्हणजे विवाह नात्यात केले जात नाही. नात्यात लग्न केले तर पंचायत दोनशे रुपयां पर्यंत दंड करते. मात्र असा दंड भरुन नंतर नात्यात लग्नाला मान्यता दिली जाते. लग्न प्रसंगी हुंडा देण्या-घेण्याची प्रथा नाही. मात्र लग्न खर्च वीस हजारा पर्यंत करण्याची पध्दत आहे. लवंगी गोसावी हा हिंदु धर्मीय समाज असला तरी हे लोक प्रेताचे दहन करत नाहीत. मुसलमानां प्रमाणे प्रेताचे दफन करतात. मात्र हिंदु धर्मा प्रमाणे दहावा पाळतात. या समाजाचा सर्वात मोठा सण म्हणून शिमगा पाळला जातो. शिमग्याच्या सणा दिवशी सर्व व्यवहार बंद केले जातात. पाच दिवस शिमगा साजरा केला जातो.

उपेक्षित जीवन — पिढयान पिढया भटकंती करुन कशी बशी जगणारी माणसं स्वातंत्र्यातील आपल्या घटनात्मक हक्कांना वंचित झालेली आहेत यांना मतदानाचा हक्क नाही. त्यांच्या अस्थिर जीवनामुळे दाखले मिळत नाहीत. शिधापत्रिका नाही. कायमचा निवारा नाही, सतत भटकंतीमुळे शिक्षणाचा संबंध नाही इत्यादीचे सविस्तर वर्णन केलेले आहे.

**७) पृथ्वीगीर गोसावी २०१५ यांच्या "गोसावी व त्यांचा संप्रदाय भाग १२,"** या पुस्तकातील मांडणी नुसार हिंदुस्थानात विशेषत: महाराष्ट्रात वल्लभ सांप्रदायी, नाथपंथी, दशनामी व रामदासपंथी लोकांस गोसावी म्हणतात. परंतु गोसावी जात म्हणून जी प्रसिध्द आहे. तिच्यात या सर्व सांप्रदायिकांचा समावेश होत नाही. गिरी, पुरी, भारती आदि दहा उपनावे धारण करणाऱ्यांची गोसावी जातीत गण नाहो ते बाकीचे बैरागी, नाथ व ब्राम्हण या जातीत मोडतात. गोसावी शब्दाची उत्पत्ती- वैदिक गोसावी हा शब्द संस्कृत गोस्वामी या शब्दावरुन मराठीत रुढ झाला. गोऱ्यांचा अर्थ स्वर्ग, बाण, गाय, बैल, वाणी, वज्र, दिशा, नेत्र, किरण, पृथ्वी व पाणी असा अमर

कोशात दिला आहे. गोस्वामी हा शब्द वैदिक वाङ्:मयात आढळतो. प्रत्यक्ष इंद्राला गोस्वामी म्हटलेआहे. गोसावी ते कोण व त्यांना राजकारण कसले असावयाचे असे पुष्कळ शहाण्या लोकांस वाटते. गोसाव्यांचा उल्लेख प्राचीन काळी जरी सापडला तरी तो विरक्त म्हणूनच असावयाचा. १८ वे शतकात गोसाव्यांस वकिलीवर पाठविण्याचा विशेष प्रघात होता. त्यांचा साधूचा वेश व अनेक भाषा वरील प्रभुत्व यामुळे गोसावी लोक हे महत्वाचे काम चोख रीतीने पार पाडीत.

गोसावी आणि इंग्रज यांच्या चकमकी पुष्कळ झालेल्या आहे. मराठयांच्या बहुतेक लढायांतून गोसावी मराठयांच्या बाजूने लढले आहेत. बुंदेलखंड प्रकरणांत राजा अनुपगीरयाने जशी पेशव्यास मदत दिली. तशी पुढे इंग्रजांसही दिली. अरब प्रामाणिकपणा व शौर्य या गुणांबद्दल प्रसिध्द तसेच गोसावी ही होते आणि पुष्कळ वेळा अरब व गोसावी फौजा एकाच बाजूकडून लढल्याचे दाखले आहेत. उत्तर हिंदुस्थानात, बंगाल वगैरे भागात गोसावी जसे इंग्रजांशी लढले तसे दक्षिणेत खडकी, येरवडा, कोरेगांव या ठिकाणी हि लढले आहेत. ग्वाल्हेर नंतर इ.स. १७७१ ते १७७४ चे दरम्यान बंगाल प्रातांत या गोसाव्यांनी इंग्रजास सळो की पळो असे करुन सोडले होते. अत्यंत प्राचीन काळी यति-गोसावी हा वर्ण होता. आश्रम नव्हता आज ही गोसावी हा वर्ण-जात आहे. आश्रम नव्हे. पूर्वी याची गणना ब्राम्हण वर्णात व वर्गात होत होती. आणि आज ही होणे क्रम प्राप्त आहे. गोसावी म्हणजे संन्यासी नव्हे. पूर्वी प्रमाणे आज ही या जातीत घर बारी संन्यासी असे भेद आहेत. ते प्राचीन पंरपरेला धरुनच आहेत. नुसते अविवाहीत रहाणे म्हणजे संन्यासश्रम स्वीकारणे नव्हे. विधी युक्त संन्यास धारण करणाराच संन्यासी गणला जातो. म्हणून विवाहित व अविवाहित दोन्ही ही गोसावीच गणले जातात अशा प्रकारचे वर्णन केलेले आहे.

**८) एल.चव्हाण २०१९ यांच्या “शोकांतिका गोसावी जमातीची”** या पुस्तकात गोसावी समाजाची सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्टये, महाराष्ट्रातील गोसावी समाजाचा इतिहास, बोली भाषा, रुढी परंपरा, पारंपारिक व्यवसाय, इतर समाजा बद्दल या समाजाचे असणारे वेगळेपण अशा विविध बाबींचे सविस्तर वर्णन सदर मांडणीत केलेले आहे.

# *प्रकरण चौथे*

# गोसावी समाजाची सामाजिक स्थिती

भारतातील सामाजिक समस्यांचा विचार करणे हे आधुनिक काळात गरजेचे आहे. भारतातील सामाजिक प्रश्न दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. सामाजिक समस्या मानवनिर्मित असतात. सामान्यपणे समाजातील बहुतांश लोकांच्या सामाजिक समस्या भारतातील गुंतागुंतीच्या समाजरचनेमुळे झालेल्या आहेत. एखादा समाज, कुटुंब व व्यक्ती यांचा विकास त्यांच्या सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक स्थितीवर अवलंबून असतो. व्यक्तीचा विकास त्याच्या शैक्षणिक प्रगतीवर अवलंबून आहे. शिक्षण व सामाजिक स्थिती यांचा घनिष्ट संबध आहे. शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे साधन आहे. शिक्षणाने व्यक्तीमध्ये वैचारिक बदल होऊन त्यांच्या सामाजिक स्थितीचा विकास होतो.

गोसावी समाज हा प्रामुख्याने भटकंती करणारा समूह असल्याने त्यांचे निश्चित स्थान नसते. याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक स्थितीवर होत आहे. त्यामुळे गोसावी समाज शिक्षणापासून वंचित आहे. भटकंती करणारा समूह असल्याने गोसावी समाजाचे राहण्याचे ठिकाण निश्चित नसते. त्यामुळे त्यांना सामाजिक स्थिरता प्राप्त झालेली नाही. दुय्यम साहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे आढळून येते कि, या समाजात महिला प्रामुख्याने भंगार गोळा करण्याचे काम करतात तर पुरुष मासेमारी व भिक्षा मागण्याचे काम करतात. या समाजात व्यसनाधीनता जास्त प्रमाणात असल्याने मृत्यू लवकर होतात पर्यायाने घराची जबाबदारी महिलेवर येते. गोसावी समाजात महिलांना दुय्यम स्थान असल्याचे आढळून आले आहे. सद्य स्थितीमध्ये गोसावी समाज महाराष्ट्र राज्याच्या विमुक्त जातीच्या प्रवर्गात समाविष्ट आहे.

गोसावी समाजाची सामाजिक स्थिती जाणून घेण्यासाठी पुणे व सांगली येथील एकूण १५८५ कुटुंबाची पाहणी करण्यात आलेली आहे. यामध्ये गोसावी समाजात उच्चशिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्याचे आढळून आले आहे. गोसावी समाज भटकंती करणारा समूह आहे. या समाजात अंधश्रध्दा, व्यसनाधीनता आढळून आलेली आहे. तसेच गोसावी समाजात बालविवाह करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. या समाजावर जातपंचायतीचा पगडा आहे. या समाजात गुजराती व मराठी अशी समिश्र बोलीभाषा बोलली जाते.

सदर सर्वेक्षणातून असे आढळून आले आहे कि, या समाजात शासकीय योजनांचा लाभ घेण्याऱ्याचे प्रमाण कमी आहे. या समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. त्यामुळे पर्यायाने कुटुंबाचा सामाजिक विकास झालेला नाही.

गोसावी समाजाच्या समाजिक स्थितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे दिलेल्या तक्त्यानुसार करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. १**

**उत्तरदात्याचे वय**

| लिंग | वयोगट | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | **१८ वर्षा पेक्षा कमी** | **१८-३५ वर्षे** | **३५-६० वर्षे** | **६० वर्षा पेक्षा जास्त** | |
| स्त्री | २ | १०५ | १७६ | २४ | **३०७** |
| | ०.७% | ३४.२% | ५७.३% | ७.८% | **१००.०%** |
| पुरुष | ८ | ४२८ | ६८७ | १५५ | **१२७८** |
| | ०.६% | ३३.५% | ५३.८% | १२.१% | **१००.०%** |
| **एकूण** | **१०** | **५३३** | **८६३** | **१७९** | **१५८५** |
| | **०.६%** | **३३.६%** | **५४.४%** | **११.३%** | **१००.०%** |

वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार ०.६ टक्के उत्तरदाते १८ वर्षापेक्षा कमी वयोगटातील आहेत. ५३३ (३३.६ टक्के) उत्तरदाते १८-३५ या वयोगटातील, ८६३ (५४.४ टक्के) उत्तरदाते ३५-६० या वयोगटातील आहेत. तर उर्वरित ११.३ टक्के उत्तरदाते ६० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील आहेत. एकूण १५८५ उत्तरदात्यापैकी १२७८ पुरुष तर ३०७ स्त्रिया आहेत.

**तक्ता क्र. २**

**उत्तरदात्याची वैवाहिक स्थिती**

| **लिंग** | **वैवाहिक स्थिती** | | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अविवाहित** | **विवाहित** | **घटस्फोटीत** | **परितक्त्या** | **विधवा** | |
| स्त्री | १० | १५९ | २ | १४ | १२२ | **३०७** |
| | ३.३% | ५१.८% | ०.७% | ४.६% | ३९.७% | **१००.०%** |
| पुरुष | २७ | १२२० | २ | १ | २८ | **१२७८** |
| | २.१% | ९५.५% | ०.२% | ०.१% | २.२% | **१००.०%** |
| **एकूण** | **३७** | **१३७९** | **४** | **१५** | **१५०** | **१५८५** |
| | **२.३%** | **८७.०%** | **०.३%** | **०.९%** | **९.५%** | **१००.०%** |

तक्ता क्र.२ मध्ये गोसावी समाजातील उत्तरदात्यांची वैवाहिक स्थितीचे प्रमाण दिसून येते. यानुसार सर्वाधिक उत्तरदाते हे विवाहित असून यांचे एकूण प्रमाण ८७ टक्के एवढे आहे. तर स्त्री व पुरुषांच्या तुलनेत विवाहित पुरुषांचे प्रमाण हे ९५.५ टक्के तर विवाहित स्त्रियांचे प्रमाण तुलनेने कमी म्हणजेच ५१.८ टक्के एवढे आढळून आले. याउलट मात्र विधवा स्त्रियांचे प्रमाण अधिक असून ते ३९.७ टक्के तर विधुर पुरुषांचे केवळ २.२ टक्के एवढे प्रमाण आहे. यावरून सद्य स्थितीत गोसावी समाजातील विधवा स्त्रियांचे पुर्नविवाह करण्याचे प्रमाण कमी असल्याचे स्पष्ट होते. तसेच ४.६ टक्के स्त्रिया या परितक्त्या तर ०.७ टक्के स्त्रिया घटस्फोटीत असल्याचे दिसते. हे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अधिक असल्याने गोसावी समाजात स्त्रियांना असलेले दुय्यम स्थान स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३**

**उत्तरदात्याचा धर्म**

| **जिल्हा** | **हिंदू धर्म** |
|---|---|
| पुणे | १०६८ |
| | १००.०% |
| सांगली | ५१७ |
| | १००.०% |
| **एकुण** | **१५८५** |
| | **१००.०%** |

तक्ता क्र. ३ नुसार संशोधनाकरिता भरण्यात आलेल्या एकूण १५८५ प्रश्नावली मध्ये १०० टक्के गोसावी समाजाचा धर्म हिंदू असल्याचे नोंदविले आहेत.

**तक्ता क्र.४**

**उत्तरदात्याची जात**

| **जिल्हा** | **गोसावी जात** |
|---|---|
| पुणे | १०६८ |
| | ६७.३८% |
| सांगली | ५१७ |
| | ३२.६१% |
| एकुण | १५८५ |
| | १००.०% |

तक्ता क्र.४ नुसार संशोधना करिता भरण्यात आलेल्या एकूण १५८५ प्रश्नावलीनुसार १०० टक्के गोसावी सामाज्याची जात गोसावी असल्याचे सांगितले आहे.

**तक्ता क्र. ५**

**उत्तरदात्याचे शिक्षण**

| लिंग | शिक्षण | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अशिक्षित | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | उच्च शिक्षित | |
| स्त्री | १८० | ५७ | ५० | १६ | ४ | ० | **३०७** |
| | ५८.६% | १८.६% | १६.३% | ५.२% | १.३% | ०.०% | **१००.०%** |
| पुरुष | ४१९ | ३७८ | ३३९ | १०० | ३४ | ८ | **१२७८** |
| | ३२.८% | २९.६% | २६.५% | ७.८% | २.७% | ०.६% | **१००.०%** |
| **एकूण** | **५९९** | **४३५** | **३८९** | **११६** | **३८** | **८** | **१५८५** |
| | **३७.८%** | **२७.४%** | **२४.५%** | **७.३%** | **२.४%** | **०.५%** | **१००.०%** |

तक्ता क्र.५ मध्ये गोसावी समाजातील शिक्षणाची विदारक स्थिती समोर येते. शिक्षण हे कोणत्याही समाजाच्या विकासाचे साधन आहे. मात्र गोसावी समाजात अजूनही ३७.८ टक्के उत्तरदाते हे अशिक्षित असल्याचे दिसून येते. अशिक्षित स्त्रियांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अधिक असून ते ५८.६ टक्के एवढे आहे. यावरून स्त्रियांना मिळणाऱ्या शिक्षणाच्या संधींच्या बाबतीत या समाजात उदासीनता असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. केवळ प्राथमिक शिक्षण पूर्ण झालेले एकूण २७.४ टक्के उत्तरदाते आहेत. तर माध्यमिक शिक्षणाचे एकूण प्रमाण २४.५ टक्के एवढे दिसते. उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण ७.३ टक्के तर पदवीधर झालेल्या उत्तरदात्यांचे प्रमाण २.४ टक्के आहे.जसजसे शिक्षणाचा स्तर उंचावत आहे तसतसे गोसावी समाजातील स्त्री व पुरुष या दोघांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी होताना दिसून येते. गोसावी समाजातील उच्च शिक्षित स्त्रियांचे प्रमाण शून्य टक्के तर पुरुषांचे प्रमाण ०.६ टक्के असल्याचे दिसते.

**तक्ता क्र.६**

**कटुंबातील सदस्यांचे वय**

| लिंग | वय | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | १८ वर्षा पेक्षा कमी | १८-३५ | ३५-६० | ६० वर्षा पेक्षा जास्त | माहिती अप्राप्त | |
| स्त्री | १३७० | १४९० | ९५२ | १९४ | ९ | **४०१५** |
| | ३४.१२% | ३७.११% | २३.७१% | ४.८३% | ०.२२% | **१००.००%** |
| पुरुष | १६१४ | १४६४ | ९५४ | २०३ | १४ | **४२४९** |
| | ३७.९९% | ३४.४६% | २२.४५% | ४.७८% | ०.३३% | **१००.००%** |
| एकूण | २९८४ | २९५४ | १९०६ | ३९७ | २३ | **८२६४** |
| | **३६.११%** | **३५.७५%** | **२३.०६%** | **४.८०%** | **०.२८%** | **१००.००%** |

तक्ता क्र.६ मध्ये १५८५ कुटुंबातील एकूण ८२६४ सदस्यांचे वयाचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि, १८-३५ या वयोगटात ३५.७५ टक्के लोक आहेत. यामध्ये ३७.११ टक्के स्त्रिया आहेत. तर ३५-५० या वयोगटात २३.०६ टक्के लोक आहेत. यामध्ये २३.७१  टक्के स्त्रिया तर २२.४५ टक्के पुरुष आहेत. ६० वर्षापेक्षा जास्त ४.८० टक्के लोक आहेत. ३६.११ टक्के लोकसंख्या हि १८ वर्षापेक्षा कमी या वयोगटात आहे.

**तक्ता क्र.७**

**कटुंबातील सदस्यांची वैवाहिक स्थिती**

| लिंग | वैवाहिक स्थिती | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विवाहित | अविवाहित | घटस्फोटीत | विधवा/विधुर | परित्यक्ता | माहिती अप्राप्त | |
| स्त्री | २१६६ | १४८६ | १८ | २९८ | १९ | २८ | **४०१५** |
| | ५३.९५% | ३७.०१% | ०.४५% | ७.४२% | ०.४७% | ०.७०% | **१००%** |
| पुरुष | २१५८ | २००१ | ६ | ५१ | ३ | ३० | **४२४९** |
| | ५०.७९% | ४७.०९% | ०.१४% | १.२०% | ०.०७% | ०.७१% | **१००%** |
| एकूण | ४३२४ | ३४८७ | २४ | ३४९ | २२ | ५८ | **८२६४** |
| | **५२.३२%** | **४२.२०%** | **०.२९%** | **४.२२%** | **०.२७%** | **०.७०%** | **१००%** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते कि, १५८५ कुटुंबातील एकूण ८२६४ सदस्यांपैकी ५२.३२ टक्के लोक विवाहित आहेत. यामध्ये ५३.९५ टक्के स्त्रिया तर ५०.७९ टक्के पुरुष आहेत.४२.२० टक्के लोक अविवाहित आहेत. यामध्ये प्रामुख्याने ४७.०९ टक्के पुरुष आहेत. तर ०.२९ टक्के लोक घटस्फोटीत आहेत.यामध्ये प्रामुख्याने १८ स्त्रियांचा समावेश आहे तर ६ पुरुष आहेत. एकूण ४.२२ टक्के विधवा/विधुर आहेत. यामध्ये ७.४२ टक्के विधवा तर १.२० टक्के पुरुष आहेत. १९ स्त्रिया परित्यक्ता आहेत. तर ३ पुरुष आहेत.

**तक्ता क्र.८**

**कटुंबातील सदस्यांचे शिक्षण**

| लिंग | शिक्षण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अशिक्षित | अंगणवाडी | प्राथमिक | माध्यमिक | उच्च माध्यमिक | पदवीधर | पदव्युत्तर | उच्च शिक्षित | माहिती अप्राप्त | |
| | | | १ ली ते ४ थी | ५ वी ते १० वी | ११ वी ते १२ वी | | | | | |
| स्त्री | १२८८ | ३ | १०६६ | ८७२ | २७२ | ७७ | ९ | १० | ४१८ | **४०१५** |
| | ३२.०८% | ०.०७% | २६.५५% | २१.७२% | ६.७७% | १.९१% | ०.२२% | ०.२४ % | १०.४१ % | **१००%** |
| पुरुष | ६६९ | ३ | १३२६ | १२७७ | ३८४ | १४६ | १३ | १५ | ४१६ | **४२४९** |
| | १५.७४% | ०.०७% | ३१.२१% | ३०.०५% | ९.०३% | ३.४३% | ०.३०% | ०.३५% | ९.७९ % | **१००%** |
| एकूण | १९५७ | ६ | २३९२ | २१४९ | ६५६ | २२३ | २२ | २५ | ८३४ | **८२६४** |
| | **२३.७%** | **०.०७%** | **२८.९%** | **२६%** | **७.९४%** | **२.७%** | **०.२७%** | **०.३%** | **१०.१ %** | **१००%** |

वरील तक्त्यानुसार ६ बालके अंगणवाडीत आहे. शिक्षणानुसार २८.९ टक्के प्राथमिक शिक्षण (१ली ते ४ थी) घेतलेले २६ टक्के लोक माध्यमिक शिक्षण (५वी ते १०वी), ७.९४ टक्के ११ वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहे. २.७ टक्के पदवीधर आहेत. ०.२७ टक्के पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहेत. फक्त ०.३ टक्के उच्च शिक्षित आहेत. तर २३.७ टक्के लोक अशिक्षित आहेत. यात प्रामुख्याने ३२.०८ टक्के स्त्रिया अशिक्षित आहेत.

## तक्ता क्र.९

## कटुंबातील सदस्यांची बेरोजगारी

| लिंग | बेरोजगारी | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | लागू नाही | माहिती अप्राप्त | |
| **स्त्री** | १६२७ | १६११ | ७२१ | ५६ | **४०१५** |
| | ४१% | ४०% | १८% | १% | **१००%** |
| **पुरुष** | १०९३ | २२७३ | ८१४ | ६९ | **४२४९** |
| | २६% | ५३% | १९% | २% | **१००%** |
| **एकूण** | २७२० | ३८८४ | १५३५ | १२५ | **८२६४** |
| | **३२.९१%** | **४६.९९%** | **१८.५७%** | **१.५१%** | **१००%** |

वरील तक्त्यानुसार असे निदर्शनास येते कि १५८५ कुटुंबातील ८२६४ गोसावी लोकसंख्येत ३२.९१% लोक बेरोजगार आहेत. त्यामध्ये २६% पुरुष व ४१% स्त्रियांचा समावेश आहे. ४६.९९% लोक रोजगार करत आहेत. त्यामध्ये ४०% स्त्रियांचा समावेश आहे. तर उर्वरित १२५ लोकांनी याबाबतची माहिती दिलेली नाही. १८.५७% सदस्यांना सदर बाब लागू नाही याचे मुख्य कारण  वयोगट आहे लहान वयोगटातील लोकांना सदर बाबा लागू होत नाही.

## तक्ता क्र. १०

## बोलीभाषा

| जिल्हा | भाषा | | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | गुजराती | मराठी | संमिश्र गोसावी | |
| पुणे | ५ | ३८ | १०२५ | **१०६८** |
| | ०.५% | ३.६% | ९६.०% | **१००.०%** |
| सांगली | ० | ० | ५१७ | **५१७** |
| | ०.०% | ०.०% | १००.०% | **१००.०%** |
| **एकूण** | **५** | **३८** | **१५४२** | **१५८५** |
| | **०.३%** | **२.४%** | **९७.३%** | **१००.०%** |

तक्ता क्र.१० नुसार महाराष्ट्रातील गोसावी समाजाची स्वत:ची एक वेगळी भाषा आहे. स्वतंत्र  बोलीभाषा हे गोसावी समाजाचे वैशिष्ट्ये असले तरी त्याभाषेला वेगळे असे नाव नसून ती मराठी-गुजराती या भाषांची संमिश्र स्वरूपाची भाषा आहे. अशी भाषा बोलणारे एकूण ९७.३  टक्के कुटुंबे सर्वेक्षणादरम्यान आढळून आले.

**तक्ता क्र. ११**

**स्थलांतरित होण्याचे प्रमाण**

| अ.क्र. | स्थलांतरित | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८५९ | ५४.२० |
| २ | नाही | ७२६ | ४५.८० |
| | **एकूण** | **१५८५** | **१००.००** |

सर्वेक्षण करण्यात आलेल्या १५८५ कुटुंबात ८५९ (५४.२० टक्के) कुटुंबे स्थलांतरित आहेत. तर उर्वरित ७२६ (४५.८० टक्के) लोक स्थलांतर केलेली नाहीत.

**तक्ता क्र. १२**

**स्थलांतराचे कारण व त्याचे प्रमाण**

| अ.क्र. | स्थलांतराचे कारण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कौटुंबिक विवाद | २ | ०.१०% |
| २ | रोजगारासाठी | २०६ | १३.००% |
| ३ | उदरनिर्वाहासाठी | ६३६ | ४०.१०% |
| ४ | गरीबीमुळे | ७२५ | ४५.७०% |
| ५ | इतर | ११ | ०.७०% |
| ६ | लागू नाही | ५ | ०.३०% |
| | **एकूण** | **१५८५** | १००.००% |

उपरोक्त तक्त्यानुसार प्रामुख्याने उदरनिर्वाहासाठी ६३६(४०.१ टक्के) व रोजगारासाठी १३ टक्के गोसावी समाजातील कुटुंबांनी स्थलांतर केले आहे. तर गरिबीमुळे ७२५ (४५.७० टक्के) कुटुंबांनी स्थलांतर केले आहे. ११ कुटुंबांनी इतर कारणामुळे स्थलांतर केले आहे.

**तक्ता क्र.१३**

**स्थलांतर**

| **जिल्हा** | **स्थलांतरीत सदस्य** | | | | | | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **१.** | **२.** | **३.** | **४.** | **५ व ५ पेक्षा जास्त** | **लागू नाही** | |
| पुणे | ७४ | ३३ | ५ | ० | ३ | ९५३ | **१०६८** |
| | ६.९% | ३.१% | ०.५% | ०.०% | ०.३% | ८९.२% | **१००.०%** |
| सांगली | ७३ | ४६ | ७ | ९ | ४ | ३७८ | **५१७** |
| | १४.१% | ८.९% | १.४% | १.७% | ०.८% | ७३.१% | **१००.०%** |
| **एकुण** | **१४७** | **७९** | **१२** | **९** | **७** | **१३३१** | **१५८५** |
| | **९.३%** | **५.०%** | **०.८%** | **०.६%** | **०.४%** | **८४.०%** | **१००.०%** |

तक्ता क्र. १३ नुसार कुटुंबातील एक सदस्य अर्थाजनासाठी  स्थलांतरीत झाल्याचे एकूण प्रमाण सर्वात जास्त आहे. हे प्रमाण ९.३ टक्के एवढे दिसते. सांगली जिल्ह्यात एक सदस्य स्थलांतरीत होण्याचे प्रमाण पुणे जिल्ह्याच्या तुलनेत अधिक असून ते १४.१ टक्के एवढे दिसते. तर दोन सदस्य स्थलांतर होण्याचे एकूण प्रमाण ५ टक्के एवढे आहे. उदरनिर्वाहाच्या साधनांची कमतरता, शिक्षणाचा अभाव व एकूणच मागासलेपण यामुळे पुणे जिल्ह्याच्या तुलनेत सांगली जिल्ह्यातील गोसावी समाजातील कुटुंबांच्या सदस्याचे स्थलांतराचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. एकूण ८४ टक्के कुटुंबातील सदस्य सद्य स्थितीत अर्थार्जनासाठी स्थलांतर करीत नसल्याने त्यांना हा प्रश्न लागू नसल्याचे दिसते.

**तक्ता क्र. १४**

**स्थायिक कालावधीचे प्रमाण**

| **अ.क्र.** | **स्थायिक कालावधी** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | ३० वर्षापूर्वी | **२०९** | **१३.२०%** |
| २ | ३० ते ६० वर्षापूर्वी | **२६५** | **१६.७०%** |
| ३ | ६० वर्षापेक्षा जास्त | **६०१** | **३७.९०%** |
| ४ | माहित नाही | **२८५** | **१८.००%** |
| ५ | लागू नाही | **२२५** | **१४.२०%** |
| | **एकूण** | **१५८५** | **१००.००%** |

वरील तक्त्यानुसार २६५ (१६.७ टक्के) गोसावी कुटुंबे ३०ते ६० वर्षापूर्वी स्थायिक झालेले असल्याचे सांगितले. २०९ (१३.२ टक्के) कुटुंबे ३० वर्षापूर्वी, ६०१ (३७.९ टक्के) कुटुंबे ६० वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून स्थायिक झाल्याची माहिती नोंदविली आहे. तर उर्वरित २८५ (१८ टक्के) लोकांनी माहित नाही तर २२५ (१४.२ टक्के) लोकांनी सदर प्रश्न लागू नसल्याची माहिती दिली.

**तक्ता क्र. १५**

**व्यसनाधीनता**

| **जिल्हा** | **व्यसन** | | **एकुण** |
|---|---|---|---|
| | **नाही** | **होय** | |
| पुणे | ५०६ | ५६२ | १०६८ |
| | ४७.४% | ५२.६% | १००.०% |
| सांगली | १७९ | ३३८ | ५१७ |
| | ३४.६% | ६५.४% | १००.०% |
| **एकुण** | **६८५** | **९००** | **१५८५** |
| | **४३.२%** | **५६.८%** | **१००.०%** |

वरील तक्त्यानुसार ९०० (५६.८ टक्के) कुटुंबांनी त्यांच्या कुटुंबात व्यसन करणाऱ्या व्यक्ती आहेत असे नमूद केले आहे. त्यापैकी सांगली जिल्हयातील गोसावी समाजात ६५.४ टक्के कुटुंबांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण दिसून येते. तर पुणे जिल्हयात हेच प्रमाण ५२.६ टक्के एवढे आहे. तर उर्वरित ४३.२ टक्के कुटुंबांनी त्यांच्यात व्यसन करणाऱ्या व्यक्ती नाहीत अशी माहिती दिलेली आहे.

**तक्ता क्र. १६**

**इतर जातीय समारंभात सहभाग**

| **जिल्हा** | **समारंभात सहभाग** | | **एकुण** |
|---|---|---|---|
| | **होय** | **नाही** | |
| पुणे | ८८८ | १८० | १०६८ |
| | ८३.१% | १६.९% | १००.०% |
| सांगली | ३३४ | १८३ | ५१७ |
| | ६४.६% | ३५.४% | १००.०% |
| **एकुण** | **१२२२** | **३६३** | **१५८५** |
| | **७७.१%** | **२२.९%** | **१००.०%** |

गोसावी समाजाच्या १५८५ कुटुंबापैकी ३६३ (२२.९) टक्के कुटुंबे इतर समाजातील लोकांच्या समारंभात सहभागी होत नाहीत. पुणे जिल्हयात हे प्रमाण १६.९ टक्के तर सांगली ३५.४ टक्के आहे. यासाठी सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे. तसेच ७७.१% कुटुंब इतर जातींच्या समारंभात सहभागी असतात.

**तक्ता क्र. १७**

**इतर जातीय समारंभात सहभागी न होण्याची कारणे**

| जिल्हा | | | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | जाती भेदामुळे | गरीबीमुळे | लागू नाही | |
| पुणे | १३६ | ४४ | ८८८ | १०६८ |
| | १२.७% | ४.१% | ८३.१% | १००.०% |
| सांगली | १६३ | २० | ३३४ | ५१७ |
| | ३१.५% | ३.९% | ६४.६% | १००.०% |
| **एकुण** | **२९९** | **६४** | **१२२२** | **१५८५** |
| | **१८.९%** | **४.०%** | **७७.१%** | **१००.०%** |

१८.९ टक्के कुटुंबांना जाती भेदामुळे इतर जातीय समारंभात सहभागी होता येत नाही. सांगली जिल्हयातील ३१.५ टक्के गोसावी कुटुंबाना सर्वाधिक प्रमाणात जाती भेदाला सामोरे जावे लागते. तर ४ टक्के लोकांना ते गरीब असल्यामुळे इतर जातीचे लोक त्यांच्या समारंभात सहभागी करून घेत नाहीत अशी माहिती दिलेली आहे. तर ७७.१ टक्के कुटुंबांना इतर जातींच्या समारंभात सहभागी होण्याचे कारण लागू नाही.

**तक्ता क्र. १८**

**समारंभात इतर जातीच्या लोकांचा सहभाग**

| जिल्हा | इतरांचा सहभाग | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | ८७६ | १९२ | १०६८ |
| | ८२.०% | १८.०% | १००.०% |
| सांगली | ३०५ | २१२ | ५१७ |
| | ५९.०% | ४१.०% | १००.०% |
| **एकुण** | **११८१** | **४०४** | **१५८५** |
| | **७४.५%** | **२५.५%** | **१००.०%** |

एकुण २५.५ टक्के कुटुंबांनी त्यांच्या समारंभात इतर जातीचे लोक सहभागी होत नसल्याचे संगितले आहे. सांगली जिल्हयामध्ये हे प्रमाण ४१.० टक्के तर पुणे जिल्हयात हे प्रमाण १८.० टक्के आहे. तर ७४.५ टक्के लोकांनी त्यांच्या समारंभात इतर जातीचे लोक सहभागी होतात अशी माहिती दिलेली आहे.

**तक्ता क्र. १९**

**इतर समुहाचे यासमुहाच्या समारंभात सहभागी न होण्याची कारणे**

| जिल्हा | कारण | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | भिती वाटते | जाती भेदामुळे | गरीबीमुळे | लागू नाही | |
| पुणे | ३ | १६४ | २५ | ८७६ | १०६८ |
| | ०.३% | १५.४% | २.३% | ८२.०% | १००.०% |
| सांगली | २ | १६० | ५० | ३०५ | ५१७ |
| | ०.४% | ३०.९% | ९.७% | ५९.०% | १००.०% |
| **एकुण** | **५** | **३२४** | **७५** | **११८१** | **१५८५** |
| | **०.३%** | **२०.४%** | **४.७%** | **७४.५%** | **१००.०%** |

तक्ता क्र.२० नुसार एकूण २५.५ टक्के लोकांनी त्यांच्या समारंभात इतर जातीचे लोक सहभागी होत नसल्याचे सांगितले आहे. त्यांचे मुख्य कारण जातीभेद असल्याचे २०.४ टक्के लोकांनी सांगितले आहे. ४.७ टक्के लोकांनी गरिबीमुळे त्यांच्या समारंभात इतर जातीचे लोक सहभागी होत नसल्याचे सांगितले आहे. ०.३ टक्के लोकांना भीतीमुळे सहभागी होत नसल्याबाबत माहिती दिली आहे. तर उर्वरित ७४.५ टक्के लोकांनी सदर बाब लागू नसल्याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. २०**

**इतर समुहाकडून मिळणारी वागणूक**

| जिल्हा | इतरांकडून मिळणारी वागणुक | | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | भेदभाव | समानता | दोन्ही | |
| पुणे | २९१ | ७६४ | १३ | १०६८ |
| | २७.२% | ७१.५% | १.२% | १००.०% |
| सांगली | १६७ | ३४६ | ४ | ५१७ |
| | ३२.३% | ६६.९% | ०.८% | १००.०% |
| **एकुण** | **४५८** | **१११०** | **१७** | **१५८५** |
| | **२८.९%** | **७०.०%** | **१.१%** | **१००.०%** |

एकुण २८.९ टक्के कुटुंबांना इतर समाजाकडून भेदभावाची वागणूक मिळते. सांगली जिल्हयातील गोसावी कुटुंबाना सर्वाधिक प्रमाणात भेदभावाला सामोरे जावे लागते. याठिकाणी ३२.३ टक्के कुटुंबांनी भेदभावाची वागणूक मिळत असल्याचे मत मांडले. तसेच पुणे जिल्हयातील गोसावी कुटुंबाना २७.२ टक्के भेदभावाची वागणूक मिळत असल्याचे मत मांडले. ७० टक्के लोकांनी त्यांना समानतेची वागणूक मिळत असल्याची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पुणे जिल्ह्यात ७१.५ टक्के व सांगली जिल्ह्यात ६६.९ टक्के लोकांनी त्यांना समानतेची वागणूक मिळत असल्याची माहिती दिली. **१.१ टक्के लोकांनी त्यांना समानता व भेदभाव अशी दोन्ही प्रकारची वागणूक मिळत असल्याची माहिती दिलेली आहे.**

**तक्ता क्र. २१**

**समुहाने राहण्याचे प्रमाण**

| जिल्हा | समुहाने राहणे | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | ९९२ | ७६ | १०६८ |
| | ९२.९% | ७.१% | १००.०% |
| सांगली | ४८० | ३७ | ५१७ |
| | ९२.८% | ७.२% | १००.०% |
| **एकुण** | **१४७२** | **११३** | **१५८५** |
| | **९२.९%** | **७.१%** | **१००.०%** |

गोसावी समाजामध्ये समुहाने राहण्याचे प्रमाण जास्त आहे. १४७२ (९२.९ टक्के) लोकांनी ते समुहाने राहत असल्याचे सांगितले आहे. तर ११३ (७.१ टक्के) लोकांनी ते समुहाने राहत नसल्याचे सांगितले आहे.

**तक्ता क्र. २२**

**हुंडा पद्धत**

| जिल्हा | हुंडापध्दत | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | ३९४ | ६७४ | १०६८ |
| | ३६.९% | ६३.१% | १००.०% |
| सांगली | २४७ | २७० | ५१७ |
| | ४७.८% | ५२.२% | १००.०% |
| **एकुण** | **६४१** | **९४४** | **१५८५** |
| | **४०.४%** | **५९.६%** | **१००.०%** |

गोसावी समाजात हुंडा देण्याची प्रथा असल्याचे एकूण ४०.४ टक्के कुटुंबांचे म्हणणे आहे. यापैकी सर्वात जास्त ४७.८ प्रमाण हे सांगली जिल्हयात दिसून येते. पुणे जिल्हयामध्ये ३६.९ टक्के गोसावी कुटुंबांमध्ये हुंडा देण्याची प्रथा असल्याचे दिसून येते. तर उर्वरित ५९.६ टक्के कुटुंबांनी त्यांच्यात हुंडा पद्धत नसल्याची माहिती दिली आहे. पुणे जिह्यात हुंडा न घेण्याचे प्रमाण ६३.१ टक्के तर सांगली जिल्यात हे प्रमाण ५२.२ टक्के आहे.

**तक्ता क्र. २३**

**हुंडा देणेबाबत स्थिती**

| जिल्हा | हुंडा कोणाला देतात | | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | स्त्री | पुरुष | लागू नाही | |
| पुणे | २५६ | १३८ | ६७४ | १०६८ |
| | २४.०% | १२.९% | ६३.१% | १००.०% |
| सांगली | २११ | ३६ | २७० | ५१७ |
| | ४०.८% | ७.०% | ५२.२% | १००.०% |
| **एकुण** | **४६७** | **१७४** | **९४४** | **१५८५** |
| | **२९.५%** | **११.०%** | **५९.६%** | **१००.०%** |

वरील तक्त्यानुसार २९.५ टक्के हुंडा हा स्त्रीला तर ११ टक्के हुंडा पुरुषांना देतात अशी माहिती सांगितली आहे. यावरून स्त्रीला हुंडा देण्याचे प्रमाण आढळून आले आहे. तर उर्वरित ५९.६ टक्के कुटुंबाला हुंडा देण्याची व घेण्याची प्रथा लागू नाही.

**तक्ता क्र.२४**

**रोटी-बेटी व्यवहार**

| जिल्हा | रोटी-बेटी व्यवहार | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | ३१६ | ७५२ | १०६८ |
| | २९.६% | ७०.४% | १००.०% |
| सांगली | १२६ | ३९१ | ५१७ |
| | २४.४% | ७५.६% | १००.०% |
| **एकुण** | **४४२** | **११४३** | **१५८५** |
| | **२७.९%** | **७२.१%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यानुसार ७२.१ टक्के लोकांनी त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत नसल्याची माहिती दिलेली आहे. यावरून गोसावी समाजामध्ये इतर समाजाबरोबर कमी प्रमाणात रोटी-बेटी व्यवहार होत असल्याचे दिसून येते.

तर २७९ टक्के लोकांनी त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत असल्याची माहिती दिलेली आहे त्यापैकी पुणे जिल्ह्यांमध्ये २९.६ टक्के प्रमाण दिसून येते. तर सांगली जिल्ह्यांमध्ये २४.४ टक्के एवढे प्रमाणआहे.

**तक्ता क्र. २५**

**जात पंचायत**

| जिल्हा | जात पंचायत | | एकुण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| पुणे | ४२० | ६४८ | १०६८ |
| | ३९.३% | ६०.७% | १००.०% |
| सांगली | १८२ | ३३५ | ५१७ |
| | ३५.२% | ६४.८% | १००.०% |
| **एकुण** | **६०२** | **९८३** | **१५८५** |
| | **३८.०%** | **६२.०%** | **१००.०%** |

एकुण ६२ टक्के कुटुंबानी जातपंचायत असल्याचे सांगितले. पुणे व सांगली या जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण अनुक्रमे ६०.७ टक्के व ६४.८ टक्के एवढे आहे. तर उर्वरित ३८ टक्के लोकांनी जातपंचायत नसल्याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. २६**

**जात पंचायतींकडून सोडविल्या जाणाऱ्या समस्या**

| जिल्हा | समस्यांचे प्रकार | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | कौटुंबिक /विवाह संबधित/स्त्रियां वरील अत्याचार | सर्व समस्या | लागू नाही | इतर | |
| पुणे | १६९ | ५४० | ३३७ | २२ | १०६८ |
| | १५.८% | ५०.६% | ३१.६% | २.१% | १००.०% |
| सांगली | ६८ | ३१२ | १११ | २६ | ५१७ |
| | १३.२% | ६०.३% | २१.५% | ५.०% | १००.०% |
| **एकुण** | **२३७** | **८५२** | **४४८** | **४८** | **१५८५** |
| | **१५.०%** | **५३.८%** | **२८.३%** | **३.०%** | **१००.०%** |

तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे १५ टक्के लोकांनी त्याच्या कौटुंबिक / विवाह संबधित / स्त्रियांवरील अत्याचार याबाबतच्या समस्या जातपंचायत मध्ये सोडविल्या जातात अशी माहिती दिली. तर ५३.८ टक्के लोकांनी त्यांच्या सर्व प्रकारच्या समस्या (कौटुंबिक/विवाहसंबधित /स्त्रिया वरील अत्याचार इत्यादी) जातपंचायतीकडून

सोडवल्या जातात अशी माहिती दिली आहे. २८.३ टक्के कुटुंबांनी जातपंचायत लागू नाही असे मत नोंदविले आहे तर ३ टक्के कुटुंबांनी इतर समस्या बाबत मत स्पष्ट केलेले आहे.

**तक्ता क्र. २७**

**जात पंचायतींकडून देण्यात येणाऱ्या शिक्षा**

| **जिल्हा** | **शिक्षेचे स्वरुप** | | | | | | | | | | | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **वाळीत टाकणे** | **वाळीत टाकणे व समज** | **दंड व वाळीत टाकणे** | **दंड / शारीरीक शिक्षा** | **दंड** | **दंड / समजदेणे** | **शारीरिक शिक्षा** | **समज देणे** | **सर्व** | **माहित नाही** | **लागू नाही** | |
| पुणे | १६ | ५ | २५ | २ | ६८ | ११३ | ० | २४४ | २३२ | २६७ | ९६ | १०६८ |
| | १.५% | ०.५% | २.३% | ०.२% | ६.४% | १०.६% | ०.०% | २२.८% | २१.७% | २५.०% | ९.०% | १००.०% |
| सांगली | १ | ४ | ८ | १ | ४३ | ९२ | १ | ११२ | ११० | ८८ | ५७ | ५१७ |
| | ०.२% | ०.८% | १.५% | ०.२% | ८.३% | १७.८% | ०.२% | २१.७% | २१.३% | १७.०% | ११.०% | १००.०% |
| **एकुण** | **१७** | **९** | **३३** | **३** | **१११** | **२०५** | **१** | **३५६** | **३४२** | **३५५** | **१५३** | **१५८५** |
| | **१.१%** | **०.६%** | **२.१%** | **०.२%** | **७.०%** | **१२.९%** | **०.१%** | **२२.५%** | **२१.६%** | **२२.४%** | **९.७%** | **१००.०%** |

वरील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे जातपंचायत मध्ये वेगवेगळ्या समस्या यावर निर्णय घेतले जातात तसेच काही शिक्षा सुद्धा दिल्या जातात. १.१ टक्के लोकांनी वाळीत टाकणे, ०.६ टक्के लोकांनी वाळीत टाकणे व समज देणे, २.१ टक्के दंड व वाळीत टाकणे, ०.२ टक्के लोकांनी दंड/शारीरिक शिक्षा, ७ टक्के लोकांनी दंड, १२.९ टक्के लोकांनी दंड/समज देणे, २२.५ टक्के लोकांनी समज देणे अशा प्रकारच्या शिक्षा देत असल्याची माहिती दिली आहे. २१.६ टक्के लोकांनी सर्व प्रकारच्या शिक्षा (वाळीत टाकणे, समज देणे, दंड देणे, शारीरिक शिक्षा, इत्यादी ) दिल्या जातात अशी माहिती नोंदविली आहे. २२.४ टक्के कुटुंबाला जात पंचायती कडून देण्यात येणाऱ्या शिक्षेबाबत माहिती नसल्याचे सांगितले तर ३.७ टक्के कुटुंबाला जातपंचायत लागू नसल्याचे मत नोंदविले आहे.

**तक्ता क्र. २८**

**शासकीय योजनेची माहिती**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | १७ | १०५१ | १०६८ |
| | १.६% | ९८.४% | १००.०% |
| सांगली | २७ | ४९० | ५१७ |
| | ५.२% | ९४.८% | १००.०% |
| **एकुण** | **४४** | **१५४१** | **१५८५** |
| | **२.८%** | **९७.२%** | **१००.०%** |

तक्ता क्र. २९ नुसार एकुण ९७.२ टक्के गोसावी कुटुंबांना शासकीय योजनेची माहिती नाही. पुणे जिल्हयातील गोसावी कुटुंबांमध्ये शासकीय योजनेची माहिती नसल्याचे प्रमाण (९८.४ टक्के) तुलनेने जास्त आहे. तर सांगली जिल्हयात हे प्रमाण ९४.८ टक्के आहे. सर्व समाजास शासकीय योजनेची माहिती असल्याचे प्रमाण केवळ २.८ टक्के आहे.

**तक्ता क्र. २९**

**महिती असणाऱ्या योजना**

| जिल्हा | योजनेचे नांव | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | घरकुल | घरकुल आणि इंदिरा गांधी आवास योजना | इंदिरा आवास योजना | राष्ट्रीय कल्याण निधी | शिष्यवृती | लागू नाही | |
| पुणे | १२ | १ | ३ | ० | १ | १०५१ | १०६८ |
| | १.१% | ०.१% | ०.३% | ०.०% | ०.१% | ९८.४% | १००.०% |
| सांगली | २० | ० | ६ | १ | ० | ४९० | ५१७ |
| | ३.९% | ०.०% | १.२% | ०.२% | ०.०% | ९४.८% | १००.०% |
| एकुण | ३२ | १ | ९ | १ | १ | १५४१ | १५८५ |
| | २.०% | ०.१% | ०.६% | ०.१% | ०.१% | ९७.२% | १००.०% |

गोसावी समाजातील ४४ कुटुंबांना म्हणजे २.८ टक्के कुटुंबाना शासकीय योजनेची माहिती आहे. त्यामध्ये ३२ (२ टक्के) लोकांना योजनेची माहिती आहे. ९ लोकांना इंदिरा आवास योजनेची माहिती आहे. तर अनुक्रमे १ व्यक्तीने घरकुल आणि इंदिरा गांधी आवास योजना व राष्ट्रीय कल्याण निधी या योजनेची माहिती आहे अशी महिती दिली आहे. उर्वरित ९७.२ टक्के कुटुंबाना कोणत्याही योजनेची माहिती नाही.

**तक्ता क्र. ३०**

**योजनेचा लाभ न मिळाल्याची कारणे व त्याचे प्रमाण**

| जिल्हा | योजनांची माहिती नव्हती | कागदपत्राची पूर्तता करण्यास असमर्थता | अंमल बजावणी अधिकाऱ्याकडून उदासीनता | आवश्यक असणारी रक्कम न भरता येणे | पात्रता नसणे | दिरंगाई | इतर | सर्व | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुणे | ७०१ | १८८ | १० | ३० | ४९ | १२ | ७४ | ४ | १०६८ |
| | ६५.६% | १७.६% | ०.९% | २.८% | ४.६% | १.१% | ६.९% | ०.४% | १००.०% |
| सांगली | ३१३ | ३ | २ | ० | ४१ | ४८ | ४९ | ६१ | ५१७ |
| | ६०.५% | ०.६% | ०.४% | ०.०% | ७.९% | ९.३% | ९.५% | ११.८% | १००.०% |
| एकुण | १०१४ | १९१ | १२ | ३० | ९० | ६० | १२३ | ६५ | १५८५ |
| | ६४.०% | १२.१% | ०.८% | १.९% | ५.७% | ३.८% | ७.८% | ४.१% | १००.०% |

गोसावी समाजामध्ये ६४ टक्के लोकांनी योजनांची माहिती नव्हती असे सांगितले आहे. १२.१ टक्के लोकांनी कागदपत्रांची पूर्तता करण्यास असमर्थ असल्याचे सांगितले. ५.७ टक्के लोकांनी ते योजनेस पात्र नव्हते अशी माहिती नोंदविली आहे. १.९ टक्के लोक योजनेस आवश्यक असणारी रक्कम भरू शकले नाही, ०.८ टक्के लोकांनी अधिकाऱ्यांनी उदासीनता दाखवली व ३.८ टक्के लोकांनी योजनेचा लाभ मिळण्यास विलंब होत असल्याची माहिती दिलेली आहे. ७.८ टक्के कुटुंबांनी स्पर्धा अशा इतर कारणामुळे शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याची माहिती दिलेली आहे.

**तक्ता क्र. ३१**

**जिल्हानिहाय संघटनेचे प्रमाण**

| जिल्हा | संघटना | | एकुण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| पुणे | १६० | ९०८ | १०६८ |
| | १५.०% | ८५.०% | १००.०% |
| सांगली | ५८ | ४५९ | ५१७ |
| | ११.२% | ८८.८% | १००.०% |
| एकुण | २१८ | १३६७ | १५८५ |
| | १३.८% | ८६.२% | १००.०% |

गोसावी समाजातील ८६.२ टक्के कुटुंबांनीया समाजाच्या संघटना असल्याचे सांगितले. संघटना असण्याचे प्रमाण पुणे जिल्ह्यांच्या तुलनेत सांगली जिल्ह्यात जास्त आहे. पुणे जिल्ह्यात ८५.० टक्के तर सांगली

जिल्ह्यात ८८.८ टक्के अशा संघटना असल्याचे सांगण्यात आले असून १३.८ कुटुंबांनी संघटना नसल्याचे नमूद केले.

### तक्ता क्र. ३२

### संघटनेकडून मदत करण्याचे प्रमाण

| जिल्हा | संघटनांकडून केल्या जाणाऱ्या मदतीचे प्रकार | | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जातीचे प्रमाणपत्र व जागरूकता | शासकीय योजनांची माहिती | लोक प्रबोधन करणे | शैक्षणिक आणि सामाजिक विकास | कोणतीही मदत नाही | जातीचे प्रमाणपत्र व शासकीय योजनांची माहिती | जातीच्या दाखल्यासाठी | जागरूकता, शैक्षणिक आणि सामाजिक विकास | सर्व | |
| पुणे | ८ | ७० | १९४ | २३६ | ३४३ | ६ | ९४ | ३३ | ८४ | १०६८ |
| | ०.७% | ६.६% | १८.२% | २२.१% | ३२.१% | ०.६% | ८.८% | ३.१% | ७.९% | १००.०% |
| सांगली | १४ | ११ | ११९ | १०१ | १७३ | ० | ५ | १७ | ७७ | ५१७ |
| | २.७% | २.१% | २३.०% | १९.५% | ३३.५% | ०.०% | १.०% | ३.३% | १४.९% | १००.०% |
| **एकुण** | **२२** | **८१** | **३१३** | **३३७** | **५१६** | **६** | **९९** | **५०** | **१६१** | **१५८५** |
| | **१.४%** | **५.१%** | **१९.७ %** | **२१.३%** | **३२.६%** | **०.४%** | **६.२%** | **३.२%** | **१०.२%** | **१००.०%** |

सद्य स्थिती मध्ये दोन्ही जिल्ह्यात कार्यरत असलेल्या गोसावी समाजाच्या संघटना यांच्याकडून १९.७ टक्के लोकांना लोक प्रबोधन जागरूकता मिळते. १.४ टक्के लोकांनी त्यांना जातीचे प्रमाणपत्र व जागरूकता यासाठी संघटनेची मदत होते अशी माहिती दिली. २१.३ टक्के लोकांनी शैक्षणिक आणि सामाजिक विकास करण्यासाठी, ६.२ टक्के लोकांनी जातीच्या दाखल्यासाठी ५.१ टक्के लोकांनी शासकीय योजनांची माहिती होण्याबाबत संघटनेची मदत होते अशी माहिती दिलेली आहे. गोसावी समाजामध्ये संघटनेकडून मदत न करण्याचे एकुण प्रमाण ३२.६ टक्के एवढे दिसून येत आहे. सांगली जिल्हयामध्ये ३३.५ टक्के आहे. तर पुणे जिल्हयामध्ये हे प्रमाण ३२.१ टक्के असल्याचे दिसून येत आहे.

**तक्ता क्र. ३३**

**संघटनेकडून मदतीसाठी मागणी करण्यात येण्याचे प्रमाण**

| जिल्हा | मागणी | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | लोक वर्गणी | वस्तूंच्या स्वरूपात मागणी | कोणतीही मागणी नाही | लागू नाही | |
| पुणे | ५८ | ३६ | ९४३ | ३१ | १०६८ |
| | ५.४% | ३.४% | ८८.३% | २.९% | १००.०% |
| सांगली | २० | ३ | ४७७ | १७ | ५१७ |
| | ३.९% | ०.६% | ९२.३% | ३.३% | १००.०% |
| **एकुण** | **७८** | **३९** | **१४२०** | **४८** | **१५८५** |
| | **४.९%** | **२.५%** | **८९.६%** | **३.०%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यानुसार ज्यावेळी वेगवेगळया कामांसाठी संघटना गोसावी समाजातील लोकांना मदत करते त्यावेळी यासाठी कोणती मागणी करतात का अशा प्रश्न विचारला असता २.५ टक्के लोकांनी वस्तुंच्या स्वरुपात मागणी करतात, ४.९ टक्के लोकांनी लोक वर्गणी  मागतात, तर ८९.६ टक्के लोकांनी कोणतीही मागणी केली जात नाही अशी माहिती दिली. पुणे जिल्ह्यात सर्वच प्रकारच्या मागणीचे प्रमाण जास्त आढळते. तुलनेने सांगली जिल्ह्यात प्रमाण कमी आहे.

**तक्ता क्र.३४**

**कुटुंबातील सदस्यांचे जात प्रमाणपत्र असण्याचे प्रमाण**

| लिंग | जात प्रमाणपत्र | | एकूण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| **स्त्री** | ४६३ | ३५५२ | ४०१५ |
| | १२.००% | ८८.००% | १००% |
| **पुरुष** | ८६५ | ३३८४ | ४२४९ |
| | २०.००% | ८०.००% | १००% |
| **एकूण** | **१३२८** | **६९३६** | **८२६४** |
| | **१६.०७%** | **८३.९३%** | **१००%** |

वरील तक्त्यानुसार असे निदर्शनास येते कि, फक्त १६.०७ टक्के गोसावी कुटुंबाकडे जात प्रमाणपत्र आहेत. तर उर्वरित ८३.९३ टक्के गोसावी कुटुंबाकडे जात प्रमाणपत्र नाहीत. १२ टक्के स्त्रिया तर २० टक्के पुरुषाकडे जात प्रमाणपत्र असल्याचे आढळते.

**तक्ता क्र.३५**

**कुटुंबातील सदस्यांकडे आधार कार्ड असण्याचे प्रमाण**

| लिंग | आधार कार्ड | | एकूण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| स्त्री | ३६२४ | ३९१ | ४०१५ |
| | ९०.००% | १०.००% | १००.००% |
| पुरुष | ३८८६ | ३६३ | ४२४९ |
| | ९१.००% | ९.००% | १००.००% |
| **एकूण** | **७५१०** | **७३५** | **८२६४** |
| | **९०.८७%** | **९.१३%** | **१००%** |

वरील तक्त्या नुसार असे निदर्शनास येते कि, फक्त ९०.८७ टक्के गोसावी कुटुंबाकडे आधारकार्ड आहेत. तर उर्वरित ८.८९ टक्के गोसावी कुटुंबाकडे आधारकार्ड नाहीत.

**तक्ता क्र. ३६**

**कुटुंबातील सदस्यांकडे मतदान कार्ड असण्याचे प्रमाण**

| लिंग | मतदान कार्ड | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | लागू नाही | माहिती अप्राप्त | |
| स्त्री | २१६९ | ४५५ | १३९१ | ० | **४०१५** |
| | ५४% | ११% | ३५% | ०% | **१००%** |
| पुरुष | २२७४ | ३४६ | १६२७ | २ | **४२४९** |
| | ५४% | ८% | ३८% | ०% | **१००%** |
| एकूण | ४४४३ | ८०१ | ३०१८ | २ | **८२६४** |
| | **५३.७६%** | **९.६९%** | **३६.५२%** | **०.०२%** | **१००%** |

वरील तक्त्या नुसार असे निदर्शनास येते कि, फक्त ५३.७६ टक्के गोसावी कुटुंबाकडे मतदानकार्ड आहेत. तर उर्वरित ९.६९ टक्के गोसावी कुटुंबाकडे मतदानकार्ड नाहीत. ३६.५२ टक्के लोकांना सदर बाब लागू होत नाही कारण ते १८ वर्षापेक्षा कमी वयोगटात असल्याची शक्यता आहे.

**तक्ता क्र. ३७**

**बाबा-बुवा यांना मानणाऱ्याचे प्रमाण**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | ५११ | ५५७ | १०६८ |
| | ४७.८% | ५२.२% | १००.०% |
| सांगली | ३४७ | १७० | ५१७ |
| | ६७.१% | ३२.९% | १००.०% |
| **एकुण** | **८५८** | **७२७** | **१५८५** |
| | **५४.१%** | **४५.९%** | **१००.०%** |

गोसावी समाजात बाबा-बुवा यांना मानणाऱ्याचे ५४.१ टक्के प्रमाण आहे. यापैकी सांगली जिल्ह्यात ६७.१ टक्के तर पुणे जिल्ह्यामध्ये ४७.८ टक्के बाबा-बुवा यांना मानतात. यावरुन समाजामध्ये असणारी अंधश्रध्दा किती प्रमाणात आहे. याची कल्पना येते. तर ४५.९ टक्के कुटुंबांनी बाबा- बुवा यांना मानत नसल्याचे स्पष्ट केले.

**तक्ता क्र. ३८**

**जिल्हा निहाय धार्मिक विधीसाठी प्राणी बलिदान देण्याचे प्रमाण**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | १०२७ | ४१ | १०६८ |
| | ९६.२% | ३.८% | १००.०% |
| सांगली | ४९० | २७ | ५१७ |
| | ९४.८% | ५.२% | १००.०% |
| **एकुण** | **१५१७** | **६८** | **१५८५** |
| | **९५.७%** | **४.३%** | **१००.०%** |

गोसावी समाजामध्ये धार्मिक विधीसाठी प्राणी बलिदान देण्याचे प्रमाण ९५.७ टक्के दिसून येते. पुणे जिल्ह्यामध्ये हेच प्रमाण (९६.२ टक्के) एकुण तुलनेने जास्त दिसत आहे. तर सांगली जिल्ह्यामध्ये ९४.८ टक्के प्रमाण दिसून येत आहे. केवळ ४.३ टक्के कुटुंब धार्मिक विधीसाठी प्राणी बलिदान देत नाहीत.

### तक्ता क्र. ३९
### पत्रिका जुळवून विवाहाची स्थिती

| जिल्हा | पत्रिका जुळवून विवाह | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | ५५२ | ५१६ | १०६८ |
| | ५१.७% | ४८.३% | १००.०% |
| सांगली | १५५ | ३६२ | ५१७ |
| | ३०.०% | ७०.०% | १००.०% |
| **एकुण** | **७०७** | **८७८** | **१५८५** |
| | **४४.६%** | **५५.४%** | **१००.०%** |

गोसावी समाजात पत्रिका जुळवून विवाह करण्याचे प्रमाण ४४.६ टक्के दिसून येते. पुणे जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ५१.७ टक्के तर सांगली जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ३०.० टक्के एवढे आहे. तर उर्वरित ५५.४ टक्के लोकांनी ते लग्न जुळविताना पत्रिका पाहत नसल्याची माहिती दिली.

### तक्ता क्र. ४०
### जिल्हा निहाय जादूटोणा मानणाऱ्याचे प्रमाण

| जिल्हा | जादूटोणा | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | ३७२ | ६९६ | १०६८ |
| | ३४.८% | ६५.२% | १००.०% |
| सांगली | २४६ | २७१ | ५१७ |
| | ४७.६% | ५२.४% | १००.०% |
| **एकुण** | **६१८** | **९६७** | **१५८५** |
| | **३९.०%** | **६१.०%** | **१००.०%** |

गोसावी समाजातील एकूण ३९.० टक्के कुटुंब जादूटोणा मानत असल्याचे सांगतात. सांगली जिल्ह्यामध्ये जादूटोणावर विश्वास ठेवण्याचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. हे प्रमाण ४७.६ टक्के एवढे आहे. तर पुणे जिल्ह्यामध्ये ३४.८ टक्के प्रमाण दिसून येते. तसेच एकूण कुटुंबापैकी ६१ टक्के कुटुंब जादूटोणा मानत नसून पुणे जिल्ह्यातील हे प्रमाण ६५.२ टक्के तर सांगली जिल्ह्यात ५२.४ टक्के कुटुंब जादूटोणा मानत नाही.

**तक्ता क्र. ४१**

**जादूटोणा केला आहे का?**

| जिल्हा | जादूटोणा | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | १२६ | ९४२ | १०६८ |
| | ११.८% | ८८.२% | १००.०% |
| सांगली | ९६ | ४२१ | ५१७ |
| | १८.६% | ८१.४% | १००.०% |
| **एकुण** | **२२२** | **१३६३** | **१५८५** |
| | **१४.०%** | **८६.०%** | **१००.०%** |

एकुण १४ टक्के कुटुंबाना आपल्यावर कोणी तरी जादूटोणा केला आहे असे वाटते. सांगली जिल्ह्यामध्ये जादूटोणा केल्याचे प्रमाण सर्वाधिक १८.६ टक्के दिसून येते तर पुणे जिल्ह्यात हेच प्रमाण ११.८ टक्के दिसून येते. तर ८६ टक्के कुटुंबांनी जादूटोणा करत नसल्याचे स्पष्ट केलेले आहे.

**तक्ता क्र. ४२**

**अंगात येणाऱ्याचे प्रमाण**

| जिल्हा | अंगात येणे | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | ४१६ | ६५२ | १०६८ |
| | ३९.०% | ६१.०% | १००.०% |
| सांगली | २३३ | २८४ | ५१७ |
| | ४५.१% | ५४.९% | १००.०% |
| **एकुण** | **६४९** | **९३६** | **१५८५** |
| | **४०.९%** | **५९.१%** | **१००.०%** |

गोसावी समाजातील ४०.९ टक्के कुटुंबाच्या अंगात येत असल्याचे नमूद केलेले असून अंगात येणे ही प्रथा सांगली जिल्ह्यात जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येते. हे प्रमाण ४५.१ टक्के एवढे आहे. तर पुणे जिल्हयात हे प्रमाण ३९.० टक्के दिसून येते. अंगात न येण्याचे प्रमाण ५९.१ टक्के असून पुणे जिल्ह्यात हे प्रमाण ६१ टक्के तर सांगली जिल्ह्यात ५४.९ टक्के आहे.

### तक्ता क्र. ४३

### मासिक पाळी असता बाजूला बसविणे

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | १००१ | ६७ | १०६८ |
| | ९३.७% | ६.३% | १००.०% |
| सांगली | ४७८ | ३९ | ५१७ |
| | ९२.५% | ७.५% | १००.०% |
| **एकुण** | **१४७९** | **१०६** | **१५८५** |
| | **९३.३%** | **६.७%** | **१००.०%** |

मासिक पाळीमध्ये महिलांना विटाळ मानणाऱ्या गोसावी कुटुंबाचे प्रमाण ९३.३ टक्के एवढे दिसून येते. पुणे जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ९३.७ टक्के तर सांगली जिल्ह्यामध्ये ९२.५ टक्के प्रमाण असून विटाळ न मानणाऱ्याचे प्रमाण ६.७ टक्के आढळते.

### तक्ता क्र. ४४

### स्त्रीयांना असणाऱ्या जटांची स्थिती

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | ४८ | १०२० | १०६८ |
| | ४.५% | ९५.५% | १००.०% |
| सांगली | १३ | ५०४ | ५१७ |
| | २.५% | ९७.५% | १००.०% |
| **एकुण** | **६१** | **१५२४** | **१५८५** |
| | **३.८%** | **९६.२%** | **१००.०%** |

गोसावी समाजात जटा असण्याचे प्रमाण अत्यंत अल्प म्हणजे ३.८ टक्के एवढे आहे. पुणे जिल्ह्यामध्ये हे प्रमाण (४.५ टक्के) तुलनेने जास्त आहे. तर सांगली जिल्ह्यामध्ये हे प्रमाण २.५ टक्के आहे. परंतु स्त्रियांना जटा नसल्याचे प्रमाण ९६.२ टक्के आहे.

**तक्ता क्र. ४५**

**मुलीचे लग्नाच्या वयाची स्थिती**

| | मुलीचे लग्नाचे वय | | | | |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | १० वर्षाच्या आत | १० ते १८ वर्ष | १८ च्या पुढे | १० ते १८ व १८ पेक्षा जास्त | एकुण |
| पुणे | ९ | ४२४ | ६२७ | ८ | १०६८ |
| | ०.८०% | ३९.७०% | ५८.७०% | ०.७०% | १००.००% |
| सांगली | २ | २९० | २२५ | ० | ५१७ |
| | ०.४०% | ५६.१०% | ४३.५०% | ०.००% | १००.००% |
| **एकुण** | **११** | **७१४** | **८५२** | **८** | **१५८५** |
| | **०.७०%** | **४५.००%** | **५३.८०%** | **०.५०%** | **१००.००%** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ११ (०.७० टक्के) कुटुंबांनी १० वर्षाच्या आत मुलीचे लग्न झाल्याची नोंद केलेली आहे. ७१४ (४५ टक्के ) गोसावी समाजातील मुलीचे विवाह १० ते १८ वर्ष या वयोगटात केले जाते अशी माहिती दिलेली आहे. त्यावरून या समाजात महिला बाल विवाहाचे प्रमाण खूप जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येते. तर ५३.८ टक्के मुलीचे विवाह १८ वर्षे च्या पुढे होत असल्याचे दिसून येते. तर ८ उत्तरदात्यांनी १० ते १८ हा वयोगट व १८ पेक्षा जास्त अशा दोन्ही वयोगटात लग्न होत असल्याबाबत माहिती दिलेली आहे.

**तक्ताक्र. ४६**

**भिक्षा मागणाऱ्याचे प्रमाण**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | २१५ | ८५३ | १०६८ |
| | २०.१% | ७९.९% | १००.०% |
| सांगली | १९३ | ३२४ | ५१७ |
| | ३७.३% | ६२.७% | १००.०% |
| **एकुण** | **४०८** | **११७७** | **१५८५** |
| | **२५.७%** | **७४.३%** | **१००.०%** |

गोसावी समाजामध्ये भिक्षा मागणाऱ्याचे प्रमाण २५.७ टक्के आहे. पुणे जिल्हयापेक्षा सांगली जिल्ह्यामध्ये हेच प्रमाण ३७.३ टक्के आहे तर पुणे जिल्ह्यामध्ये २०.१ टक्के एवढे आहे. तसेच भिक्षा न मागणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ७४.३ टक्के असून पुणे जिल्ह्यातील प्रमाण ७९.९ टक्के तर सांगली जिल्ह्यात ६२.७ टक्के आढळते.

**तक्ता क्र. ४७**

**बाळंतपणात विटाळ मानणे**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | १०३८ | ३० | १०६८ |
| | ९७.२% | २.८% | १००.०% |
| सांगली | ४८३ | ३४ | ५१७ |
| | ९३.४% | ६.६% | १००.०% |
| **एकुण** | **१५२१** | **६४** | **१५८५** |
| | **९६.०%** | **४.०%** | **१००.०%** |

गोसावी समाजात महिला बाळंत झाल्यावर विटाळ मानणाऱ्याचे प्रमाण ९६ टक्के असून पुणे व सांगली या दोन जिल्ह्यामध्ये मोठे प्रमाण दिसून येते. पुणे जिल्ह्यामध्ये ९७.२ टक्के तर सांगली जिल्ह्यामध्ये ९३.४ टक्के प्रमाण आहे. तसेच विटाळ न मानणाऱ्याचे प्रमाण केवळ ४ टक्के आहे.

**तक्ता क्र. ४८**

**मुल जन्माच्या ५ व्या दिवशी सटवाईची पूजा करणे**

| जिल्हा | सटवाई पुजा | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | ५८५ | ४८३ | १०६८ |
| | ५४.८% | ४५.२% | १००.०% |
| सांगली | २४५ | २७२ | ५१७ |
| | ४७.४% | ५२.६% | १००.०% |
| **एकुण** | **८३०** | **७५५** | **१५८५** |
| | **५२.४%** | **४७.६%** | **१००.०%** |

गोसावी समाजात बाळ जन्मल्यानंतर सटवाईची पूजा करण्याचे ५२.४ टक्के प्रमाण दिसून येते. पुणे जिल्ह्यामध्ये हे प्रमाण (५४.८ टक्के) तुलनेने जास्त प्रमाणात दिसून येते. तर सांगली जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ४७.४ टक्के दिसून येते. सटवाईची पूजा न करण्याचे प्रमाण ४७.६ टक्के कुटुंबात आढळते

**तक्ता क्र. ४९**

**आजारी पडल्यास उपचाराबाबत स्थिती**

| जिल्हा | उपचाराचे प्रकार | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | घरगुती उपचार | भगत | पारंपारिक वैद्य | दवाखाना | घरगुती उपचार व दवाखाना | दवाखाना व भगत | सर्व | |
| पुणे | ८ | ७४ | १५ | ६६६ | ५० | १६२ | ९३ | १०६८ |
| | ०.७% | ६.९% | १.४% | ६२.४% | ४.७% | १५.२% | ८.७% | १००.०% |
| सांगली | ६ | ११५ | ५ | १९९ | २५ | १०१ | ६६ | ५१७ |
| | १.२% | २२.२% | १.०% | ३८.५% | ४.८% | १९.५% | १२.८% | १००.०% |
| **एकुण** | **१४** | **१८९** | **२०** | **८६५** | **७५** | **२६३** | **१५९** | **१५८५** |
| | **०.९%** | **११.९%** | **१.३%** | **५४.६%** | **४.७%** | **१६.६%** | **१०.०%** | **१००.०%** |

गोसावी समाजामध्ये आजारी पडल्यास दवाखान्यात उपचार घेण्याचे प्रमाण ५४.६ टक्के आहे. तर पुणे जिल्ह्यामध्ये हेच प्रमाण (६२.४ टक्के) तर सांगली जिल्ह्यामध्ये ३८.५ टक्के आहे. ११.९ टक्के लोक भगताकडे जाऊन उपचार घेतात. १६.६ टक्के लोकांनी दवाखाना व भगत अशा दोन्ही ठिकाणी जाऊन आजारी पडल्यास उपचार घेत असलेबाबत माहिती दिलेली आहे. १० टक्के लोक सर्व ठिकाणी म्हणजे घरगुती उपचार, भगत, पारंपारिक वैद्य, दवाखाना अशा सर्व ठिकाणी जाऊन उपचार घेत असल्याबाबत माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. ५०**

**कुटुंबात दिर्घकालीन आजाराबाबत स्थिती**

| जिल्हा | दीर्घकालीन आजार | | एकुण |
|---|---|---|---|
| | होय | नाही | |
| पुणे | १७० | ८९८ | १०६८ |
| | १५.९% | ८४.१% | १००.०% |
| सांगली | ६१ | ४५६ | ५१७ |
| | ११.८% | ८८.२% | १००.०% |
| **एकुण** | **२३१** | **१३५४** | **१५८५** |
| | **१४.६%** | **८५.४%** | **१००.०%** |

गोसावी समाजातील कुटुंबामध्ये दीर्घकालीन आजार असण्याचे प्रमाण १४.६ टक्के आहे. यामध्ये सांगली जिल्ह्यामध्ये तुलनेत पुणे जिल्ह्यामध्ये १५.९ टक्के एवढे आहे. तर सांगली जिल्ह्यामध्ये ११.८ टक्के

प्रमाण दिसून येते. तसेच दीर्घकालीन आजार नसलेल्या कुटुंबाचे प्रमाण ८५.४ टक्के आहे. पुणे जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ८४.१ टक्के तर सांगली जिल्ह्यामध्ये ८८.२ टक्के आहे.

**तक्ता क्र. ५१**

**गोवर आजार पाळणाऱ्याचे प्रमाण**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | १०२१ | ४७ | १०६८ |
| | ९५.६% | ४.४% | १००.०% |
| सांगली | ४८७ | ३० | ५१७ |
| | ९४.२% | ५.८% | १००.०% |
| **एकुण** | **१५०८** | **७७** | **१५८५** |
| | **९५.१%** | **४.९%** | **१००.०%** |

गोसावी समाजामध्ये गोवर आजार मोठया प्रमाणात ( ९५.१ टक्के) पाळत असल्याचे दिसून येते. तर पुणे जिल्ह्यामध्ये ९५.६ टक्के प्रमाण असून सांगली जिल्ह्यामध्ये हेच प्रमाण जवळपास सारखेच ९४.२ टक्के एवढे असल्याचे दिसून येते. केवळ ४.९ टक्के कुटुंबात गोवर पाळला जात नसल्याचे आढळते.

**तक्ता क्र. ५२**

**इतर समाजाची दहशत**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | २४३ | ८२५ | १०६८ |
| | २२.८% | ७७.२% | १००.०% |
| सांगली | १६२ | ३५५ | ५१७ |
| | ३१.३% | ६८.७% | १००.०% |
| **एकुण** | **४०५** | **११८०** | **१५८५** |
| | **२५.६%** | **७४.४%** | **१००.०%** |

गोसावी समाजातील २५.६ टक्के कुटुंबांनी त्यांच्यावर इतर समाजाची दहशत असल्याचे सांगितले आहे. सांगली जिल्ह्यामध्ये ३१.३ टक्के कुटुंबांनी इतर समाजाची दहशत असल्याचे सांगितले हे प्रमाण पुणे जिल्ह्यामध्ये २२.८ टक्के एवढे दिसून येते. तर ७४.४ टक्के कुटुंबांनी इतर समाजाची त्यांच्यावर दहशत नसल्याचे मत नोंदविले आहे.

**तक्ता क्र. ५३**

**दहशत असलेल्या समुहाचे नाव**

| जिल्हा | समुहाचे / समाजाचे नाव | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | बहुजन, मांग-गारुडी, वडार | उच्चजात (मराठा, श्रीमंत, शिकलेला) | गोसावी सोडून इतर | कोणत्याही नाही | |
| पुणे | ९ | १५० | ८४ | ८२५ | १०६८ |
| | ०.८% | १४.०% | ७.९% | ७७.२% | १००.०% |
| सांगली | ० | ६१ | १०१ | ३५५ | ५१७ |
| | ०.०% | ११.८% | १९.५% | ६८.७% | १००.०% |
| **एकुण** | **९** | **२११** | **१८५** | **११८०** | **१५८५** |
| | **०.६%** | **१३.३%** | **११.७%** | **७४.४%** | **१००.०%** |

वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे १३.३ टक्के कुटुंबात त्यांच्यावर उच्च जात (मराठा, श्रीमंत, शिकलेला) वर्गाची दहशत आहे. ७४.४ टक्के कुटुंबांनी त्याच्यावर कोणत्याही जाती किंवा समुहाची दहशत नाही अशी माहिती दिली आहे. ११.७ टक्के कुटुंबांनी गोसावी सोडून इतर समाजाची दहशत असल्याचे सांगितले तर केवळ ०.६ टक्के कुटुंबांनी बहुजन, मांग-गारुडी व वडार समाजाची दहशत असल्याचे नमूद केलेले आहे.

**तक्ता क्र. ५४**

**क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ कायद्याविषयी माहिती**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | ४१ | १०२७ | १०६८ |
| | ३.८% | ९६.२% | १००.०% |
| सांगली | ८५ | ४३२ | ५१७ |
| | १६.४% | ८३.६% | १००.०% |
| **एकुण** | **१२६** | **१४५९** | **१५८५** |
| | **७.९%** | **९२.१%** | **१००.०%** |

गोसावी समाजामध्ये क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ कायद्या विषयी माहिती असणाऱ्याचे प्रमाण ७.९% अत्यल्प असल्याचे दिसून येते. सांगली जिल्ह्यामध्ये १६.४ टक्के एवढे असून पुणे जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ३.८ टक्के एवढे आहे. तर उर्वरित ९२.१% लोकांना क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ कायद्याविषयी माहिती नाही.

**तक्ता क्र. ५५**

**क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४च्या अंतर्गत गुन्हा दाखल**

| जिल्हा | होय | नाही | एकुण |
|---|---|---|---|
| पुणे | २७ | १०४१ | १०६८ |
| | २.५% | ९७.५% | १००.०% |
| सांगली | १० | ५०७ | ५१७ |
| | १.९% | ९८.१% | १००.०% |
| **एकुण** | **३७** | **१५४८** | **१५८५** |
| | **२.३%** | **९७.७%** | **१००.०%** |

गोसावी समाजामध्ये क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ च्या अंतर्गत गुन्हा दाखल असणाऱ्याचे प्रमाण (२.३ टक्के) आहे. पुणे जिल्ह्यामध्ये हेच प्रमाण २.५ टक्के एवढे असून सांगली जिल्ह्यामध्ये १.९ टक्के एवढे आहे. तर ९७.७ टक्के कुटुंबांनी क्रिमिनल ट्राइब ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे मत नोंदविले आहे. पुणे जिल्ह्यामध्ये ९७.५ टक्के तर सांगली जिल्ह्यामध्ये ९८.१ टक्के कुटुंबावर गुन्हा दाखल झालेला नाही.

**तक्ता क्र. ५६**

**यात्रामध्ये जाण्याचे प्रमाण**

| जिल्हा | यात्रा | | एकुण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| पुणे | १२१ | ९४७ | १०६८ |
| | ११.३% | ८८.७% | १००.०% |
| सांगली | ५१ | ४६६ | ५१७ |
| | ९.९% | ९०.१% | १००.०% |
| **एकुण** | **१७२** | **१४१३** | **१५८५** |
| | **१०.९%** | **८९.१%** | **१००.०%** |

सांगली जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त समाज बांधव एकत्र येण्याचे प्रमाण ८९.१ टक्के दिसून येते. सांगली जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ९०.१ टक्के एवढे आहे. तर पुणे जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ८८.७ टक्के आहे. तर केवळ १०.९ टक्के कुटुंब यात्रा निमित्त सांस्कृतिक कार्यात एकत्र येत नसल्याचे आढळते.

## तक्ता क्र. ५७
## सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रमाण

| जिल्हा | सांस्कृतिक कार्यक्रम | | | | | | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **चैत्र पोर्णिमा** | **दसरा / होळी/ दिवाळी/ नवरात्र** | **गावदेवी उत्सव** | **जत्रा-देवी/ मरगुबाई /लक्ष्मी/ खंडोबा** | **मुकराई देवी उत्सव** | **शितळा देवी उत्सव** | **नाथबाबा** | **इतर** | **पिरबा यात्रा** | **राज मोघलबाबा उत्सव** | **संक्रात / गुढीपाडवा** | **सप्तश्रृंगी देवी उत्सव** | **लागू नाही** | |
| पुणे | २ | ६७३ | १० | ५७ | ० | ३२ | २ | २८१ | ६ | १ | १ | ० | ३ | १०६८ |
| | ०.२% | ६३.०% | ०.९% | ५.३% | ०.०% | ३.०% | ०.२% | २६.३% | ०.६% | ०.१% | ०.१% | ०.०% | ०.३% | १००.०% |
| सांगली | ० | ३३८ | ४ | ३० | १ | ४० | ० | १०३ | ० | ० | ० | १ | ० | ५१७ |
| | ०.०% | ६५.४% | ०.८% | ५.८% | ०.२% | ७.७% | ०.०% | १९.९% | ०.०% | ०.०% | ०.०% | ०.२% | ०.०% | १००.०% |
| **एकुण** | **२** | **१०११** | **१४** | **८७** | **१** | **७२** | **२** | **३८४** | **६** | **१** | **१** | **१** | **३** | **१५८५** |
| | **०.१%** | **६३.८%** | **०.९%** | **५.५%** | **०.१%** | **४.५%** | **०.१%** | **२४.२%** | **०.४%** | **०.१%** | **०.१%** | **०.१%** | **०.२%** | **१००.०%** |

गोसावी समाजामध्ये दसरा / होळी / दिवाळी / नवरात्र साजरे करण्याचे प्रमाण ६३.८ टक्के दिसून येते. सांगली जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ६५.४ टक्के एवढे आहे. तर पुणे जिल्ह्यामध्ये हे प्रमाण ६३.० टक्के आहे. ५.५ टक्के कुटुंब जत्रा, देवी, मरगुबाई, लक्ष्मी व खंडोबा या सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त एकत्र येतात, ४.५ टक्के कुटुंब शितलादेवी उत्सवा निमित्ताने एकत्र येतात तर २४.२ कुटुंब इतर सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त एकत्र येतात. तर चैत्र पोर्णिमा, गावदेवी उत्सव, मुकराईदेवी उत्सव नाथबा, पिरबायात्रा, राज मोघलबाबा उत्सव, संक्रात/ गुढीपाडवा, सप्तश्रृंगी देवी उत्सव करण्याकरिता १  टक्के पेक्षा कमी कुटुंब उपस्थित असतात.

**तक्ता क्र. ५८**

**बाळाच्या जन्मापूर्वी विधी केल्या जातात का**

| जिल्हा | जन्मापूर्वी | | एकुण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| पुणे | ९१९ | १४९ | १०६८ |
| | ८६.०% | १४.०% | १००.०% |
| सांगली | ३१२ | २०५ | ५१७ |
| | ६०.३% | ३९.७% | १००.०% |
| **एकुण** | **१२३१** | **३५४** | **१५८५** |
| | **७७.७%** | **२२.३%** | **१००.०%** |

तक्ता क्र.५९ नुसार गोसावी समाजात बाळाच्या जन्मा आधी विविध विधी करत असलेल्या कुटुंबांचे प्रमाण २२.३ टक्के दिसून येते. यानुसार तुलनेने अधिक सांगली जिल्ह्याचे प्रमाण असून ते ३९.७ टक्के, तर पुणे जिल्ह्यातील १४ टक्के कुटुंबांनी बाळाच्या जन्मा आधी विविध विधी करीत असल्याचे सांगितले. तसेच ७७.७ टक्के कुटुंबांनी बाळाच्या जन्मापूर्वी कोणताही विधी केला जात नसल्याचे स्पष्ट केले.

**तक्ता क्र. ५९**

**बाळाच्या जन्मापूर्वी केले जाणारे विधी**

| जिल्हा | विधी प्रकार | | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | अंगारा लावणे | ओटी भरणे | लागू नाही | |
| पुणे | ० | १४९ | ९१९ | १०६८ |
| | ०.०% | १४.०% | ८६.०% | १००.०% |
| सांगली | ४८ | १५७ | ३१२ | ५१७ |
| | ९.३% | ३०.४% | ६०.३% | १००.०% |
| **एकुण** | **४८** | **३०६** | **१२३१** | **१५८५** |
| | **३.०%** | **१९.३%** | **७७.७%** | **१००.०%** |

तक्ता क्र.६० नुसार बाळाच्या जन्माआधी गोसावी समाजात ओटी भरणे व अंगारा लावणे या विधी करत असल्याचे आढळते. पुणे जिल्ह्यातील १४ टक्के कुटुंबांनी तर सांगली जिल्ह्यातील ३०.४ टक्के कुटुंबांनी ओटी भरण्याची विधी करत असल्याचे सांगितले. तसेच सांगली जिल्ह्यात बाळ जन्माआधी आईला अंगारा लावण्याची देखील पद्धत असल्याचे एकूण ९.३ टक्के कुटुंबांनी सांगितलते. पुणे जिल्ह्यात मात्र ही प्रथा नसल्याचे दिसते. ७७.७ टक्के कुटुंबामध्ये बाळाच्या जन्मापूर्वी केल्या जाताच्या विधी लागू नसल्याचे स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ६०**

**बाळ जन्मल्यानंतर केले जाणारे विधी**

| **जिल्हा** | **पाचवी, बारावी या विधी करण्याचे प्रमाण** | | **एकुण** |
|---|---|---|---|
| | **नाही** | **होय** | |
| पुणे | ३७९ | ६८९ | १०६८ |
| | ३५.५% | ६४.५% | १००.०% |
| सांगली | ३३२ | १८५ | ५१७ |
| | ६४.२% | ३५.८% | १००.०% |
| **एकुण** | **७११** | **८७४** | **१५८५** |
| | **४४.९%** | **५५.१%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ६१ नुसार महाराष्ट्रातील गोसावी समाजातील एकूण ५५.१ टक्के कुटुंबांनी त्यांच्याकडे बाळाच्या जन्मानंतर पाचवी बारावी सारख्या विधी केल्या जात असल्याचे सांगितले आहे. यामध्ये सर्वाधिक प्रमाण पुणे जिल्ह्यात असून ते ६४.२ टक्के एवढे आढळून आले आहे. तर ३५.८ टक्के कुटुंब सांगली जिल्ह्यात आढळते तर विधी न करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४४.९ टक्के आहे.

**तक्ता क्र. ६१**

**मुलींना प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधी करणाऱ्याचे प्रमाण**

| **जिल्हा** | | | **एकुण** |
|---|---|---|---|
| | **नाही** | **होय** | |
| पुणे | ५०५ | ५६३ | १०६८ |
| | ४७.३% | ५२.७% | १००.०% |
| सांगली | ८२ | ४३५ | ५१७ |
| | १५.९% | ८४.१% | १००.०% |
| **एकुण** | **५८७** | **९९८** | **१५८५** |
| | **३७.०%** | **६३.०%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ६२ नुसार गोसावी समाजात मुलींना प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधी करण्याची प्रथा दिसून येते. हे प्रमाण सर्वाधिक सांगली जिल्ह्यात असून ते ८४.१ टक्के एवढे आढळते तर पुणे जिल्ह्यात ५२.७ टक्के कुटुंबे मुलींना प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधी करतात तर ३७ टक्के कुटुंबामध्ये सदरचा विधी केला जात नसल्याचे स्पष्ट केले आहे.

## तक्ता क्र. ६२

## लग्न विधी चालण्याचा कालावधी

| जिल्हा | लग्न विधी किती दिवस चालतात | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | **१ दिवस** | **२ दिवस** | **३ दिवस** | **४ दिवस** | **५ दिवस** | |
| पुणे | ३७ | ४९३ | २१६ | ७० | २५२ | १०६८ |
| | ३.५% | ४६.२% | २०.२% | ६.६% | २३.६% | १००.०% |
| सांगली | ५७ | ३४७ | २१ | २ | ९० | ५१७ |
| | ११.०% | ६७.१% | ४.१% | ०.४% | १७.४% | १००.०% |
| **एकुण** | **९४** | **८४०** | **२३७** | **७२** | **३४२** | **१५८५** |
| | **५.९%** | **५३.०%** | **१५.०%** | **४.५%** | **२१.६%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ६३ नुसार गोसावी समाजात सर्वाधिक कुटुंबांनी लग्न विधी दोन दिवस करीत असल्याचे सांगितले. सर्वात जास्त सांगली जिल्ह्यातील ६७.१ टक्के कुटुंबांमध्ये लग्न विधी दोन दिवस चालतो. तर पाच दिवस लग्न विधी करीत असलेली एकूण २१.६ टक्के कुटुंबे आहेत. हे प्रमाण मात्र सांगलीच्या मानाने पुणे जिल्ह्यात अधिक असून ते २३.६ टक्के एवढे दिसते. यावरून लग्न विधीस गोसावी समाजात किती महत्व दिले जाते हे समजते. सध्याच्या धकाधकीच्या युगात तसेच आर्थिक परिस्थिती मागासलेली असतानादेखील केवळ एका दिवसात लग्न विधी उरकणाऱ्या गोसावी कुटुंबाचे प्रमाण अत्यल्प असून ते पुणे जिल्ह्यात केवळ ३.५ टक्के तर सांगली जिल्ह्यात ११ टक्के एवढे आहे. यावरून या समाजात रूढी व परंपरांना दिले जाणारे महत्व दिसून येते.

## तक्ता क्र.६३

## आंतर जातीय विवाह करण्याचे प्रमाण

| जिल्हा | आंतर जातीय विवाह | | एकुण |
|---|---|---|---|
| | **होय** | **नाही** | |
| पुणे | ९६ | ९७२ | १०६८ |
| | ९.०% | ९१.०% | १००.०% |
| सांगली | ४ | ५१३ | ५१७ |
| | ०.८% | ९९.२% | १००.०% |
| **एकुण** | **१००** | **१४८५** | **१५८५** |
| | **६.३%** | **९३.७%** | **१००.०%** |

तक्ता क्र.६४ नुसार गोसावी समाजात आंतर जातीय विवाह होत नसल्याचे स्पष्ट चित्र दिसून येते. सांगली व पुणे या दोन्ही जिल्ह्यातील एकूण ९३.७ टक्के कुटुंबांनी त्यांच्या कुटुंबात आंतर जातीय विवाह झाला नसल्याचे सांगितले. परंपरेनुसार दुसऱ्या जातीचा मुलगा अथवा मुलीसोबत लग्न करण्यास मान्यता नसली तरी बदलत्या काळानुसार पुणे जिल्ह्यातील केवळ ९ टक्के कुटुंबांमध्ये असे विवाह झाले असल्याचे सांगितले. परंतु सांगली जिल्ह्यात हे प्रमाण ०.८ टक्के म्हणजे नसल्यासारखेच आहे.

**तक्ता क्र. ६४**

**आंतर जातीय विवाहास विरोध**

| अ.क्र. | आंतर जातीय विवाह | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नाही | १४८५ | ९३.७०% |
| २ | होय | १०० | ६.३०% |
| | **एकूण** | **१५८५** | **१००.००%** |

तक्ता क्र.६५ नुसार गोसावी समाजातील ६.३० टक्के लोकांना आंतरजातीय विवाहास विरोध झाला आहे. पुणे जिल्ह्यातील एकूण ४.८ टक्के तर सांगली जिल्ह्यातील ०.८ टक्के कुटुंबांना आंतरजातीय विवाहास विरोध सहन करावा लागला. तर ९३.७० टक्के कुटुंबात आंतरजातीय विवाहास विरोध होत नसल्याचे मत नोंदविले आहे.

**तक्ता क्र. ६५**

**महिलांचे पुनर्विवाह करण्याचे प्रमाण**

| जिल्हा | महिलांचे पुनर्विवाह करण्याचे प्रमाण | | एकुण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| पुणे | ४२४ | ६४४ | १०६८ |
| | ३९.७% | ६०.३% | १००.०% |
| सांगली | ८९ | ४२८ | ५१७ |
| | १७.२% | ८२.८% | १००.०% |
| **एकुण** | **५१३** | **१०७२** | **१५८५** |
| | **३२.४%** | **६७.६%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ६६ नुसार महाराष्ट्रातील गोसावी समाजात महिलांच्या पुनर्विवाहाच्या प्रथेचे प्रमाण दिसून येते. यानुसार एकूण ३२.४ टक्के कुटुंबांनी  गोसावी समाजात घटस्फोटीत किंवा विधवा महिला पुनर्विवाह करू शकत नाही असे सांगितले. हे प्रमाण सांगली जिल्ह्याच्या तुलनेत पुणे जिल्ह्यात अधिक असून ते ३९.७ टक्के एवढे असल्याने विचार करण्याजोगे आहे. तर ६७.६  टक्के कुटुंबात महिलांचा पुनर्विवाह करण्यास मान्यता असल्याचे मत स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ६६**

**महिलांना घटस्फोटानंतर पोटगी मिळण्याचे प्रमाण**

| जिल्हा | महिलांना घटस्फोटानंतर पोटगी | | एकुण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| पुणे | ८९० | १७८ | १०६८ |
| | ८३.३% | १६.७% | १००.०% |
| सांगली | ५१२ | ५ | ५१७ |
| | ९९.०% | १.०% | १००.०% |
| **एकुण** | **१४०२** | **१८३** | **१५८५** |
| | **८८.५%** | **११.५%** | **१००.०%** |

हिंदू विवाह कायदा १९५५ नुसार घटस्फोटानंतर महिलेला पोटगी किंवा निर्वाह खर्च मिळण्याचा अधिकार आहे. परंतू तक्ता क्र. ६७ नुसार गोसावी समाजातील एकूण ८८.५ टक्के कुटुंबांनी या समाजात घटस्फोटानंतर पोटगी मिळत नसल्याचे सांगितले. याचे सर्वाधिक प्रमाण ९९ टक्के सांगली जिल्ह्यात दिसते. यावरून गोसावी महिलांमध्ये त्यांच्या अधिकाराविषयीच्या जागरूकतेचा अभाव व त्यांना मिळणारे दुय्यम स्थान दिसून येते. तर केवळ ११.५ टक्के कुटुंबात घटस्फोटास नंतर महिलांना पोटगी मिळते असे मत नोंदविले आहे.

**तक्ता क्र. ६७**

**जिल्हानिहाय अंत्य संस्काराच्या पद्धतीचे प्रमाण**

| जिल्हा | अंत्य संस्काराच्या पद्धतीचे प्रकार | | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | जाळणे | पुरणे | दोन्ही | |
| पुणे | ७५० | २९० | २८ | १०६८ |
| | ७०.२% | २७.२% | २.६% | १००.०% |
| सांगली | १७० | ३४७ | ० | ५१७ |
| | ३२.९% | ६७.१% | ०.०% | १००.०% |
| **एकुण** | **९२०** | **६३७** | **२८** | **१५८५** |
| | **५८.०%** | **४०.२%** | **१.८%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ६८ नुसार एकूण ५८ टक्के गोसावी कुटुंबांनी मृत शरीराला अंत्य संस्कार दहन पद्धतीने केले जात असल्याचे सांगितले. दहन पद्धतीचे सर्वाधिक प्रमाण पूणे जिल्ह्यात ७०.२ टक्के दिसून येते. सांगली जिल्ह्यातील मात्र ६७.१ टक्के कुटुंबांनी दफन पद्धतीने अंत्य संस्कार केले जात असल्याचे सांगितले आहे. सद्य स्थितीत दफनविधीसाठी जागेचा अभाव असल्याने दहन विधीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत असले तरी गोसावी समाजात पूर्वापार दफन विधीद्वारेच अंत्य संस्कार करीत असल्याचे प्रमाण ४०.२ टक्के आहे तर १.८ टक्के कुटुंबांनी दहन व दफन दोन्ही विधी करत असल्याचे स्पष्ट केले.

**तक्ता क्र. ६८**

**जिल्हानिहाय दशक्रिया विधीच्या दिवसाचे प्रमाण**

| जिल्हा | दशक्रिया विधी दिवस | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | तिसरा | सातवा | दहावा | बारावा | तेरावा | तिसरा व बारावा | |
| पुणे | १६० | १९ | ७४२ | ८७ | २९ | ३१ | १०६८ |
| | १५.०% | १.८% | ६९.५% | ८.१% | २.७% | २.९% | १००.०% |
| सांगली | २२३ | ० | ५ | १०७ | ९७ | ८५ | ५१७ |
| | ४३.१% | ०.०% | १.०% | २०.७% | १८.८% | १६.४% | १००.०% |
| **एकुण** | **३८३** | **१९** | **७४७** | **१९४** | **१२६** | **११६** | **१५८५** |
| | **२४.२%** | **१.२%** | **४७.१%** | **१२.२%** | **७.९%** | **७.३%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ६९ नुसार २४.२ टक्के गोसावी कुटुंबात तिसऱ्या दिवशी दशक्रिया केली जाते अशी माहिती दिलेली आहे. १.२ टक्के कुटुंबात सातव्या दिवशी, ४७.१ टक्के दहाव्या दिवशी, १२.२ टक्के बाराव्या दिवशी, ७.९ टक्के तेराव्या दिवशी व ७.३ टक्के तिसरा व बाराव्या दिवशी दशक्रिया केल्या जातात. दहाव्या दिवशी दशक्रिया करणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ६९**

**जिल्हानिहाय मांसाहाराचे प्रमाण**

| जिल्हा | मांसाहार | | एकुण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| पुणे | ३७ | १०३१ | १०६८ |
| | ३.५% | ९६.५% | १००.०% |
| सांगली | २ | ५१५ | ५१७ |
| | ०.४% | ९९.६% | १००.०% |
| **एकुण** | **३९** | **१५४६** | **१५८५** |
| | **२.५%** | **९७.५%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ७० नुसार गोसावी समजा हा मांसाहारी समाज असल्याचे स्पष्ट दिसून येते. यानुसार सांगली जिल्ह्यातील जवळपास सर्वच कुटुंबे (९९.६ टक्के) तर पुणे जिल्ह्यातील ९६.५ टक्के कुटुंबांनी ते मांसाहार करीत असल्याचे सांगितले. मासेमारी हा या समाजाचा व्यवसाय होता. पूर्वापार आर्थिक परिस्थिती गरीब असल्याने मिळेल ते खाऊन पोट भरले जायचे. यातून हा समाज मांसाहार करू लागला. त्यामुळे मांसाहाराचे प्रमाण अधिक दिसून येते. तर केवळ २.५ टक्के कुटुंब मांसाहार करत नसल्याचे आढळून आले आहे.

# प्रकरण पाचवे

## गोसावी समाजाची आर्थिक माहिती

महाराष्ट्र राज्याची व्याप्ती, लोकसंख्या आणि राष्ट्रीय उत्पन्न या निकषावरून महाराष्ट्र राज्याचा भारतातील प्रगत राज्यामध्ये समावेश होते. स्वातंत्र्यपूर्वी व स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र राज्यात औद्योगिकीकरणाला चालना मिळालेली आहे. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात समाजाच्या सर्व थरांचा आर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीकोनातून सखोल पाऊले उचलण्यात आली. त्यामध्ये कृषी पुरवठा, सहकारी चळवळ, लघु व कुटीर उद्योग ग्रामीण उद्योगधंदे इ. याच्या माध्यमातून राज्याचा विकास करण्याचे धोरण शासनाने अवंलबले. राज्याची प्रगती हि आर्थिक स्थितीवर अवलंबून आहते. यामध्ये प्रामुख्याने शेती व शेती संलग्न व्यवसायामध्ये कुटुंबाची, समाजाची प्रगती झालेली असेल तर पर्यायाने राज्याचा विकास होऊ शकतो. महाराष्ट्रात अनेक जाती, पंथ धर्माचे लोक राहतात. परंतु आजही समाजातील काही प्रवर्ग आर्थिक विकासापासून वंचित असल्याचे चित्र समोर येत आहे.

गोसावी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे अत्यंत आवश्यक आहे. कुटुंबांची, व्यक्तींची समाजिक स्थिती त्यांच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून आहे. जर कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारली तर पर्यायाने त्याची सामजिक स्थितीमध्ये आपोआप सुधारणा होत असते.

गोसावी समाजाचा आर्थिक स्त्रोत कसा आहे याबाबतची माहिती प्राप्त करण्यासाठी गोसावी समाजातील रोजगार, मासिक उत्पन्न, खर्चाची पातळी, घराची मालकी, शेतजमीनीची माहिती ,स्थावर मालमत्ता इत्यादी महत्वाच्या बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

गोसावी समाजाची आर्थिक स्थिती चिंताजनक आहे. भटकंती करत असल्याने या समाजाकडे रोजगाराची साधने कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. शिक्षण नसल्याने नोकरी करणारे अत्यल्प आहेत. उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागणाऱ्याचे प्रमाण आढळून आले आहे. गोसावी समाजात दहा हजारापेक्षा कमी उत्पन्न गट जास्त आहे. गोसावी समाज भूमिहीन आहे. गोसावी समाजाचे आर्थिक स्थितीचे विश्लेषण खालीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. ७०**

## कुटुंबाचा व्यवसाय

| जिल्हा | कुटुंबाचा व्यवसाय | | | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भंगार गोळा करणे | शेती | शेतमजुर | जनावरे पाळणे/ राखायला घेणे | भिक्षा मागणे | व्यवसाय | मासेमारी /शिकार | सरकारी नोकरी | इतर/ मोलमजुरी | खाजगी नोकरी | |
| पुणे | १२ | २७ | २०९ | ५१ | ७८ | २२३ | ९८ | १० | २२० | १४० | **१०६८** |
| | १.१% | २.५% | १९.६% | ४.८% | ७.३% | २०.९% | ९.२% | ०.९% | २०.६% | १३.१% | **१००.०%** |
| सांगली | १८५ | १ | ६१ | २ | ८१ | ६ | ११० | २ | ६२ | ७ | **५१७** |
| | ३५.८% | ०.२% | ११.८% | ०.४% | १५.७% | १.२% | २१.३% | ०.४% | १२.०% | १.४% | **१००.०%** |
| **एकुण** | **१९७** | **२८** | **२७०** | **५३** | **१५९** | **२२९** | **२०८** | **१२** | **२८२** | **१४७** | **१५८५** |
| | **१२.४%** | **१.८%** | **१७.०%** | **३.३%** | **१०.०%** | **१४.४%** | **१३.१%** | **०.८%** | **१७.८%** | **९.३%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ७१ नुसार गोसावी समाजात उदरनिर्वाहासाठी वेगवेगळे व्यवसाय करण्याचे प्रमाण दिसून येते. सदर आकडेवारी नुसार १२.४ टक्के लोक भंगार गोळा करणे, १.८ टक्के लोक शेती, १७ टक्के लोक शेतमजुरी, ३.३ टक्के लोक जनावरे पाळणे, १० टक्के लोक भिक्षा मागणे, १४.४ टक्के लोक व्यवसाय, १३.१ टक्के मासेमारी/शिकार, ०.८ टक्के सरकारी नोकरी, १७.८ टक्के लोक इतर मोलमजुरी व ९.३ टक्के लोक खाजगी नोकरी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. सांगली जिल्ह्यातील सर्वाधिक कुटुंबे (३५.८ टक्के) भंगार गोळा करून आपला उदरनिर्वाह करतात. याच जिल्ह्यात मासेमारी करणारी सांगली जिल्ह्यात २१.३ टक्के गोसावी कुटुंबे आढळून आली आहेत. पुणे जिल्ह्यात मात्र इतर मोलमजुरी व व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे २०.६ टक्के व २०.९ टक्के एवढे दिसून येते. गोसावी समाजात अजूनही भिक्षा मागून पोट भरले जाते. पुणे जिल्ह्यातील ७.३ टक्के तर सांगली जिल्ह्यात १५.७ टक्के कुटुंबांचे उदरनिर्वाहाचे साधन भिक्षा मागणे हेच असल्याचे स्पष्ट दिसत आहे. गोसावी समाजात सरकारी नोकरी व खाजगी नोकरी करणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण देखील अत्यल्प आहे. यावरून हा समाज किती मागास आहे व समाजाच्या मुख्य प्रवाहापासून किती दूर आहे हे दिसते. सतत भटकंती करत असल्याने कोणत्याही एका व्यवसायाचे सर्वाधिक प्रमाण या समाजात आढळून येत नाही. मिळेल ते काम करून पोट भरणे हा उद्देश ठेवला जातो.

**तक्ता क्र. ७१**

**कुटुंबातील कमवत्या व्यक्तींची संख्या**

| जिल्हा | कुटुंबातील कमवती व्यक्ती | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५ व ५ पेक्षाजास्त | |
| पुणे | ६२० | २९५ | १०२ | ३३ | १८ | **१०६८** |
| | ५८.१% | २७.६% | ९.६% | ३.१% | १.७% | **१००.०%** |
| सांगली | २३७ | १७९ | ६३ | २९ | ९ | **५१७** |
| | ४५.८% | ३४.६% | १२.२% | ५.६% | १.७% | **१००.०%** |
| **एकुण** | **८५७** | **४७४** | **१६५** | **६२** | **२७** | **१५८५** |
| | **५४.१%** | **२९.९%** | **१०.४%** | **३.९%** | **१.७%** | **१००.०%** |

तक्ता क्र. ७२ नुसार कुटुंबातील एकूण किती सदस्य अर्थार्जन करतात, याच्या आकडेवारीचे प्रमाण दिसून येते. यानुसार केवळ एकच सदस्य काम करीत असणारी कुटुंबे सर्वाधिक असून याचे एकूण प्रमाण हे ५४.१ टक्के एवढे आहे. तुलनेने जास्त पुणे जिल्ह्यात हेच प्रमाण ५८.१ टक्के एवढे आहे. सांगली जिल्ह्यात मात्र सर्वाधिक ३४.६ टक्के कुटुंबातील दोन सदस्य अर्थार्जनासाठी काम करतात. पुणे जिल्ह्यात १०२ (९.६ टक्के) व सांगली मध्ये ६३ (१२.२ टक्के) कुटुंबातील तीन  सदस्य कमवत्या व्यक्ती आहेत. पुणे जिल्ह्यात ३३ (३.१ टक्के) व सांगली मध्ये २९ (५.६ टक्के) कुटुंबातील चार सदस्य कमवत्या व्यक्ती आहेत. उर्वरित फक्त १.७ टक्के कुटुंबात ५ व ५ पेक्षा जास्त व्यक्ती कमवत्या आहेत.

**तक्ता क्र. ७२**

**मासिक उत्पन्न**

| जिल्हा | मासिक उत्पन्न | | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | **१०,००० रुपये पेक्षा कमी** | **१०,००० ते २०,००० रुपये** | **२०,००० रुपये पेक्षा अधिक** | |
| पुणे | ६६१ | ३४५ | ६२ | **१०६८** |
| | ६१.९% | ३२.३% | ५.८% | **१००.०%** |
| सांगली | ५०९ | ५ | ३ | **५१७** |
| | ९८.५% | १.०% | ०.६% | **१००.०%** |
| **एकुण** | **११७०** | **३५०** | **६५** | **१५८५** |
| | **७३.८%** | **२२.१%** | **४.१%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यानुसार महाराष्ट्रातील गोसावी समाजातील १०,००० रुपये पेक्षा कमी मासिक उत्पन्न गटातील कुटुंबांचे सर्वाधिक प्रमाण ७३.८ टक्के दिसून येते. सांगली जिल्ह्यातील गोसावी समाज हा

आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेला असून येथे ९८.५ टक्के कुटुंबे १०,००० रुपये पेक्षा कमी मासिक उत्पन्न गटातील आढळून आली. भंगार गोळा करणे, भिक्षा मागणे, मासेमारी, शेत मजुरी व इतर मोलमजुरी करून ही कुटुंबे अर्थार्जन करीत असल्याने त्यांचा उत्पन्नाचा स्तर हा कमी दिसून येतो. तसेच १०,००० ते २०,००० रुपये उत्पन्न गटातील कुटुंबांचे प्रमाण २२.१ टक्के असून पुणे जिल्ह्यात ३२.३ टक्के आढळून आलेले दिसते. २०,००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण केवळ ४.१ टक्के आहे.

**तक्ता क्र. ७३**

**घराची मालकी**

| **मासिक उत्पन्न मर्यादा** | **घराची मालकी** | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| | **स्वत:चे** | **भाडयाचे** | **अतिक्रमित** | |
| १०००० पेक्षा कमी | ८२५ | ७९ | २६६ | **११७०** |
| | ७०.५% | ६.८% | २२.७% | **१००.०%** |
| १००००-२०००० पर्यंत | २३१ | ११ | १०८ | **३५०** |
| | ६६.०% | ३.१% | ३०.९% | **१००.०%** |
| २०००० पेक्षा जास्त | ४९ | ० | १६ | **६५** |
| | ७५.४% | ०.०% | २४.६% | **१००.०%** |
| **एकूण** | **११०५** | **९०** | **३९०** | **१५८५** |
| | **६९.७%** | **५.७%** | **२४.६%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यानुसार एकूण ६९.७ टक्के लोक स्वत:च्या घरात राहत आहेत. २४.६ टक्के लोक अतिक्रमित जागेत राहत आहेत. अतिक्रमित जागेत राहणाऱ्यामध्ये २०००० पेक्षा जास्त उत्पन्न असणारे १६ (२४.६ टक्के) कुटुंबे अतिक्रमित जागेत राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. १०,००० पेक्षा कमी उत्पन्न असलेली २६६ (२२.७ टक्के) कुटुंबे अतिक्रमित जागेत राहत आहेत. १००००-२०००० या उत्पन्न गटातील १०८ (३०.९ टक्के) कुटुंबे अतिक्रमित जागेत राहत आहेत. १०००० पेक्षा कमी उत्पन्न गट असलेली ७९ (६.८ टक्के) कुटुंबे भाड्याच्या घरात राहतात. तर १०००० ते २०००० या उत्पन्न गटातील ११ कुटुंबे भाड्याच्या घरात राहत आहेत.

## तक्ता क्र. ७४
## राहण्यासाठी जागेची स्थिती

| मासिक उत्पन्न | राहण्यासाठी जागा | | एकूण |
|---|---|---|---|
| | नाही | होय | |
| १०००० पेक्षा कमी | ३२२ | ८४८ | **११७०** |
| | २७.५% | ७२.५% | **१००.०%** |
| १००००-२००००पर्यंत | ७६ | २७४ | **३५०** |
| | २१.७% | ७८.३% | **१००.०%** |
| २०००० पेक्षा जास्त | ८ | ५७ | **६५** |
| | १२.३% | ८७.७% | **१००.०%** |
| **एकूण** | **४०६** | **११७९** | **१५८५** |
| | **२५.६%** | **७४.४%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यानुसार ४०६ (२५.६ टक्के) गोसावी समाजातील कुटुंबांना राहण्यासाठी स्वत:ची जागा नाही. यामध्ये प्रामुख्याने १००००-२०००० मासिक उत्पन्न असलेल्या ७६ कुटुंबाना राहण्याची जागा नाही. २०,००० पेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या ८ कुटुंबाना राहण्यासाठी जागा नसल्याची माहिती प्राप्त झालेली आहे. तर उर्वरित ७४.४ टक्के कुटुंबाना स्वत:ची जागा असल्याचे आढळून आले आहे.

## तक्ता क्र. ७५
## गायरान जमीन

| मासिक उत्पन्न | नाही | होय | एकूण |
|---|---|---|---|
| १०००० पेक्षा कमी | १०६२ | १०८ | **११७०** |
| | ९०.८% | ९.२% | **१००.०%** |
| १००००-२००००पर्यंत | ३१० | ४० | **३५०** |
| | ८८.६% | ११.४% | **१००.०%** |
| २०००० पेक्षा जास्त | ५५ | १० | **६५** |
| | ८४.६% | १५.४% | **१००.०%** |
| **एकूण** | **१४२७** | **१५८** | **१५८५** |
| | **९०.०%** | **१०.०%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यानुसार १४२७ (९० टक्के) गोसावी कुटुंबाकडे गायरान जमीन नाही. तर उर्वरित १५८(१० टक्के) कुटुंबाकडे गायरान जमीन आहे. मासिक उत्पन्नाचे प्रमाण वाढताना गायरान जमीन आहे किंवा नाही याचे प्रमाण कमी होताना आढळते.

**तक्ता क्र. ७६**

**घराच्या बांधकामाची स्थिती**

| मासिक उत्पन्न | कच्चे | पक्के | एकूण |
|---|---|---|---|
| १०००० पेक्षा कमी | ९२१ | २४९ | **११७०** |
| | ७८.७% | २१.३% | **१००.०%** |
| १००००-२०००० पर्यंत | २२२ | १२८ | **३५०** |
| | ६३.४% | ३६.६% | **१००.०%** |
| २०००० पेक्षा जास्त | ३२ | ३३ | **६५** |
| | ४९.२% | ५०.८% | **१००.०%** |
| **एकूण** | **११७५** | **४१०** | **१५८५** |
| | **७४.१%** | **२५.९%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यानुसार कच्चे घरांचे बांधकाम असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ७४.१ टक्के असून २०००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या ३२ (४९.२ टक्के) गोसावी कुटुंबाची घरे हि कच्ची आहेत. १०००० पेक्षा कमी उत्पन्न असणारी ९२१ (७८.७ टक्के) कुटुंबे तर १००००-२०००० या उत्पन्न मर्यादेतील २२२ (६३.४ टक्के) कुटुंबे कच्च्या घरात राहत आहेत. घराचे बांधकाम पक्के असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २५.९ टक्के आहे.

**तक्ता क्र. ७७**

**घराच्या प्रकाराची स्थिती**

| मासिक उत्पन्न | घराचा प्रकार | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | सिमेंट कॉन्क्रीट | झोपडी | कुडाचे कौलारु | दगड/विटा/ कौलारु | दगड/ विटा/ पत्र्याचे | |
| १०००० पेक्षा कमी | ६८ | २७२ | १५६ | २६० | ४१४ | ११७० |
| | ५.८% | २३.२% | १३.३% | २२.२% | ३५.४% | १००.०% |
| १००००-२००००पर्यंत | ५५ | ४४ | ४१ | ६३ | १४७ | ३५० |
| | १५.७% | १२.६% | ११.७% | १८.०% | ४२.०% | १००.०% |
| २०००० पेक्षा जास्त | १९ | ६ | १ | ८ | ३१ | ६५ |
| | २९.२% | ९.२% | १.५% | १२.३% | ४७.७% | १००.०% |
| **एकूण** | **१४२** | **३२२** | **१९८** | **३३१** | **५९२** | **१५८५** |
| | **९.०%** | **२०.३%** | **१२.५%** | **२०.९%** | **३७.४%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यानुसार ९ टक्के गोसावी कुटुंबे सिमेंट कॉन्क्रीट, २०.३ टक्के गोसावी कुटुंबे झोपडीत, १२.५ टक्के कुटुंबे कुडाचे कौलारी, २०.९ टक्के गोसावी कुटुंबे दगड, विटा तर उर्वरित ३७.४ टक्के गोसावी कुटुंबे दगड विटा पत्र्याच्या घरात राहत आहेत.

## तक्ता क्र. ७८
## घरातील खोल्याची स्थिती.

| मासिक उत्पन्न | घरातील खोल्या | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | एक | दोन | तीन | चार | चारपेक्षा जास्त | |
| १०००० पेक्षा कमी | ४८४ | ५५८ | ७५ | ३९ | १४ | **११७०** |
| | ४१.४% | ४७.७% | ६.४% | ३.३% | १.२% | **१००.०%** |
| १००००-२०००० पर्यंत | ७७ | १७६ | ६२ | २७ | ८ | **३५०** |
| | २२.०% | ५०.३% | १७.७% | ७.७% | २.३% | **१००.०%** |
| २०००० पेक्षा जास्त | ८ | ३० | १३ | १० | ४ | **६५** |
| | १२.३% | ४६.२% | २०.०% | १५.४% | ६.२% | **१००.०%** |
| **एकूण** | **५६९** | **७६४** | **१५०** | **७६** | **२६** | **१५८५** |
| | **३५.९%** | **४८.२%** | **९.५%** | **४.८%** | **१.६%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ३५.९ टक्के गोसावी कुटुंबे एका खोलीत, ४८.२ टक्के गोसावी समाजाची कुटुंबे दोन खोली, १५० (९.५ टक्के) तीन खोली असलेल्या घरात वास्तव्यास आहेत. ४.८ टक्के कुटुंबे चार खोल्या असलेल्या घरात राहत आहेत. फक्त १.६ टक्के कुटुंबे चार व चार पेक्षा जास्त खोल्या असलेल्या घरात राहतात.

## तक्ता क्र. ७९
## घराच्या क्षेत्रफळाची स्थिती

| मासिक उत्पन्न | घराचे क्षेत्रफळ ( चौ. फुटात) | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | **०-५००** | **५००-१०००** | **१०००-२०००** | **२०००-३०००** | |
| १०००० पेक्षा कमी | १०८० | ६५ | २१ | ४ | ११७० |
| | ९२.३% | ५.६% | १.८% | ०.३% | १००.०% |
| १००००-२००००पर्यंत | २९४ | ४१ | ९ | ६ | ३५० |
| | ८४.०% | ११.७% | २.६% | १.७% | १००.०% |
| २०००० पेक्षा जास्त | ४३ | १४ | ७ | १ | ६५ |
| | ६६.२% | २१.५% | १०.८% | १.५% | १००.०% |
| **एकूण** | **१४१७** | **१२०** | **३७** | **११** | **१५८५** |
| | **८९.४%** | **७.६%** | **२.३%** | **०.७%** | **१००.०%** |

वरील तक्त्यानुसार असे निदर्शनास येते कि, ०-५०० चौ.फुट क्षेत्रफळ असलेल्या घरात १४१७ (८९.४ टक्के) गोसावी कुटुंबे राहतात. तर १२० (७.६ टक्के) गोसावी कुटुंबे ५००-१००० चौ.फुट क्षेत्रफळ असलेल्या घरात राहतात. २.३ टक्के गोसावी समाजाची कुटुंबे १०००-२००० चौ. फुट च्या घरात राहतात. ०.७ टक्के गोसावी

कुटुंबे २०००-३००० चौ.फुटाच्या घरात राहत आहेत. कमीत कमी क्षेत्रफळाच्या घरात जास्तीत जास्त कुटुंबे राहत आहेत तर जास्त क्षेत्रफळाच्या घरात कमीत कमी कुटुंबे राहत असल्याचे आढळते.

**तक्ता क्र. ८०**

**स्वत:च्या मालकीची जमीन**

| **मासिक उत्पन्न** | | | **एकूण** |
|---|---|---|---|
| | **होय** | **नाही** | |
| १०००० पेक्षा कमी | २० | ११५० | ११७० |
| | १.७% | ९८.३% | १००.०% |
| १००००-२०००० पर्यंत | ५ | ३४५ | ३५० |
| | १.४% | ९८.६% | १००.०% |
| २०००० पेक्षा जास्त | ४ | ६१ | ६५ |
| | ६.२% | ९३.८% | १००.०% |
| **एकूण** | **२९** | **१५५६** | **१५८५** |
| | **१.८%** | **९८.२%** | **१००.०%** |

वरील तक्त्यानुसार १५५६ (९८.२ टक्के) गोसावी समाजाकडे स्वत:च्या मालकीची जमीन नाही. तर फक्त २९ (१.८ टक्के) कुटुंबाकडे स्वत:च्या मालकीची जमीन आहे. मासिक उत्पन्नानुसार १०००० पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या १.७ टक्के कुटुंबाकडे जमीन आहे तर १००००-२०००० उत्पन्न असणाऱ्या १.४ टक्के कुटुंबाकडे व २०००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या ६.२ टक्के कुटुंबाकडे स्वत:च्या मालकीची जमीन आहे

**तक्ता क्र. ८१**

**जमीन खंडाने घेण्याची स्थिती**

| **मासिक उत्पन्न** | **जमीन खंडाने घेता का** | | **एकूण** |
|---|---|---|---|
| | **होय** | **नाही** | |
| १०००० पेक्षा कमी | ६ | ११६४ | ११७० |
| | ०.५% | ९९.५% | १००.०% |
| १००००-२००००पर्यंत | १८ | ३३२ | ३५० |
| | ५.१% | ९४.९% | १००.०% |
| २०००० पेक्षा जास्त | १ | ६४ | ६५ |
| | १.५% | ९८.५% | १००.०% |
| **एकूण** | **२५** | **१५६०** | **१५८५** |
| | **१.६%** | **९८.४%** | **१००.०%** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे १५६० (९८.४ टक्के) गोसावी लोकांनी जमीन खंडाने घेतली नाही असे उत्तर सांगितले आहे. तर उर्वरित २५ (१.६ टक्के) गोसावी समाजाने जमीन खंडाने घेतली आहे.

**तक्ता क्र. ८२**

**खंडाने घेतलेल्या जमीनीचे प्रमाण**

| **मासिक उत्पन्न** | **एकर** | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| | **१-३ एकर** | **४ व ४ पेक्षा जास्त** | **लागू नाही** | |
| १०००० पेक्षा कमी | ६ | ० | ११६४ | **११७०** |
| | ०.५% | ०.०% | ९९.५% | **१००.०%** |
| १००००-२०००० पर्यंत | १७ | १ | ३३२ | **३५०** |
| | ४.९% | ०.३% | ९४.९% | **१००.०%** |
| २०००० पेक्षा जास्त | १ | ० | ६४ | **६५** |
| | १.५% | ०.०% | ९८.५% | **१००.०%** |
| **एकूण** | **२४** | **१** | **१५६०** | **१५८५** |
| | **१.५%** | **०.१%** | **९८.४%** | **१००.०%** |

गोसावी समाजातील २५ लोकांनी जमीन खंडाने घेतली आहे त्यामध्ये २४ गोसावी समाजातील लोकांनी १-३ एकर तर फक्त १ गोसावी कुटुंबांनी ४ एकर पेक्षा जास्त जमीन  खंडाने घेतली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने २५ कुटुंबांनी जिरायत व बागायत या दोन्ही प्रकारची जमीन खंडाने घेतली आहे. तर एकूण कुटुंबापैकी ९८.४ टक्के कुटुंबांनी खंडाने जमीन घेतलेली नाही.

**तक्ता क्र. ८३**

**महिना मुलभूत खर्चाचे प्रमाण**

| **मासिक उत्पन्न** | महिना मुलभूत खर्चावरील खर्च (अन्न, वस्त्र, निवारा,  शिक्षण, आरोग्य इ.) | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| | २५०० रु. पेक्षाकमी | २५०० रु. ते ५००० रु. | ५००० रु. ते १०००० रु. | १०००० रु. पेक्षा जास्त | |
| १०००० पेक्षा कमी | ६५२ | ४४१ | ६३ | १४ | **११७०** |
| | ५५.७% | ३७.७% | ५.४% | १.२% | **१००.०%** |
| १००००-२०००० पर्यंत | ७६ | १४८ | १०४ | २२ | **३५०** |
| | २१.७% | ४२.३% | २९.७% | ६.३% | **१००.०%** |
| २०००० पेक्षा जास्त | १४ | २५ | १७ | ९ | **६५** |
| | २१.५% | ३८.५% | २६.२% | १३.८% | **१००.०%** |
| **एकूण** | **७४२** | **६१४** | **१८४** | **४५** | **१५८५** |
| | **४६.८%** | **३८.७%** | **११.६%** | **२.८%** | **१००.०%** |

वरील तक्त्यानुसार असे निदर्शनास येते कि, गोसावी समाजात ४५ (२.८ टक्के) कुटुंबे १००००रु पेक्षा जास्त खर्च मुलभूत गरजांवर खर्च करतात. विश्लेषण केले असता असे निदर्शनास येते कि, १४ (१.२ टक्के) लोकांचे मासिक उत्पन्न १०००० पेक्षा कमी आहे परंतु त्यांचा महिना मुलभूत खर्च १०००० पेक्षा जास्त असल्याचे आढळून आलेले आहे. तर ७४२ (४६.८ टक्के) कुटुंबे २५०० रु पेक्षा कमी, ६१४ (३८.७ टक्के) कुटुंबे २५००रु ते ५००० पर्यंत तर उर्वरित १८४ (११.६ टक्के) गोसावी कुटुंबात ५००० रु. ते १०००० रु. पर्यंत खर्च मुलभूत गरजांवर ज्यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या आदीवर केला जातो.

**तक्ता क्र. ८४**

**उपभोग्य गरजांवर प्रती महिना खर्च**

| **उपभोग्य गरजांवर प्रती महिना किती खर्च होतो.** | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| **मासिक उत्पन्न** | **५००० रु. पेक्षा कमी** | **५००० रु. ते १०००० रु.** | **१०००० रु. पेक्षा जास्त** | |
| १०००० पेक्षा कमी | १०७२ | ९१ | ७ | ११७० |
| | ९१.६% | ७.८% | ०.६% | १००.०% |
| १००००-२०००० पर्यंत | २७३ | ६६ | ११ | ३५० |
| | ७८.०% | १८.९% | ३.१% | १००.०% |
| २०००० पेक्षा जास्त | ३६ | २१ | ८ | ६५ |
| | ५५.४% | ३२.३% | १२.३% | १००.०% |
| **एकूण** | **१३८१** | **१७८** | **२६** | **१५८५** |
| | **८७.१%** | **११.२%** | **१.६%** | **१००.०%** |

तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे १३८१ (८७.१ टक्के) गोसावी कुटुंबे ५००० पेक्षा कमी खर्च टी.व्ही, फोन, मोबाईल खरेदी किंवा इतर बाबीवर करतात. तर १७८ (११.२ टक्के) गोसावी कुटुंबे ५००० ते १०००० रु. प्रती महिना खर्च उपभोग्य गरजांवर करत आहेत. तर ७ कुटुंबांनी त्यांचे मासिक उत्पन्न १०००० रु. पेक्षा कमी असूनही उपभोग्य गरजांवर १०००० पेक्षा जास्त खर्च केला असल्याचे निदर्शनास आले आहे.

**तक्ता क्र. ८५**

**कर्ज घेण्याचे प्रमाण**

| **मासिक उत्पन्न मर्यादा** | **कर्ज** | | **एकूण** |
|---|---|---|---|
| | **नाही** | **होय** | |
| १०००० पेक्षा कमी | ७९९ | ३७१ | ११७० |
| | ६८.३% | ३१.७% | १००.०% |
| १००००-२०००० पर्यंत | १४८ | २०२ | ३५० |
| | ४२.३% | ५७.७% | १००.०% |
| २०००० पेक्षा जास्त | २५ | ४० | ६५ |
| | ३८.५% | ६१.५% | १००.०% |
| **एकूण** | **९७२** | **६१३** | **१५८५** |
| | **६१.३%** | **३८.७%** | **१००.०%** |

तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ६१३ (३८.७ टक्के) गोसावी कुटुंबाने कर्ज घेतले आहे. त्यामध्ये १०००० पेक्षा कमी उत्पन्न असलेले ३७१ (३१.७ टक्के) गोसावी समाजाची कुटुंबे आहेत. तसेच २०२ (५७.७ टक्के) कुटुंबे १०००० ते २०००० पर्यंत उत्पन्न मर्यादा असलेली कुटुंबे आहेत. यामध्ये प्रामुख्याने बँक/पतसंस्था यामधून कर्ज घेण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच बचतगट मधून घेतलेल्याचे प्रमाण आढळून आले आहे. तर ६१.३ टक्के लोकांनी कोणतेही कर्ज घेतलेले नाही.

**तक्ता क्र. ८६**

**कर्ज घेण्याची कारणे**

| **मासिक उत्पन्न मर्यादा** | **कर्ज घेण्याची कारणे** | | | | | | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **शेती/ उदयोगधंदयासाठी** | **मुलांच्या शिक्षणासाठी** | **देवधर्म / पूजा / नवस** | **आजारपणात उपचारांसाठी** | **उदरनिर्वाहासाठी** | **लग्न कार्यासाठी** | **लागू नाही** | |
| १०००० पेक्षा कमी | ३० | २६ | ३६ | २६ | २१० | ४३ | ७९९ | ११७० |
| | २.६% | २.२% | ३.१% | २.२% | १७.९% | ३.७% | ६८.३% | १००.०% |
| १००००-२०००० पर्यंत | २८ | १३ | ६ | १० | ११६ | २९ | १४८ | ३५० |
| | ८.०% | ३.७% | १.७% | २.९% | ३३.१% | ८.३% | ४२.३% | १००.०% |
| २०००० पेक्षा जास्त | ७ | ३ | १ | ३ | १८ | ८ | २५ | ६५ |
| | १०.८% | ४.६% | १.५% | ४.६% | २७.७% | १२.३% | ३८.५% | १००.०% |
| **एकूण** | **६५** | **४२** | **४३** | **३९** | **३४४** | **८०** | **९७२** | **१५८५** |
| | **४.१%** | **२.६%** | **२.७%** | **२.५%** | **२१.७%** | **५.०%** | **६१.३%** | **१००.०%** |

६१३ गोसावी कुटुंबांनी कर्ज घेतले असल्याचे मागील तक्त्यानुसार आढळून आले. त्यामध्ये ६५ (४.१ टक्के) कुटुंबांनी शेती/उद्योग धंद्यासाठी ४२ (२.६ टक्के) गोसावी कुटुंबांनी मुलांच्या शिक्षणासाठी, ४३ (२.७ टक्के)

कुटुंबांनी देवधर्म / पूजा नवस यासाठी, ३९ (२.५ टक्के) आजारपणात उपचारासाठी, ३४४ (२१.७ टक्के) लोकांनी उदर निर्वाहासाठी, ८० (५ टक्के) लग्न कार्यासाठी कर्ज घेतले असल्याचे सांगितले. तर उर्वरित ६१.३ टक्के लोकांनी सदर बाब लागू नसल्याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. ८७**

**पूर्वज करत असलेल्या व्यवसायाचे प्रमाण**

| अ.क्र | तुमचे पूर्वज कोणता व्यवसाय करीत होते? | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | ११० | ६.९४ |
| २ | शेती मजुरी | ३५९ | २२.६५ |
| ३ | जनावरे पाळणे/ राखायला घेणे | ५७१ | ३६.०३ |
| ४ | खाजगी नोकरी | ९९ | ६.२५ |
| ५ | सरकारी नोकरी | १६ | १.०१ |
| ६ | व्यवसाय | २१६ | १३.६३ |
| ७ | मासेमारी | ७६६ | ४८.३३ |
| ८ | शिकार करणे | ६९३ | ४३.७२ |
| ९ | भंगार गोळा करणे | ३४८ | २१.९६ |
| १० | बादली दुरुस्ती करणे | ११० | ६.९४ |
| ११ | भिक्षा मागणे | १२९५ | ८१.७० |
| १२ | इतर | ९२ | ५.८० |

गोसावी समाजातील ११० (६.९४ टक्के) कुटुंबातील पूर्वज शेती हा व्यवसाय करीत होते अशी माहिती दिली. ३५९ (२२.६५ टक्के) शेतमजुरी, ५७१ (३६.०३ टक्के) जनावरे पाळणे/राखायला घेणे, ९९ (६.२५ टक्के) खाजगी नोकरी, १६ (१.०१ टक्के) सरकारी नोकरी, २१६ (१३.६३ टक्के) व्यवसाय, ७६६ (४८.३३ टक्के) मासेमारी , ६९३ (४३.७२ टक्के) शिकार करणे, ३४८ (२१.१६ टक्के) भंगार गोळा करणे, ११० (६.९४ टक्के) बादली दुरुस्ती करणे तर १२९५ (८१.७० टक्के) भिक्षा मागणे, तर उर्वरित ९२ (५.८० टक्के) लोक इतर व्यवसाय करत होते अशी माहिती दिलेली आहे. यामध्ये शेती, शेतमजुरी व जनावरे पाळणे राखणे इत्यादी शेती संलग्न व्यवसाय असल्याने उत्तरदात्याने एका पेक्षा जास्त पर्यायाची माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. ८८**

**पारंपारिक व्यवसायानुसार भीक मागणाऱ्यांची स्थिती**

| **मासिक उत्पन्न मर्यादा** | **भीक मागणे पारंपारिक व्यवसाय** | | **एकूण** |
|---|---|---|---|
| | **नाही** | **होय** | |
| १०००० पेक्षा कमी | ९७९ | १९१ | ११७० |
| | ८३.७% | १६.३% | १००.०% |
| १००००-२०००० पर्यंत | २६७ | ८३ | ३५० |
| | ७६.३% | २३.७% | १००.०% |
| २०००० पेक्षा जास्त | ५३ | १२ | ६५ |
| | ८१.५% | १८.५% | १००.०% |
| **एकूण** | **१२९९** | **२८६** | **१५८५** |
| | **८२.०%** | **१८.०%** | **१००.०%** |

२८६ (१८.० टक्के) लोकांनी भीक मागणे हा त्यांचा पारंपारिक व्यवसाय असल्याची माहिती दिली. तर उर्वरित ८२ टक्के लोकांनी त्यांचा पारंपारिक व्यवसाय भीक मागणे हा नाही अशी माहिती दिली आहे.

# प्रकरण सहावे

## चर्चासत्रात (लक्ष्य गट चर्चा) गोसावी समाजाच्या प्रतिनिधींनी दिलेली माहिती

**१. दिनांक :** २१/०४/२०१७ , **वेळ:**४ ते ५, **ठिकाण:** कॉन्फरन्स हॉल, बार्टी, पुणे

**बैठकीचे उद्देश:** भटके गोसावी समाजाच्या प्रतिनिधींच्या समस्या व मागण्या समजून घेणे व इ.

दिनांक २१/०४/२०१७ रोजी बार्टी कार्यालयात गोसावी समाजाच्या प्रतिनिधींची बैठक प्राथमिक स्तरावर आयोजित करण्यात आली होती. श्री. राजू अडागळे सहा.प्राध्यापक यांनी सर्व प्रतिनिधीना विनंती केली कि, त्यांच्या बार्टी कडून काय मागण्या व अपेक्षा आहेत त्या मांडाव्या. पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे बैठकीला एकूण १५ प्रतिनिधी संपूर्ण महाराष्ट्रातून उपस्थित होते. त्यांची यादी खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | नाव |
|---|---|
| १ | राजेश अमृत गोसावी |
| २ | अप्पासो गणपती जाधव |
| ३ | राजकुमार अशोक घाडगे |
| ४ | दिपक सुरेश घाडगे |
| ५ | प्रदिप बाबजी पडियार |
| ६ | किशोर जीनपाल पडियार |
| ७ | विशाल यशवंत मठ्ठी |
| ८ | नेताजी शिवाजी गोसावी |
| ९ | सचिन जयसिंग जाधव |
| १० | राजेश जाधव |
| ११ | भागवत बंडू जाधव |
| १२ | काळूराम राजाराम गोसावी |
| १३ | संजय श्रीपती गोसावी |
| १४ | कमलाकर वाघमारे |
| १५ | दशरथ लक्ष्मण सावंत |

प्रतिनिधींनी  त्यांच्या समस्या व प्रश्न पुढीलप्रमाणे मांडले.

- ✓ शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही.
- ✓ कमी वयात लग्न म्हणजेच बालविवाह केल्या जातात.
- ✓ शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.
- ✓ शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे नोकरी सुद्धा मिळत नाही.
- ✓ आरक्षण मिळत नसल्यामुळे थोड्या फार प्रमाणात शिक्षण घेतलेले सुद्धा मागे पडतात.
- ✓ व्यवसाय करण्यासाठी बँकेकडून कर्ज सुद्धा मिळत नाही.
- ✓ आम्ही शासनाविषयी  उदासीन आहोत कारण शासन आमच्यावर विश्वासहर्याता दाखवत नाही.
- ✓ गोसावी आजसुद्धा अंधश्रद्धेवर जास्त विश्वास ठेवतात.
- ✓ उदरनिर्वाहासाठी आम्ही शिकार करायचो पण शासनाने शिकारी वर सुद्धा बंदी आणली आहे.
- ✓ समाजाचा गोसावी समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन उच्च-निच्च असा आहे.
- ✓ आजारी पडल्यास दवाखान्यात सुद्धा जात नाहीत तसेच लसीकरण सुद्धा घेत नाहीत.
- ✓ गोसावी समाजासामध्ये व्यसनाचे प्रमाण जास्त आहे. व्यसनाधीनता जास्त असल्यामुळे मृत्यू लवकर होतो म्हणून विधवांचे प्रमाण सुद्धा जास्त  आहे. बालविवाह पद्धत असल्यामुळे लहान लहान मुले महिलांनाच जबाबदारीने मोलमजुरी करून सांभाळावी लागतात.
- ✓ आज सुद्धा गाव-खेड्यांमध्ये आम्हाला भेदभावाची  वागणूक दिली जाते.
- ✓ राजकीय क्षेत्रात आम्हालाइच्छा असून सुद्धा संधी मिळत नाही.
- ✓ आम्ही गोसावी आहोत कि नाही हेच आम्हाला माहित नाही कारण आम्हाला ना कोणता इतिहास आहे ना पुरावे.
- ✓ २.५% सवलत शासनाने दिली आहे पण त्यात ५६ जाती जमाती आहे.
- ✓ जातीचे दाखले मिळत नाहीत.
- ✓ आमच्या बोली भाषेत भिल्ली, मारवाडी, गुजराती, राजस्थानी आणि मेवाडी भाषेंचे मिश्रण आहे.
- ✓ या समाजातील महिला भंगार गोळा करण्याचे काम करतात तर पुरुष मासेमारी, जनावरे पाळणे इ. काम करतात.
- ✓ पुण्यातील फुरसुंगी व यावत या भागात आजही गोसावी पाल टाकून राहतात व भिक्षा मागतात.
- ✓ जातीचे दाखले जरी काही लोकांना मिळाले तरी त्यावर चुकीच्या नोंदी झालेल्या आहेत.

- ✓ ज्या ज्या ठिकाणी गोसावो समाज राहतो ती सर्व गायरान जमीन आहे.
- ✓ आम्हाला गाव आणि आम्ही कुठून आलोत हे ही आम्हाला माहित नाही.
- ✓ आम्ही मंत्रालयात मागणी केली होती कि आमच्या समाजाचे संशोधन व्हावे.
- ✓ आम्ही आदिवासी सवलती मिळाव्या यासाठी प्रयत्न करीत आहोत.
- ✓ संशोधन व्हावे अशी आमची मागणी आहे.
- ✓ बैठकीत उपस्थित सदस्यांनी दिलेल्या माहितीनुसार गोसावी समाजाची लोकसंख्या पुढील तक्यात दशविली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | अंदाजित लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | सांगली | ४४,००० |
| २. | कोल्हापूर | ५५,००० |
| ३. | सातारा | ६०.००० |
| ४. | पुणे | ७०,००० |

**२.महाराष्ट्रातील गोसावी समाजाच्या सामाजिक-आर्थिक, स्थितीचा अभ्यास एक दिवसीय चर्चासत्र दिनांक- १४ जानेवारी, २०२०.**

**प्रमुख उपस्थिती :-**

१) **श्री. शिवाजी गोसावी,**

राष्ट्रीय प्रवक्ते, अखिल भारतीय महासंघ, भारत, बुधगांव-सांगली.

२) **श्री. संजय चव्हाण,**

राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय महासंघ, पुणे.

३) **श्री. रोहिदास घाडगे,**

प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अखिल भारतीय महासंघ, ताकारी-सांगली.

४) **श्री. लालासाहेब चव्हाण,**

राष्ट्रीय सरचिटणीस, अखिल भारतीय महासंघ, सांगली.

सदर चर्चासत्रात गोसावी समाजाच्या सामाजिक,आर्थिक स्थितीबाबत चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये वरील नमूद संघटनेचे शिष्टमंडळ तसेच गोसावी समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. या चर्चासत्रात उपस्थित प्रतिनिधी व समाजाचे कार्यकर्ते यांनी दिलेली माहिती तसेच त्यांच्या मागण्या खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**१) <u>गोसावी समाजाची पार्श्वभुमी-</u>**

पिढयानपिढया मिळालेल्या दंतकथानुसार गोसावी जमातीचे लोक आपल्या जमातीचा इतिहास सांगतात. राजस्थान मधील मेवाड प्रांतात मेवाडचे राजे महाराणा प्रतापसिंह व बादशाह अकबर यांच्यात दि.१८ जुन, १५७६ रोजी हळदी घाटाची लढाई सुरु झाली. त्या लढाई मध्ये आदिवासी जमातींच्या समूहांनी मिळून महाराणा प्रतापसिंहाच्या बाजूने मुघल बादशाह अकबरच्या विरोधात लढाईमध्ये अग्रस्थानी राहून महत्वाची भूमिका पार पाडली. पुढे या युद्धातून महाराणा प्रतापसिंहाना माघार घ्यावी लागली. महाराणा प्रतापसिंह यांच्या सैन्याचे फार मोठे नुकसान झाले. परंतु महाराणा प्रतापसिंह अकबरच्या हाती काही लागले नाहीत. अकबराने हे युध्द पुढे १० वर्षे चालू ठेवले. जंगलातील आदिवासी जमातींची साथ असल्यामुळेचं महाराणा प्रतापसिंग हाती लागत नाही हे अकबर जाणून होता, म्हणूनच त्या १० वर्षात अकबराच्या मुघल सैन्याने दऱ्या-खोऱ्यातील अनेक गावे लुटली. अन्याय, अत्याचार करून तिथल्या आदिवासी जमातींना त्यांनी निराधार केले. जीवन जगण्याची गरज,

मुघलांची दहशत आणि छळवणुकीतून सुटका या गरजे पोटी येथील आदिवासी जमातींनी वेषांतर करून गोसाव्यांच्या रुपात पलायन केले व वेगवेगळ्या प्रांतात विखुरले गेले.

पोटाची खळगी भरून जीवन जगण्यासाठी याच आदिवासी जमातीमधील काहींनी भिक्षा मागण्याचा मार्ग स्वीकारला व सतत भटकंती करू लागले. त्यांच्या वस्त्र व एकंदरीत आचार-विचारावरून, दाढी व केसांच्या जठा वाढवून भिक्षा मागत फिरण्याच्या वर्णनावरून या जमातील "गोसावी" असे नावं पडले. आपल्या कुटुंबाची उपासमार होऊ नये म्हणून गावांमध्ये जाऊन ही जमात भीक मागू लागली. भिकेमध्ये भाकरी, कालवण इत्यादी मागितले जात असे यावरूनच लोकं म्हणत असत कि भिकारी आला, भिकारी आला. म्हणूनच लोकांकडून "गोसावी" हे नावं मिळाले. प्रत्यक्षात गोसावी जमाती मधील ज्या १३ उपजाती आहेत. त्या उपजातींचे राहणीमान, खान-पान, रूढी-परंपरा, चाली-रिती, दफन पध्दती, संस्कृती, लग्न-परंपरा, न्याय पंचायत, सण-उत्सव, देव-देवता, रोटी-बेटी व्यवहार, बोली-भाषा, परंपरा यामध्ये कोठेही समानता आढळून येत नाही. या सर्वच बाबी त्याच्यापेक्षा भिन्न आणि वेगळ्या आहेत.म्हणूनच आमची जमात ही मूळ कोणती जमत आहे? आमच्या जमातीचा इतिहास काय? यासाठीच आमच्या जमातीचे संशोधन व अभ्यास करणे ही काळाची गरज आहे. असे उपस्थित सर्व प्रतिनिधींनी सांगितले.

**२) <u>गोसावी समाजाची वैशिष्टये-</u>**

- **व्यवसाय-**

पोटाची खळगी भरुन जीवन जगण्यासाठी गोसावी जमातीकडे कोणतेही साधन नसल्याने सतत भटकंती करत असलेने, जंगलात राहत असलेने, गोसावी जमातीचा पिढीजात पारंपारिक व्यवसाय जंगलामध्ये शिकार करणे होय. शिकारीमध्ये जंगली प्राणी मारुन ते भाजून खाल्ले जात असत. गोसावी जमात संपूर्ण जीवन जंगलात जगत असल्याने विविध औषधी वनस्पतींची त्यांना माहिती होती. त्याच औषधी वनस्पतींच्या माध्यमातून ते काही आजारां वर उपचारही करत. कालांतराने भिक्षा मागण्याबरोबरच काच, पत्रा, बाटली, कागद (भंगार) गोळा करणे, खेकडे पकडणे, मासेमारी करणे या व्यवसायांचा स्वीकार केला.

गोसावी जमातीमध्ये शिक्षणाचा अभाव असल्याकारणाने नोकरी किंवा उदयोग-धंद्याची माहितीही नाही. परिणामी कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी भटकंती करत भिक्षा मागण्याशिवाय मार्गच उरला नाही. त्याचप्रमाणे संपूर्ण गोसावी जमात ही भूमिहीन असल्याने दुसऱ्याच्या शेतावर जाऊन रोजगार करुन जीवन जगणे पसंद करतात. गोसावी जमातीमधील कुटुंबे रोजगार व अन्नाच्या शोधात विविध खेडयामध्ये किंवा शहरामध्ये स्थलांतर करतात. धकाधकीच्या जीवनामध्ये पारंपारिक व्यवसायावर जीवन जगणे कठीण होत

असल्याने मिळेल तो रोजगार व उदयोग धंदा करण्याकडे कल वाढलेला आहे. पुरुष मंडळी मजुरी, छत्र्या या दुरुस्त करण्याबरोबर गावोगावी जाऊन बेनटेक्स, सुगंधी अत्तार, तसेच झाडपाल्यांपासून बनवलेली औषधे विक्री करण्याचे काम करतात. महिलाही केसा वर फुगे, बेन टेक्स विक्री, मजुरी, भांग लन करतात त्यासोबतच गुरांना चारा आणण्याचे ही काम करतात. असे उपस्थित सर्व प्रतिनिधींनी सांगितले.

- **आडनावे-**

गोसावी जमातीमध्ये पुढीलप्रमाणे आडनावे आढळून येतात. १) घाडगे-घटाड, २) चौहान-चव्हाण, ३) बामण्या-बामणे, ४) राठोड-आटोळे, ५) वाघेला-वाघमारे, ६) गोळे, ७) पवार, ८) मांगळया, ९) पडियार, १०) चंवाळ, ११) जुवां, १२) उमट, १३) सोळंकी, १४) मकवाना, १५) शिंदे असे उपस्थित सर्व प्रतिनिधींनी सांगितले.

- **पोटजाती-**

गोसावी जमातीमध्ये अनेक पोटजाती (गोत्र) आहेत. त्यास बावन-बाविशी असे संबोधले जाते.

| अ. क्र. | पोटजात | अ. क्र. | पोटजात |
|---|---|---|---|
| १ | चंवाळ | २७ | गुंदी |
| २ | पडियार | २८ | कडवा |
| ३ | घटाड | २९ | पंख्या |
| ४ | मांगळया | ३० | सोळंकी |
| ५ | खागाळ | ३१ | पठारे |
| ६ | धांदू | ३२ | उंदे |
| ७ | जुवां | ३३ | नरुके |
| ८ | राठोड | ३४ | भूरानी |
| ९ | काळमा | ३५ | बेमटया |
| १० | वाघेला | ३६ | धेड-अंध्या |
| ११ | बामळया | ३७ | देवडे |
| १२ | तेवारया | ३८ | रावळ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | पंवार | ३९ | एदाने |
| १४ | उमट | ४० | भांडवलकर |
| १५ | मकवाळा | ४१ | वंश |
| १६ | ईसाळवंत | ४२ | बेंडपे |
| १७ | मुळीयानी | ४३ | मिश्री |
| १८ | गेहलोत | ४४ | लाव्हे |
| १९ | घोईल | ४५ | मच्छर |
| २० | लुनगेतर | ४६ | भाटि |
| २१ | गोळे | ४७ | अग्रवाले |
| २२ | गौड | ४८ | हरे |
| २३ | ढेकण्या | ४९ | शिंदया |
| २४ | खत्री | ५० | कोळी |
| २५ | मेळा | ५१ | माळन्यापडियार |
| २६ | धतवेतर | ५२ | धारपंवार |

अशा प्रकारे गोसावी जमातीमध्ये अनेक पोट जाती आहेत. सजातीय पोटजाती अंतर्गत लग्न लावले जात नाही. महाराष्ट्र शासनाच्या एन. टी. ब. च्या प्रवर्गातील

गोसावी:- १) बावा २) बैरागी ३) भारती ४) गिरी गोसावी ५) भारती गोसावी ६) सरस्वती पर्वत ७) सागर ८) बाण किंवा वान ९) तीर्थ आश्रम १०) अरण्य घरभारी १२) संन्याशी १३) पुरी

या १३ तत्सम जातीपैकी हि गोसावी जमात पूर्णपणे भिन्न आहे. वरील तत्सम १३ जातींचा गोसावी जमातीशी कोणताही संबंध किंवा पोट जाती असलेचे आढळून येत नाही. तसेच १३ तत्सम जातीमध्ये व आमच्या गोसावी जमाती मध्ये रोटी-बेटीचे व्यवहार होत नाहीत. त्याचप्रमाणे रुढी-परंपरा, चाली-रिती, संस्कृती ही पूर्णपणे भिन्न आणि वेगळया आहेत.असे उपस्थित सर्व प्रतिनिधींनी सांगितले.

➢ **बोलीभाषा-**

वेगवेगळ्या प्रांतात राहणाऱ्या गोसावी जमातीची स्वतंत्र अशी एक बोली-भाषाआहे. पण लिपी मात्र नाही, जी संपूर्ण भारत देशात **गोसावी** बोली स्वरुपात बोलली जाते. परंतु लिखित स्वरुपात त्याचा कोठेही उल्लेख आढळून येत नाही यांस **गोसावी** भाषा असे म्हटले जाते. गोसावी जमात ही मुळची राजस्थान प्रांतातील असल्यामुळे त्यांच्या भाषेवरती राजस्थानी भाषेचा मोठा प्रभाव दिसून येतो.

गोसावी जमातीची स्वतंत्र अशी एक बोलीभाषा आहे. राजस्थानी, गुजराती, हिंदी अशी मिश्रित स्वरुपाची भाषा गोसावी जमातीची आहे यांस **गोसावी** बोली भाषा असे म्हटले जाते. लहान मुले-बाळे ही त्या कुटुंबामधील वातावरणातच वाढत असल्याने वंशपरंपरेनेतीच भाषा आपोआप अवगत होत जाते व ती गोसावी भाषा बोलू लागतात. गोसावी भाषेची नोंद शासन दरबारी कोणत्याही ठिकाणी आढळून येत नाही. परंतु गोसावी बोलीभाषा संपूर्ण भारत देशात कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेशत सेचविविध राज्यामध्ये एकसारखीच बोलली जाते.

महाराष्ट्र शासनाच्या एन. टी. ब. या प्रवर्गातील गोसावी यांच्या १३ तत्सम जातीपैंकी गोसावी बोलीभाषा पूर्णपणे भिन्न व वेगळी आहे.

गोसावी:- १) बावा २) बैरागी ३) भारती ४) गिरी गोसावी ५) भारती गोसावी ६) सरस्वतीपर्वत ७) सागर ८) बाण किंवा वान ९) तीर्थ आश्रम १०) अरण्य ११) घरभारी १२) संन्याशी १३) पुरी

वरील तत्सम १३ जातींपेक्षा आमच्या गोसावी जमातीची बोलीभाषा पूर्णपणे वेगळी व भिन्न आहे. गोसावी जमातीची बोलीभाष ही फक्त त्यांच्यामध्येच किंवा जमाती अंतर्गतच बोलली जाते. इतर समाजातील व्यक्तीबरोबर बोलत असताना इतर समाजातील व्यक्ती फार उत्सुकतेने बोलणाऱ्या माणसांच्याकडे पाहत असतात व आवर्जून हि कोणती भाषाबोलता आहात अशी विचारणा करतात. यावरुनच गोसावी बोलीभाषेचे वेगळेपण दिसून येते.

गोसावी भाषेमध्ये एकेरी शब्दांचा वापर जास्त प्रमाणात आढळून येतो. लहान तसेच मोठया व्यक्तीबरोबर बोलत असताना एकेरी वाक्याचा शब्दप्रयोग केला जातो. जसे इतर भाषेमध्ये एखादया मोठया व्यक्तीबरोबर बोलताना आदर युक्त शब्दांचा वापर केला जातो. त्याउलट गोसावी भाषेमध्ये मोठया

व्यक्तीबरोबर किंवा लहान व्यक्तीबरोबर बोलताना तसेच पत्नीदेखील पतीबरोबर बोलताना देखील एकेरी शब्दांचा वापर केला जातो. असे उपस्थित सर्व प्रतिनिधींनी सांगितले.

- **चालीरीती-**

संस्कृती, लग्न-परंपरा, सण-उत्सव, देव-देवता, रोटी-बेटीव्यवहार, बोलीभाषा, दफनविधी

- **रुढीपरंपरा-**

गोसावी ही जमात रोजगाराच्या शोधात सतत भटकत असल्याने होळी व दसरा या सणाला एकत्र येत असतात. एकत्र आल्यामुळे तेथील वातावरण उत्साह पूर्ण असते. महिलांचा उत्साह पाहण्यासारखा असतो. गोसावी जमातीमध्ये दसरा होळी या सणामध्ये देवी-देवतांची पौराणिक गाणी गायली जातात. तसेच लग्नामध्ये नवरा मुलगा / मुलगीची नांवे घेऊन फेर धरत गाणी गायली जातात.

गोसावी जमातीमध्ये तर स्त्रियांना सामुहिक गाणी गाण्याची उपजतच आवड असते. लग्नाची तसेच देवी-देवतांची गाणी परंपरागत चालत आलेली असतात. गोसावी जमातीची गाणी ही खूपच मार्मिक असतात. ज्यामध्ये जीवनामधील घडामोडींचासारत्यामध्ये आढळून येतो. चार महिला एकत्र आल्या की त्यांचे दोन गट तयार होतात. काही वेळेला गोसावी जमातीमधील घडलेल्या जुन्या घटनांचा आधार घेऊन त्या घटनांचा उल्लेख त्या गाण्यामधील ओळीमध्ये केला जातो एकीमेकींना टोमणे मारत सुध्दा गाणी गायली जातात. प्रौढ महिलांपैकी कोणी तरी गाणी म्हणायला सुरुवात करते. एका गटाने एक ओळ गायली की दुसऱ्या गटानेतीच ओळी परत गायची जो पर्यंतती महिला गाण्याची पुढची लय सोडत नाही तो पर्यंत दोन्ही गटात गायलेल्या ओळींचे आवर्तन सुरु राहते. एकच ओळ पुन्हा-पुन्हा म्हटल्यामुळे इतरांच्या कानावर जाऊन ती गाणी इतरांना आपोआपच पाठ होतात. देवी-देवतांचा नैवेदय करत असताना महिला गाणी म्हणतात. एखादया बाळाला गवर निघाली तर शितळा देवीची गाणी म्हटली जातात. होळी पेटवताना होळीच्या भोवताली फेर धरुन नृत्य करत होळीची गाणी गायली जातात. अजून ही गोसावी जमातीमधील गाणीही लेखी स्वरुपात आढळून येत नाहीत ती फक्त मौखिक स्वरुपातच गायली जातात. असे उपस्थित सर्व प्रतिनिधींनी सांगितले.

- **सण-समारंभ**

होळी व दसरा हे गोसावी जमातीचे प्रमुख सण आहेत. भटकंती करण्यासाठी गेलेली गोसावी जमातीची सर्व लोक होळी व दसरा सणा वेळी मोठया प्रमाणात एकत्र येऊन सण उत्साहा नेव आनंदाने साजरे केले जातात.

पोटाची खळगी भरुन जीवन जगण्यासाठी दूरवर गेलेला समाज बांधवकसलीही अडचण आली तरी त्यावर मात करुन हे सण साजरे करण्यासाठी आपापल्यामुळ ठिकाणी हजर राहतात. प्रत्येक गोत्रानुसार कुलदैवत हे एकच असते.

- **देवदेवता-**

गोसावी जमातीची देवदेवता वर फार श्रध्दा आहे. गोसावी जमातीमध्ये **देवक** याला फार महत्व आहे. श्रध्दा आणि विश्वास या आधारावर गोसावी जमातीच्या देवी-देवताविषयी असणाऱ्या भावना अतिशय दृढ आहेत. देवाला संतुष्ट करण्यासाठी कोंबडे व बकरे यांचा बळी दिला जातो. प्रत्येकाच्या गोत्रानुसार देव-देवता हि वेगवेगळया आहेत. गोसावी जमात आपले जीवन जगत असताना सभोतालच्या वातावरणाचा त्यांच्या जीवनावर परिणाम झाला असून ते धार्मिक दृष्टया देव-देवताविषयी अत्यंत श्रध्दाळू आहेत.

शितळा देवी सर्व गोत्रांची प्रमुख देवता मानली जाते. त्याचबरोबर मरी आई व लक्ष्मी या देवता सर्व गोत्रामध्ये आढळून येतातच. महाराष्ट्र राज्यामध्ये वास्तव्यास असणाऱ्या सर्व गोत्रामध्येवरील देवतांची पूजा केली जाते. त्याचबरोबर इतर देवतांची ही पूजा केली जाते. मरीआई, लक्ष्मी, शितळा, चाळंददेवी, काळफोडी, शिकोतर, खाडकोदवी, खोडीयार, खंडोबा, आशापुरादेवी, हिरेकरी, रंळीयार, बोधली, चावंड, कंमळभैरी, काळाकाईमाता, काळभैरव, म्हाळसा, चामुंडा, महाकाली, साक्रीमाता, भांग्यामहाराज, डोकरोमहाराज, कालीमाता, काळश्री, झाडावाली व इतर अशी गोत्रानुसार दैवते व कुलदैवते आहेत. गोसावी जमातीची दैवते मोकळया जागेमध्ये शेणानेसारवलेल्या ठिकाणी उभ्या काठीला चोळीच्या खनाने सजवून त्याकाठीस सिंदूर लावून मातीमध्ये रोवल्या जातात व त्यांची पूजा-अर्चा केली जाते. प्रत्येक देवदेवतांची भक्ती हि वेगवेगळयाप्रकारे केली जाते. सर्व महिला एकत्र येऊन होळी व दसरा सणामध्ये दहा दिवस देवीची गाणी म्हणून व विविध पारंपारिक खेळखेळून जागरण करुन हा सणसाजरा केला जातो. देवीसमोर नऊ दिवस तेलाचा दिवा सतत तेवत ठेवला जातो. कुल दैवतांना गोड नैवेदय दाखविला जातो व इतर देवदेवतांना कोंबडे, मेंढे व बकरे यांचा बळी दिला जातो.

- **आहार पध्दती-**

पूर्वीपासून गोसावी जमात जंगलात राहत असल्याने शिकार करणे हा आवडीचा छंद होता. गोसावी जमात ही शाकाहारी कमी व मांसाहारी जास्त आहे. शिकारीसाठी वागरी, कुत्री, फासे, पिंजरे पाळण्याचा छंद होता. शिकारीमध्ये भूंगर (मुंगुस), गेंदर (कोल्हा), लोकडी (खोकड), मिनकी (मांजर), चीपट (घोरपड), सालगो

(खवल्यामांजर), रुदडा (उदमांजर), शेवं(साळींदर) टिलोडी (खारुटी), पोसडी (भाट), कोळसो (इजाट), रानमांजर (बलाडो), रानकोंबडी, ससा, तितर अश्या प्रकारचे विविध प्राणी व पक्षी मारुन ते भाजूनखाल्ले जात असत. कालांतराने काळाच्या ओघामध्ये शासनाने शिकारीवरबंदी आणल्याने गोसावी जमातीने शिकार मारणे बंद केले. परंतु मांसाहार करणे अजून ही सोडलेले नाही. त्याचबरोबर नदी-नाले व ओढयामध्ये खेकडे व मासेपकडून आणून ते आवडीने भाजून खात असत. आहारामध्ये शिकारीचे मांस जास्त असलेने ते खाल्ले जावे या हेतूने ते मदयपान करत असत. त्याचबरोबर पानखाणे हा एक छंद गोसावी जमातीमधील पुरुष व महिलांमध्ये आढळून येतो.

गावामधून भिक्षामागून आणली जाते. त्यामध्ये शिळी भाकरी, कालवण, भात असे हे सर्व एकाच पिशवीत भरलेले असत. कालवणासाठी भांडे वापरले जात असत. हीच मागून आणलेली भिक्षा कुटुंबाची भूक भागवत असे काही अन्न शिल्लक राहिले तर ते तसेच झाकून ठेवायचे आणि सायंकाळी पुन्हा तेच खायचे मगते अन्न खराब झाले किंवा नाही याची सुध्दा पर्वा करत नाही.

- **विवाह पध्दती, हुंडा पध्दती, आंतर जातीय विवाह-**

विवाह करताना वधुमुल्या म्हणून काही रक्कम मुलीच्या वडिलांना दयावी लागते व विवाहाचा सर्व खर्च हा नवऱ्या मुलाने करायचा असतो. गोसावी जमातीमध्ये बालविवाह पध्दत खूप मोठया प्रमाणात आढळून येते.पूर्वी मुल लहान असतानाच पाळण्यात बाशिंग बांधून लग्न लावले जात असत. कालांतराने हि पध्दत बंद होत गेली. परंतु बालविवाहाचे प्रमाण काही कमी झाले नाही. गोसावी जमातीमध्ये तीन ते चार दिवसाचा लग्न सोहळा आयोजित केला जातो पहिल्या दिवशी साखरपुडा व हळदी, दुसऱ्या दिवशी लग्न व तिसऱ्या दिवसी साडे-माडे वाटण्याचा कार्यक्रम असतो. एकाच गोत्रामध्ये लग्नसंबंध होत नाहीत, गोसावी जमातीमधील लग्न समारंभामध्ये ६० च्या कायदयाला फार महत्व आहे. त्या कायदयानुसारच लग्न सोहळा पार पडतो. मुलां-मुलींची लग्न हि त्यांच्या पसंतीनुसार ण ठरता त्यांच्या आई-वडिलांच्या पसंतीनुसारंच ठरतात. लग्न ठरवीत असताना लग्नपत्रिका तसेच मुलीला कायदयाने ६० रुपये हुंडा दिला जातो. यालाच “देज” असे म्हणतात. तसेच लग्न हे नवरी मुलीच्या दारातच केले जाते व त्या लग्नाचा संपूर्ण खर्च हा नवऱ्या मुलाने करावा लागतो.

**देवरबट्टा-** गोसावी जमातीमध्ये एखादया विवाहित महिलेचा पती मयत झाल्यास त्या महिलेचे मत विचारात घेऊन त्या महिलेचा पुनर्विवाह हा त्या मयत पतीच्या लहान भावाबरोबर केला जातो.यालाच गोसावी जमातीमध्ये 'देवरबट्टा'असे म्हटले जाते.गोसावी जमातीमध्ये दोन्ही कुटुंबाचे संबंध टिकून राहावेत या उददेशाने दीरभावजय

विवाह केला जातो.पती निधनानंतर भावजय परत माहेरी जाऊ नये,मुलांचा सांभाळ व तिच्यासोबत संबंध टिकून रहावेत तसेच वधूमूल्यही बचत होते, हा उद्देश प्रामुख्याने दीर-भावजय विवाहामागे होता.या विवाहाला समाज मान्यता होती. याहीवेळी गोसावी जमातीच्या कायदेशीर बाबी पार पाडूनच (दिराकडून गोतीस २ रुपये दिले म्हणजे जोगी मध्ये गोधडी ओळखली म्हणून समजतात) देवरबट्टा केला जातो. परंतु लहान भाऊ मयत झाला तर थोरल्या भावास धाकटया भावाची बायको करून घेण्याचा रिवाज नाही, जर तसे केल्यास त्यास पाप म्हणून समजले जाते.

- **जन्म-मृत्युपध्दती-जन्म-**

सतत भटकंती करत असल्याने गोसावी जमातीमधील लोकांचा जन्म कुठे झाला? किती वाजता झाला ? याची नोंद मात्र कुठेच आढळून येणार नाही. सहसा माझा जन्म पाला तच झाला आहे असे सांगतात. एखादया कुटुंबामध्ये मुल जन्माला आले तर पाचव्या दिवशी पाच सुवासिनी एकत्र येऊन पालातच दोरीचा पाळणा बांधतात तसेच सर्वांना गुळ व खोबरे वाटून आनंद साजरा करतात व बाळाचे नांव ठेवतात. मुलगी जन्माला आली तर फारच आनंदी असतात.

घटाड व मांगळ या तसेच अन्य काही गोत्रामध्ये लहान मुलांचे जावळ काढताना त्यांच्या देवतांना २ बक-यांचा बळी दिला जातो. हा कार्यक्रम साधारणत: पाडवामुहूर्तावर केला जातो. या दिवशी भगत त्यांच्या देवतांची स्थापना करतात व देवीची पूजा करतात. या गोत्रामध्ये मुलगा जन्माला आल्या सहेकार्य करावेच लागते. परिस्थितीनुसार मुल मोठे होईपर्यंत कधी ही जावळ काढले तरी चालते.

**मृत्यु-**

गोसावी जमातीमध्ये एखादी व्यक्ती मयत झाल्यास दफन करण्याची पध्दत आहे. सतत भटकंतीचे जीवन जगत असलेने ज्या ठिकाणी वस्तीस असेल त्या ठिकाणी एखादी व्यक्ती मयत झाली तर त्या ठिकाण च्या आस पास वस्तीस असणाऱ्या जमातीमधील लोकांना बोलावून घेऊन नदी-नाले ओढया-काठी, जंगल माळरान बघून प्रेत दफन करण्यासाठी खड्डा काढला जात असे. साधारणत: पाच ते सहा फुट खोल व रुंद असा खड्डा काढला जातो. मयत व्यक्तीच्या तोंडामध्ये चांदीचा एखादा तुकडा असेल तर घातला जातो. मयत व्यक्तीचे दोन्ही हात छातीवर ठेवून ते दोऱ्याने बांधले जातात व त्या हातामध्ये गव्हाच्या पिठाचा गोळा करुन ठेवला जातो. तसेच पायाचे ही दोन्ही अंगठे जुळवून ते दोऱ्याने बांधले जातात. झोपडीपासून दफन खड्डयापर्यंत प्रेत नेण्यासाठी

त्याच व्यक्तीच्या झोपडीचा बांबू उखाडला जातो व त्या बांबूला चादर बांधून त्या चादरीमध्ये प्रेत झोळीसारखे गुंडाळले जाते. पूर्वी खांदेकरी दोघेचे असत. हल्ली बदलत्या काळामध्येचौघे खांदे करी असतात.

प्रेत दफन करताना त्या खडडयामध्ये प्रेत सरळ खाली ठेऊन त्यावर मीठ व माती टाकली जाते. तसेच बोरीचे काटे ही टाकले जातात वरुन माती व दगडाचे थर दिले जातात. दफन केलेली व्यक्ती भूत-पिशाच्च होऊन परत येऊ नये यासाठी काही वेळेला खिळे व राई त्या खड्डयामध्ये टाकत असा समज व दृढ अंधविश्वास आहे. अश्याप्रकारे प्रेत दफन केले जाते. दफन करुन झाल्यानंतर दफन खडडयापासून काही अंतरावर एक बोरीचे काटे असणारी फांदी ठेवून त्यावर एक लहानसा दगड ठेवला जातो. दफन करण्यासाठी आलेल्या सर्वांनी डाव्या हातामध्ये लहान-लहान सात खडे घेऊन त्या फांदीवरील दगडावर एक पाय ठेवून पाठीमागे न पाहता डाव्या हातामधील खडेपाठी मागील बाजूस टाकायचे व पुढे निघून जायचे असते.

पूर्वी गोसावी जमातीला एका गावांमध्ये तीन दिवसाच्यावर राहण्याची परवानगी मिळत नसल्यामुळे मयत व्यकती दफन करुन त्याठिकाणी वस्तीस असणारी कुटुंबे आपला संसार मुलं-बाळे घेऊन पुढील गांवाचा प्रवास सुरु करतात. तीन दिवसाचा मातीचा विधी म्हणजेच गोसावी जमातीमध्ये यास तीन दन रोपाळी असे म्हणतात. तीन दिवसाच्या विधीसाठी नदी ओढा किंवा पाणवठयाचे ठिकाण बघून जागा निश्चित केली जाते. त्याठिकाणी काठावर पाणी भरुन तीन लोटकी ठेवून त्या प्रत्येक लोटकयाला धागा गुंडाळला जातो. त्या तिन्ही लोटक्यावर एक-एक भाकरी ठेवून त्यावर मुगाची डाळ घालून एकत्रित शिजविलेला भात ठेवला जातो . तर गोत्रांचे सुतक फिटावे म्हणून त्या भातामध्ये मासा, खेकडा किंवा अंडे मिसले जाते. यानंतर नैवेदय म्हणून आणलेले साहित्य एका पत्रावळीमध्ये ठेवून थोडया अंतरावर त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीद्वारे तो ठेवला जातो. नैवेदय ठेवल्यानंतर तो कावळयाने शिवला तर ठीक नाही तर एखादी गाय आणून तो नैवेदय गाईला दाखविला जातो नाही तर शेवटी पाण्यामध्ये सोडून दिला जातो. नैवेदय दाखवून झाल्यानंतर खांदेकरीयांचे खांदे उतरले जातात. खांदेकरीयाच्या कमरेला पांढरे कापडाची पट्टी बांधले जाते व त्याला पांढऱ्या कापडाची पट्टी लंगोटी म्हणून बांधावयास देतात. तसेच गळयामध्ये पांढऱ्या दोऱ्याचे जानवे घातले जाते. एखादया लहान वाटीमध्ये गोडे तेल व हळद एकत्र करुन घेतले जाते. ते हळद तेल सुरुवातीला खांदेकरीयाने हाताच्या दोन्ही अंगठयाने प्रथम पायाच्या अंगठयांना लावूननंतर गुडघ्यांना खांदयाला व कपाळाला लावले जाते. असे तीन वेळा केले जाते. तीन वेळा केले जाते. तीन दगडाची चुल करुन त्यावर एखादे पातेले ठेऊन पाणी गरम करुन ते गरम पाणी खांदेकरीयांना अंघोळीसाठी दिले जाते अश्याप्रकारे खांदे उतरविले जातात. त्या मयत व्यक्तीस प्रथम पाणी पाजण्याचा मान ही त्याखांदेकरीयांनाच असतो. त्यानंतर कुटुंबातील व्यक्तींनी व इतर व्यक्तींनी पाणी पाजवयाचे

असते. पाणी पाजत असताना हरेळीच्या गवतापासून बनविलेल्या अंगठया यांचा वापर केला जातो. ती अंगठी डाव्या हातामधील करंगळीच्या बोटामध्ये घालून उजव्या हातामध्ये मिश्रण केलेला भात घेऊन त्या लोटक्यावर शिंपडला जातो व पीपाणी असे म्हणून दोन्ही हाताने पाणी त्या लोटक्यावर शिंपडले जाते. अश्याप्रकारे तीन दिवसाचा विधी संपन्न होतो.

गोसावी जमातीमधील एखादी पुर्नविवाहित (मुहुतूर झालेली) स्त्री मयत झाल्यास त्याचा सर्वविधी हा तीन दिवसातच उरकला जातो.

गांवघर चंवाळ व मांगळया या गोत्रामध्ये मयत व्यक्तीचा सर्वविधी हा तीन दिवसातच पारपाडले जातात. त्यांच्या तीन दिवसाच्या विधीमधील पाणी पाजण्यास धर्माचे पाणी असे म्हणतात व इतर गोत्रामध्ये तीन दिवसाच्या पाणी पाजण्यास मोलरो पाणी असे म्हणतात. यालाच दुखवटा असे ही म्हणतात. त्याचप्रमाणे गांवघर चंवाळव मांगळया या गोत्रास इतर गोत्रांच्या बारा दिवसाच्या कार्यामध्ये सहभागी होता येत नाही कारण त्यांच्यात बारा दिवसाचे पाणी पाजत नाहीत म्हणून जर बाराव्या दिवसाचे कार्य गांवघर चंवाळ व मांगळया या गोत्रामध्ये घेतले तर मोठा कार्यक्रम घेऊन त्या दुखात सहभागी होणाऱ्या सर्व व्यक्तीना आहेर म्हणून काहीना काही घ्यावे लागतेच व जेवण खर्च, मान-पान असा हा विधी खर्चिक असल्याने बारा दिवसाचे कार्य सहसा करत नाहीत. गांवघर चंवाळ व मांगळया या गोत्रामध्ये वारसांचे मुंडण (केस-दाढी) तिसऱ्या दिवशीच केले जाते. तसेच इतर सर्व गोत्रामध्ये बाराव्या दिवसी वारसांचे मुंडण्ण (केस-दाढी) केले जाते. व्यक्ती मयत झाली आहे त्याच्या दुसऱ्या दिवशी रात्री ज्या जागेवर व्यकती मयत झाली असेल ती जागा शेणाने सारवून पवित्र बनविली जाते. त्या जागेवर सुपामध्ये किंवा परातीमध्ये राख किंवा पीठ चाळून त्यावर टोपली नीट झाकून ठेवली जाते. तिसऱ्या दिवशी सकाळी त्या परातीवर किंवा सुपावर कशाचे चिन्ह उमटले आहे याची बारकाईने पाहणी केली जाते व त्यावरुन तर्क किंवा अंदाज काढला जातो की मयत व्यक्ती अमुकया जन्माला येणार आहे अशी श्रध्दा बाळ गली जाते. तीन दिवसाचा विधी उरकल्यानंतर संसार, कुटुंबे, मुले-बाळे घेऊन पुढच्या प्रवासाला निघायचे त्या ठिकाणी बारा दिवसाचे पाणी पाजण्याचे कार्य आयोजित करायचे याही वेळी नदी, नाले, ओढे, पाणवठयाचे ठिकाण बघून बारा दिवसाचा विधी साजरा केला जातो. या वेळी पाच लोटकी ठेवली जातात ते दोऱ्याने गुंडाळून त्या पाच लोटक्यावर भाकरी व भाताचा नैवेदय ठेवून तीन दिवसाच्या विधीप्रमाणे चहा ही विधी पारपाडला जातो. पूर्वी गोसावी जमातीमध्ये सतत भटकंती करत असल्यामुळे नातेवाईक व गोतावळा यांना मयताचा निरोप देणे शक्य होत नव्हते मग अश्या वेळी हा तीन दिवसाचा विधी सहा-सहा महिने केला जात नव्हता. मग अश्या वेळी होळी किंवा दसरा सणा वेळी सर्व कुटुंबे, नातेवाईक, गोतावळा एकत्र येतात त्यावेळी हा तीन दिवसाचा

विधी पारपाडला जात होता. अश्याप्रकारे गोसावी जमातीमध्ये मयत दफन व तीन दिवसाचे पाणी पाजण्याची पध्दत आहे.

**३) आर्थिक परिस्थिती-**

- **कुटुंबाचा पारंपारीक व्यवसाय-**

मुळातच गोसावी जमात भूमि हीन असलेने शेतमजुरी व रोजगाराशिवाय उपजीविकेचे कोणतेही दुसरे साधन नाही. सतत भटकंती करत असल्याने निवाऱ्याचा प्रश्नच येत नाही. पिढीजात व पारंपारिक असा कोणताही व्यवसाय नसल्यामुळे पुरुष नदी, नाले किंवा ओढयाकाठी मासेमारी व खेकडे पकडणे व त्याची घरोघरी जाऊन विक्री करणे यामधून जे उत्पन्न मिळेल त्यावर कुटुंबाची गुजराण चालते. पुरुषांच्या बरोबर महिलां ही लहान मुल असेल तर पाठीवर बांधूनच काच, पत्रा, बाटली, कागद (भंगार) गोळाकेल्याशिवाय कुटुंबाचा चरितार्थ चालत नाही. काही महिला देव-देवतांचे फोटो घेऊन भिक्षा मागत असतात. भिक्षेमध्ये तांदूळ, पीठ असे मागून आणले जात असत.

- **उत्पनाची इतर साधन-**

सौदा विकणे, आयुर्वेदिक वनौषधी विकणे, शेत मजुरी, अत्तर विकणे, बिगारी काम इ. स्वरुपाची कामे केली जातात.

- **जमिनीची मालकी-**

गोसावी जमात सतत भटकंती करीत असल्यामुळे समाजातील लोकांकडे जमीनीची मालकी नाही. सद्यस्थिती मध्ये अतिक्रमण केलेली जागा असल्याचे सांगण्यात येत आहे.

- **शेती करतात का ?**

भूमीहीन असल्यामुळे शेती व्यवसाय केला जात नाही.

- **घरे-**

अतिक्रमण तसेच गायरान जागेमध्ये घरबांधणी करण्यात येते.

- **स्थावर मालमत्ता-**

गोसावी जमात सतत भटकंती करत असल्यामुळे सदर जमातीमधील व्यक्तींकडे स्थावर मालमत्ता नाही. अलीकडील १० ते १५ वर्षामध्ये थोडयाफार व्यक्तींनी स्थावर मालमत्ता घेतल्याबाबत चर्चे दरम्यान सांगण्यात आले.

➢ **मासिक उत्पन्न-**

मासिक उत्पन्न किमान १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) असल्याबाबत सांगण्यात आले.

**४) शैक्षणिक स्थिती-**

गोसावी जमातीमध्ये सतत भटकंतीचे जीवन, अस्थिरता, दारिद्रय, अज्ञान, मागासलेपणा या व इतर अश्या गोष्टीमुळे शिक्षणाची गंगा गोसावी जमातीपर्यंत पोहोचलीच नाही. परिणामी बाहेरील जगाच्या घडामोडीपासून हा समाज दूरच राहिला. गोसावी जमातीमधील १०/२० टक्के मुलां व मुलींना शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला. परंतु १९६१ पूर्वीचा रहिवाशी पुरावा अश्या जाचक अटीमुळे शासनाच्या विविध सोयी-सवलती गोसावी जमाती सन मिळू शकल्याने शिक्षण व गोसावी जमात यांच्यात दुरावा निर्माण होत गेला.

**५) महिलांचे स्थान-**

गोसावी जमातीमध्ये महिलांना दुय्यम स्थान आहे.

**६) इतर समाजाकडून मिळणारी वागणुक-**

समाजाची राहणीमान गलिच्छ असल्यामुळे तुच्छेतेने पाहिले जाते. इतर जाती-धर्माच्या लोकांसोबत दूराव्याचे संबंध आहे. अस्पृश्य समाज सुध्दा समर्थनात उभे राहत नाही.

**७) गोसावी समाजाच्या वस्त्यांचे गावामधील स्थान-**

गावाच्या बाहेर माळरानावर गोसावी वस्त्यां वसलेल्या असतात. मुख्य गावापासून व इतर सोयी सुविधेपासून विभक्त असतात. असे सांगण्यात आले.

**८) गोसावी समाजाचे वास्तव्य-**

**महाराष्ट्रातील वास्त्याव्याची मूळ ठिकाणे / स्थलांतर-**

सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे या जिल्ह्यांमध्ये गोसावी समाज मोठया प्रमाणात आढळून येतो. वरील जिल्ह्यांपैकी सातारा जिल्ह्यांमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या गोसावी समाजाची आहे.

**९) रोटी-बेटी व्यवहार-**

सजातीय पोटजाती अंतर्गत लग्न लावले जात नाही. महाराष्ट्र शासनाच्या एन. टी. ब. च्या प्रवर्गातील

गोसावी:- १) बावा २) बैरागी ३) भारती ४) गिरी गोसावी ५) भारती गोसावी ६) सरस्वती पर्वत ७) सागर ८) बाण किंवा वान ९) तीर्थ आश्रम १०) अरण्य घरभारी १२) संन्याशी १३) पुरी

या १३ तत्सम जातीपैकी हि गोसावी जमात पूर्णपणे भिन्न आहे. वरील तत्सम १३ जातींचा गोसावी जमातीशी कोणताही संबंध नाही. तसेच १३ तत्सम जातीमध्ये व आमच्या गोसावी जमातीमध्ये रोटी-बेटीचे व्यवहार आजीबात होत नाहीत. त्याचप्रमाणे रुढी-परंपरा, चाली-रिती, संस्कृती ही पूर्णपणे भिन्न आणि वेगळ्या आहेत.

**१०) इतर जाती-धर्माच्या लोकांसोबत असणारे संबंध-**

१. इतर जाती-धर्माच्या लोकांसोबत दूराव्याचे संबंध आहे.

२. अस्पृश्य समाज सुध्दा समर्थनात उभे राहत नाही.

३. कोणत्याही समाजाबरोबर मैत्रीचे संबंध नाही.

४. गावातील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सुध्दा दाद दिली जात नाही.

**११) अस्पृश्यता-**

१. समाजाची राहणीमान गलिच्छ असल्यामुळे तुच्छेतेने पाहिले जाते.

२. सार्वजनिक कार्यक्रमात स्थान दिले जात नाही.

३. गुन्हेगार जमात म्हणून पाहिले जाते.

४. गावाच्या बाहेर माळरानावर / गावापासून विभक्त राहण्यासाठी वस्त्या / वाड्या वसविल्या आहेत. त्यास गावपातळीवर गोसावी वाडा व शहर पातळीवर गोसावी पाल असे म्हणतात.

**१२) जात पंचायत आहे का ? कोणत्या जिल्ह्यांमध्ये जात पंचायत आहे ?**

गोसावी जमातीमध्ये अजून सुध्दा जातपंचायत आस्तित्वात आहे. जात पंचायतीमध्ये महिलांना स्थान व प्रवेश सुध्दा नाही.

**१३) जात पंचायतीची कार्ये / भूमिका-**

१. तंटे / वादविवाद मिटविणे.

२. लग्न ठरविण्यासाठी जात पंचायतमध्ये विचारणा केली जाते.

**१४) महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या योजनांचा लाभ मिळाला आहे ?**

गोसावी समाजातील थोडया फार लोकांनी १) घरकुल व २) शैक्षणिक शिष्यवृत्ती इ. योजनांचा लाभ घेतलेला आहे.

**१५) महाराष्ट्रातील गोसावी समाजाची एकूण लोकसंख्या-**

अंदाजित ५ ते ६ लाख असे उपस्थित प्रतिनिधींनी सांगितले.

**१६) महाराष्ट्रातील गोसावी समाजाची जिल्हा निहाय लोकसंख्या-**

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **जिल्हा निहाय अंदाजित लोकसंख्या** |
|---|---|---|
| १ | सांगली | ३०००० |
| २ | सातारा | ४५००० |
| ३ | कोल्हापूर | ४०००० |
| ४ | पुणे | ६०००० |
| ५ | अहमदनगर | २५००० |
| ६ | रायगड | २५००० |
| ७ | रत्नागिरी | ५००० |
| ८ | सिंधुदुर्ग | ५००० |
| ९ | मुंबई | १०००० |
| १० | नागपूर | २५००० |
| ११ | सोलापूर | ५००० |
| १२ | बीड | ५००० |
| १३ | नांदेड | ५००० |
| **एकुण जिल्हा निहाय अंदाजित लोकसंख्या** | | २८५००० |

**१७) महाराष्ट्रातील गोसावी समाजाची सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या जिल्हयांची नावे-**

सातारा, सांगली, कोल्हापूर व पुणे या जिल्ह्यांमध्ये गोसावी समाज मोठया प्रमाणात आढळून येतो. वरील जिल्ह्यांपैकी सातारा जिल्ह्यांमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या गोसावी समाजाची आहे.

**१८) गोसावी समाजाच्या मुख्य अडचणी व समस्या-**

१. राहण्यासाठी जागेची अडचण.

२. निवाऱ्यासाठी घरकुलाचे अडचण.

३. बेरोजगारी.

४. जातीचे दाखले मिळत नाहीत.

५. उदयोग धंदयासाठी कर्जे मिळत नाहीत.

**१९) जातीचा दाखला मिळण्यात येणाऱ्या अडचणी-**

१. गोसावी जमात सतत भटकंती करत असल्यामुळे जन्म-मृत्युच्या नोंदी उपलब्ध नाही.

२. इ.स. १९६१ पूर्वीची जात पडताळणी कागदपत्रा संबंधित दस्तऐवजाबाबत अट शिथिल करण्यात यावी.

३. जातीचे दाखले मिळविण्यासाठी विशिष्ट शिबीरे आयोजित करण्यात यावे.

**२०) गोसावी समाजाच्या मागण्या-**

१. कायदयाचे संरक्षण मिळावे.

२. मुलभूत गरजा मिळाव्यात.

३. समाजासाठी विशेष निधीची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करावी.

४. भुमीहीनांसाठी वनखात्यातील जमीनी कसण्यासाठी मिळाव्यात.

५. वसंतराव नाईक विकास महामंडळावर गोसावी समाजाच्या एका प्रतिनिधीची नियुक्ती व्हावी.

६. शिक्षणाची तरतूद करण्यात यावी. (वसतिगृह, आश्रमशाळा, निवासी वसतिगृह इ. सोय व्हावी)

७. महाराष्ट्रामध्ये गोसावी समाजासाठी किमान ५ आश्रमशाळा असावी व त्यावर गोसावी समाजाच्या प्रतिनिधींची नियुक्ती करावी.

८. बँक, महामंडळ इ. वित्तीय संस्थांकडून विना तारण कर्ज मिळावे.

९. गोसावी समाजाच्या वस्त्या व तांडे यांना ग्रामपंचाय तीचा / महसुलीचा दर्जा देण्यात यावा.

१०. मासेमारीचा रोजगार उपलब्ध करुन द्यावा तसेच मासेमारीचा परवाना देण्यात यावा.

११. गोसावी समाजाला भटकंतीपासून मुक्तता करुन स्थैर्य प्राप्त करुन देण्यात यावे.

१२. जीवनमान उंचविण्यासाठी विशेष योजना शासन स्तरावर राबविण्यात याव्यात.

१३. शैक्षणिक संस्था सुरु करण्यास शासन स्तरावरुन कार्यवाही व्हावी.

१४. गायरान जमीनीबाबत सिटी सर्व्हे व्हावा.

१५. गोसावी समाजाची जाती निहाय जनगणना व्हावी.

# प्रकरण सातवे

## *निष्कर्ष व शिफारशी*

## निष्कर्ष:

गोसावी समाजाची महाराष्ट्र राज्यातील एकूण लोकसंख्या प्राप्त झाली नसल्याने, गोसावी समाजाचे संशोधन करण्याकरिता पुणे व सांगली या दोन्ही जिल्ह्यात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात एकूण १५८५ कुटुंबाकडून त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती यावरील माहिती गोळा करण्यात आली. प्राप्त माहितीच्या विश्लेषणाअंती खालीलप्रमाणे निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

१) गोसावी समाजात शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. फक्त ४ स्त्रिया व ३४ पुरुष यांनी पदवी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहे. या समाजात स्त्री शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. (५८.६ टक्के)

२) या समाजात नोकरीचे प्रमाण अत्यल्प (०.८ टक्के)आहे. या अभ्यासातून असे निदर्शनास येते कि, गोसावी समाज प्रामुख्याने भंगार गोळा करतात. (३५.८ टक्के) तसेच भिक्षा मागुन व मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात.

३) गोसावी कुटुंबात प्रामुख्याने एकच व्यक्ती (५४.१ टक्के) काम करतात.

४) सदर अभ्यासात १०००० पेक्षा कमी मासिक उत्पन्न असणाऱ्याचे प्रमाण ७३.८ टक्के आढळून आले. यावरून हा समाज आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमकुवत असल्याचे निदर्शनास आले.

५) सर्वेक्षणातील १०० टक्के गोसावी समाज हिंदू आहे.

६) गोसावी समाजातील २५.६ टक्के कुटुंबांना राहण्यासाठी जागा उपलब्ध नाही.

७) ७४.१% गोसावी कुटुंबाची घरे हि कच्ची आहेत.

८) ९८.२ टक्के गोसावी कुटुंबाकडे स्वत:च्या मालकीची जमीन नाही.

९) सदर सर्वेक्षणातील १५८५ कुटुंबापैकी ९७.२ टक्के गोसावी समाजातील कुटुंबांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला नाही. यामध्ये प्रामुख्याने पुणे जिल्ह्याचा समावेश आहे.

१०) या सर्वेक्षणातून असे आढळून येते कि, गोसावी समाजातील बऱ्याच लोकांना शासकीय योजनांची माहिती नाही.

११) गोसावी समाजात ६५.८ टक्के कुटुंबामध्ये व्यसनाधीनचे प्रमाण असल्याचे निदर्शनास आले आहे.

१२) या सर्वेक्षणात असे आढळून आले कि, गोसावी समाजातील २८.९ टक्के कुटुंबांना इतर समाजाकडून भेदभावाची वागणूक मिळाली आहे.

१३) या समाजात जातपंचायत कार्यरत असल्याचे आढळून आले आहे.

१४) गोसावी समाजात अंधश्रध्दा असल्याचे निदर्शनास आले आहे. यामध्ये बाबा-बुवा मानणाऱ्याचे प्रमाण ५४.१ टक्के, जादूटोणा मानणे (३९ टक्के), अंगात येणे (४०.९ टक्के) यांचा समावेश आहे.

१५)४५ टक्के लोकांनी मुलीचे लग्नाचे वय १० ते १८ वर्षे असल्याचे सांगितले यावरून या समाजात बालविवाह होत असल्याचे निदर्शनास आले.

१५) ९२.१ टक्के गोसावी समाजातील कुटुंबांना क्रिमिनल ट्राइब अक्ट १९२४ कायद्याविषयी (Criminal Tribe Act १९२४) माहिती नाही.

❖ **बार्टी येथे आयोजित केलेल्या चर्चासत्रात (लक्ष्य गट चर्चा) गोसावी समाजातील प्रतिनिधी व कार्यकर्ते यांनी दिलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.**

१) गोसावी समाजातील भिक्षा मागणे, भंगार गोळा करणे, खेकडे पकडणे, मासेमारी करणे या व्यवसायांचा स्वीकार केला आहे.

२) गोसावी समाजात शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. त्यामुळे त्यांना नोकरी मिळत नाही.

३) सौदा विकणे (मिरची), आयुर्वेदिक वनौषधी विकणे, शेतमजुरी, अत्तर विकणे, बिगारी काम इ. स्वरूपांची कामे करतात.

४) गोसावी समाज भटकंती करीत असल्यामुळे या समाजाकडे स्वत:ची जमीन नाही. गोसावी समाज भूमिहीन आहे.

५) या चर्चासत्रात गोसावी समाजाचे मासिक उत्पन्न १०,०००रुपये पर्यंत असल्याची माहिती प्राप्त झाली.

६) या समाजाची शैक्षणिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे. १९६१ पूर्वीचा दाखला उपलब्ध नसल्यामुळे या समाजास जातीचा दाखला मिळताना अडचणी येतात. यामुळे या समाजातील मुला/मुलींना शैक्षणिक सवलती मिळत नाहीत.

७) गोसावी समाजात महिलांना दुय्यम स्थान आहे.

८) राहणीमान गलिच्छ असल्याकारणाने इतर समाजासोबत दुरावा आहे. गावाच्या बाहेर माळरानात वस्त्या आहेत. त्यामुळे या समाजात अस्पृश्यता असल्याचे आढळून आले आहे.

९) या समाजात जातपंचायत कार्यरत आहे.

१०) शासकीय योजनांचा लाभ खूप कमी लोकांना मिळाला आहे. याचे मुख्य कारण जातीचा दाखला आहे. कारण हा समाज भटकंती करत असतो त्यामुळे त्यांच्या जन्म मृत्युच्या नोंदी प्राप्त होत नाहीत. त्यामुळे १९६१ पूर्वीचा दाखला उपलब्ध होत नाही.

# शिफारशी

१. गोसावी समाज विमुक्त जमाती या प्रवर्गात येत असल्याने राज्य मागासवर्ग आयोगामार्फत विशेष अभ्यास गट नेमून या समाजाचा विस्तृत अभ्यास/संशोधन होणे आवश्यक आहे. जेणेकरून समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक उन्नतीच्या अनुषंगाने विकास साधण्यास मदत होईल.

२. सदर सर्वेक्षण करताना गोसावी समाजाची जिल्ह्यानिहाय एकूण लोकसंख्या प्राप्त नसल्याने समाजाची वस्तुस्थितीदर्शक सर्वेक्षण करण्यास अनेक बंधने येतात. गोसावी समाजाची महाराष्ट्र राज्यातील एकूण लोकसंख्या प्राप्त झाल्यास समाजाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती योग्य पद्धतीने अभ्यासता येईल. त्यामुळे विमुक्त जमाती या घटकात मोडणाऱ्या समाजाची लोकसंख्येची गणना व आकडेवारी प्राप्त करण्यासाठी शासनस्तरावर योग्य कार्यवाही व्हावी.

३) गोसावी हा समाज महाराष्ट्र राज्यात बहुतांश जिल्ह्यात, कमी —अधिक प्रमाणात आढळून येतो. पुणे व सांगली या दोन जिल्ह्यातील १५८५ कुटुंबे यादृच्छिक पद्धतीने निवडून मुलाखत अनुसूचीद्वारे गोसावी समाजाचे सर्वेक्षण करण्यात आले असून प्राप्त निष्कर्षाच्या आधारे खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात येत आहेत.

**मुलभूत सोयी सुविधा बाबत शिफारशी -:**

गोसावी समाज प्रामुख्याने भटकंती करत असल्यामुळे हा समाज भूमिहीन असल्याचे आढळून येत आहे. तसेच त्यांचे निश्चित वास्तव्य नाही. त्यामुळे मुलभूत सोयी सुविधेपासून हा समाज वंचित आहे. या समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

१. सर्वेक्षणातून असे आढळून आले आहे कि, गोसावी समाजाच्या घरांची स्थिती कच्च्या स्वरुपाची आहे त्यामुळे या समाजास घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी शासन स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

२. वीज, पाणी, सांडपाणी, शौचालय व आरोग्य इ. सारख्या मुलभूत सोयी-सुविधा या समाजातील कुटूंबांना मिळणे गरजेचे आहे. शौचालय व सांडपाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांच्या आरोग्यास हानी पोहण्याची शक्यता आहे, त्यामुळे वीज, रस्ते, पाणी सांडपाण्याची सुविधा, शौचालय इ. गोसावी समाजाच्या वस्त्यांना प्राधान्याने उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी पंचायत राज संस्थांनी (ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद) संबंधित क्षेत्रात अशा योजना राबविण्याबाबत शासनस्तरावरून कार्यवाही करावी.

**शैक्षणिक क्षेत्रातील शिफारशी**

ग्रामीण भागातील गोसावी समाजात सतत भटकंती, यामुळे शाळा गळतीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. शिक्षणाशिवाय हा समाज प्रगती करू शकणार नाही. त्यासाठी शैक्षणिक क्षेत्रामध्ये अंमलबजावणी करण्यायोग्य शिफारशी खालील प्रमाणे करण्यात येत आहेत.

१. गोसावी समाजाच्या वस्तीमध्ये शैक्षणिक वाचनालये, अंगणवाड्या स्थापनेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
२. शाळा गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी गोसावी समाजातील सर्व विद्यार्थी व त्यांच्या पालकांमध्ये जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. या समाजातील मुला/मुलींना मोफत शासकीय वसतिगृह प्रवेश, शैक्षणिक शुल्क सवलत, मोफत प्रवेश इत्यादी सवलती मिळण्यासाठी शासन स्तरावरून कार्यवाही व्हावी.
३. दहावीच्या पुढे शिक्षणामध्ये तांत्रिक शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन आय.टी.आय. किंवा इतर व्यवसाय प्रशिक्षण माध्यमातून व्यवसायाभिमुख शिक्षण देणेबाबत शासनाने उचित असा निर्णय घ्यावा जेणेकरुन ते भविष्यात चांगला रोजगार मिळवू शकतील किंवा स्वत: नोकरी, धंदा सुरु करू शकतील.
४. उच्च शिक्षणासाठी जनजागृती, वैद्यकीय, अभियांत्रिकी, माहिती व तंत्रज्ञान, तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच स्पर्धा परीक्षा यासाठी मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजित करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**आर्थिक क्षेत्रातील शिफारशी**

गोसावी समाजात प्रामुख्याने भिक मागणे, भंगार गोळा करणे, अशी अत्यंत हलक्या स्वरूपाची कामे केली जात असल्याचे सर्वेक्षणातून आढळून आले आहे, सदर समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात येत आहेत.

१. भटक्या विमुक्त जमातीसाठी कार्यरत असलेल्या महामंडळामार्फत गोसावी समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्याबाबत शासन स्तरावर योग्य ती कार्यवाही व्हावी.

२. स्वयंरोजगार वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत कौशल्य विकास, जिल्हा उदयोजकता केंद्र व इतर माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
३. खाजगी व शासकीय नोकरीच्या संधी गोसावी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी जनजागृती पर कार्यक्रम, शिबिरे, कार्यशाळा, राबवून चांगल्या दर्जाच्या कामाच्या संधी उपलब्ध करवून देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**महिला सक्षमीकरण :**

सदर सर्वेक्षणातून असे आढळून आले कि, या समाजात महिलांना दुय्यम स्थान आहे. यासाठी या समाजातील महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी खालील शिफारशी करण्यात येत आहे.

१. गोसावी समाजातील महिला शिक्षण व मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढण्यासाठी समाजात जागरूकता निर्माण करण्याबाबत शासन स्तरावरून कार्यवाही व्हावी.
२. महिला सक्षमीकरणाकरिता शासन स्तरावर राबविण्यात येणारे स्वयंसहाय्यता बचत गट वस्त्यांमध्ये प्रभावीपणे राबविण्यासाठी (बचत गटाकरिता व महिलांना व्यवसाय-उद्योग) उभा करण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे, विविध प्रशिक्षणाचा फायदा घेऊन घरगुती व्यवसाय सुरु करण्याकरिता अल्प दरात कर्ज उपलब्ध करून देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
३. शिक्षण, स्वच्छता या सर्व बाबतीत राहणीमानाचा दर्जा, आरोग्य, महिलांचा दृष्टिकोन विकसित होण्याकरिता महिलांविषयक शासकीय योजना कायदे याबाबत महिलांना माहिती देणेबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
४. या समाजात बालविवाहाचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. तरी समाजात होणाऱ्या बालविवाहावर बंदी आणण्यासाठी शासन व स्वयंसेवी संस्थामार्फत जनजागृतीपर कार्यक्रम, शिबिरे राबविण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**सामाजिक क्षेत्रातील शिफारशी**

१. या समाजात व्यसनाधिनता व अंधश्रद्धा असल्याचे सर्वेक्षणातून आढळून आलेले आहे. त्यामुळे व्यसनमुक्ती व अंधश्रद्धा निर्मुलनासाठी जनजागृती पर कार्यक्रम, शिबिरे, कार्यशाळा राबविण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

# संदर्भसूची


१. श्री. अभय टिळक (जानेवारी १९९९) महाराष्ट्रातील भटके व विमुक्तांची सामाजिक आर्थिक पाहणी.

२. श्री. रामनाथ चव्हाण (५ मार्च २००२) भटक्या विमुक्तांची जातपंचायत: देशमुख कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., ४७३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

३. डॉ. नारायण भोसले (११ नोव्हेंबर २००८) भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत परंपरा आणि संघर्ष

४. श्री. रामनाथ चव्हाण ( जानेवारी २०१३) भटक्या विमुक्तांचे अंतरंग: सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

५. श्री.भी.रा.इदाते (जानेवारी १९९९) विमुक्त जाती व भटक्या जाती अभ्यास संशोधन समिती : समाजकल्याण, महाराष्ट्र शासन.

६. श्री. पृथ्वी हरीगीर गोस्वामी (०१/०२/२०१५) गोसावी व त्यांचा संप्रदाय.

७. श्री. उत्तम कांबळे (०१ ऑक्टोंबर २०१०) भटक्यांचे लग्न:अरविंद घनश्याम पाटकर, मनोविकास प्रकाशन, प्लॅट नं. ३ ए, ४ था मजला, शक्ती टॉवर, ६७२ नारायण पेठ, पुणे ४११०३०.

८. श्री. अजितकुमार भीमराव पाटील " राजर्षी शाहू विद्यामंदिराच्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा त्यांच्या अध्ययनावर होणारा परिणाम एक अभ्यास."

९. श्री. रामनाथ चव्हाण (२००६) भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड-३: देशमुख कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., ४७३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

१०. श्री. रामनाथ चव्हाण (२००८) भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड-४: देशमुख कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., ४७३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

११. श्री. शंकर खरात (सन २००३) भटक्या –विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न सुगावा प्रकाशन, ५६२, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

१२. श्री. रामनाथ चव्हाण " विमुक्त जाती व भटक्या जमातीचा सामाजिक, आर्थिक, आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास: संदर्भ मराठवाडा व विदर्भ: संशोधन प्रबंध."

१३. श्री. रामनाथ चव्हाण (१९८९) भटक्या –विमुक्तांचे अंतरंग : सुगावा प्रकाशन, पुणे.

१४. डॉ. अत्रोळीकर समिती अहवाल (१९५०) Government of Bombay Report of the Ex-Criminal Tribes Rehabilitation Committee.

१५. सेंटर ऑफ स्टडीज इन सोशल सायन्सिस (१९९९) महाराष्ट्रातील भटके व विमुक्तांची सामाजिक - आर्थिक पाहणी : भटके विमुक्त अभ्यास समिती, महाराष्ट्र शासन यांस सादर.

१६. थाडे समिती अहवाल (१९६१).

१७. काकेलकर समिती अहवाल (१९५५).

१८. गोसावी समाजाच्या लोकांनी बार्टी कार्यालयाला सादर केलेला माहितीपट (Documentary).

१९. Idate B.R.२०१७, National commission for denitrified Nomadic and Semi Nomadic Tribes, Government of India, New Delhi.

२०. Mandal B.P. १९८०, Report on Backward Classes Commission, Government of India, New Delhi, Vol.१.

२१. Department of Social Security, १९६५, The Report of the Advisory Committee on the Revision of the Lists of Scheduled Castes and Scheduled Tribes (Lokur Committee Report), Government of India, New Delhi

२२. श्री. एल.चव्हाण, २०१९ शोकांतिका गोसावी जमातीची, निखील प्रकाशन, कोल्हापूर.

## परिशिष्ट: १

दिनांक : / / २०१८

*(फक्त संशोधन हेतूसाठी, गोपनीय)* *मुलाखत अनुसूची क्रमांक:* [ ]

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

## गोसावी समाजाच्या सामाजिक - आर्थिक परिस्थितीचा अभ्यास प्रश्नावली

## मुलाखत अनुसूची

वस्ती ................................गावाचे नाव............................ तालुका.......................... जिल्हा .................................

उत्तरदात्याचे नाव : ------------------------------------------------------------ मोबाईल क्र. ----------------------------------

| **अनु. क्र.** | **प्रश्न** | **संकेतांक** |
|---|---|---|
| १. | वय: | |
| २. | लिंग:१.स्त्री<br>२. पुरुष<br>३.तृतीय पंथी | |
| ३. | वैवाहिक स्थिती :<br>१. विवाहित<br>२. अविवाहित<br>३. घटस्फोटित<br>४. विधवा<br>५. परित्यक्ता<br>६. विधूर | |
| ४. | धर्म : | |
| ५. | जात : | |
| ६. | पोटजात : | |
| ७. | शिक्षण<br>१. प्राथमिक<br>२. माध्यमिक<br>३. उच्च माध्यमिक<br>४. पदवीधर<br>५. पदव्युत्तर<br>६. उच्च शिक्षित<br>७. अशिक्षित | |
| ८. | कुटुंबाची बोलीभाषा: | |
| ९. | कुटुंबाचा व्यवसाय:<br>१. शेती<br>२. शेत मजूरी | |

| | | |
|---|---|---|
| | ३. जनावरे पाळणे/राखायला घेणे<br>४. खाजगी नोकरी<br>५. सरकारी नोकरी<br>६. व्यवसाय<br>७. मासेमारी<br>८. शिकार करणे<br>९. भंगार गोळा करणे<br>१०. बादली दुरुस्ती करणे<br>११. भिक्षा मागणे<br>१२. इतर (नमूद करा) | |
| १०. | तुमच्या कुटुंबातील कमवत्या व्यक्तींची संख्या | |
| ११. | कुटुंबातील सर्व कमवत्या व्यक्तींचे एकत्रित मासिक उत्पन्न (रु.)<br>१. ५००० रु. पेक्षा कमी<br>२. ५००० रु. ते १०००० रु.<br>३. १०००० रु. ते १५००० रु.<br>४. १५००० रु. ते २०००० रु.<br>५. २०००० रु. ते पेक्षा जास्त<br>६. प्रतिक्रिया नाही | |
| १२. | कुटुंबातील किती सदस्य बाहेरगावी रोजगारासाठी स्थलांतर करतात? (संख्या लिहा.)<br>(नसल्यास लागू नाही असे लिहा.) | |
| १३. | जर स्थलांतर करत असतील तर वर्षातून किती महिने? | |

**कुटुंब तक्ता**

| अ नु क्र | **कुटुंबातील व्यक्तींची नावे** (कुटुंब प्रमुखाचे नाव प्रथम लिहावे) | **वय** | **लिंग** | **वैवाहीक स्थिती** | **शिक्षण** | **शिक्षणातून कोणत्या इयत्तेमध्ये गळती झाली** | **गळतीचे कारण** (शिक्षण चालू असल्यास NA लिहावे) | **व्यवसाय** (शिक्षण चालू असल्यास NA लिहावे) | **बेरोजगार** (होय/ नाही) | **कुटुंब प्रमुखाशी नाते** | **जात प्रमाण पत्र आहे का?** (होय/ नाही) | **असल्यास जात प्रमाण पत्रावरील जात** | **आधार कार्ड** (होय/ नाही ) | **मतदानकार्ड (होय/ नाही )** (१८ वर्षाखालील व्यक्तींना NA लिहावे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | | | | | | |
| ४. | | | | | | | | | | | | | | |
| ५. | | | | | | | | | | | | | | |
| ६. | | | | | | | | | | | | | | |
| ७. | | | | | | | | | | | | | | |
| ८. | | | | | | | | | | | | | | |
| ९. | | | | | | | | | | | | | | |
| १०. | | | | | | | | | | | | | | |

**संकेतांक: लिंग:** स्त्री-१, पुरुष-२, तृतीयपंथी- ३,**वैवाहीक स्थिती :** विवाहित-१, अविवाहित-२, घटस्फोटित-३, विधवा-४, परित्यक्ता-५, विधूर-६,**शिक्षण:** प्राथमिक-१, माध्यमिक-२, उच्च माध्यमिक-३, पदवीधर-४ , पदव्युत्तर-५, उच्च शिक्षित -६ , अशिक्षित-७ (उच्च शिक्षित असल्यास त्यांची पदवी नमूद करावी.) **व्यवसाय:**शेती-१, शेत मजुरी-२, जनावरे पाळणे/राखायला घेणे-३, खाजगी नोकरी-४, सरकारी नोकरी-५, सरकारी व्यवसाय-६, मासेमारी-७, शिकार करणे-८, भंगार गोळा करणे-९, बादली दुरुस्ती करणे-१०, भिक्षा मागणे-११, इतर (नमूद करा)-१२

**गळतीचे कारण थोडक्यात नमूद करावे.**

(टीप: कुटुंबामध्ये १० पेक्षा जास्त सदस्य असल्यास त्यांची स्वतंत्र पानांवर माहिती लिहून ती या अनुसुचीस जोडावी.)

| | | |
|---|---|---|
| १४. | कुटुंबाचा प्रकार:<br>१. विभक्त कुटुंब<br>२. एकत्रित कुटुंब<br>३. विस्तारित कुटुंब | |
| १५. | घराची मालकी :<br>१. स्वत:चे<br>२. भाड्याचे<br>३. अतिक्रमित | |
| १६. | तुमच्या कुटुंबाला राहण्यासाठी जागा आहे का?<br>१. होय २. नाही | |
| १७. | गायरान जमिन आहे का?<br>१. होय २. नाही | |
| १८. | तुमचे घर कसे आहे?<br>१. पक्के<br>२. कच्चे | |
| १९. | घराचा प्रकार<br>१. झोपडी<br>२. कुडाचे कौलारू<br>३. दगड, विटा, कौलारू<br>४. दगड विटा पत्र्याचे<br>५. सिमेंट कॉन्क्रीट<br>६. इतर | |
| २०. | तुमच्या घरात किती खोल्या आहेत?<br>१. एक<br>२. दोन<br>३. तीन<br>४. चार<br>५. चार पेक्षा जास्त | |
| २१. | घराचे क्षेत्रफळ (चौ.फुटात) | |
| २२. | तुमच्या मालकीची जमीन आहे का?<br>१. होय २. नाही | |
| २३. | असल्यास कोणत्या प्रकारची<br>१. जिरायत २. बागायत 3. जिरायत व बागायत दोन्ही ४. लागू नाही | |
| २४. | असल्यास किती एकर ? | |
| २५. | (प्रश्न. क्र. २२ चे उत्तर होय असल्यास)<br>तुम्ही तुमच्या मालकीची जमीन कसता का?<br>१. होय २. नाही 3. लागू नाही | |
| २६. | कसत नसल्यास, जमीन न कसण्याची कारणे सांगा.<br>१. जमीन कमी असल्याने<br>२. कुटुंबात अपुरे मनुष्यबळ असल्याने<br>३. अपुरे भांडवल असल्याने<br>४. अपुरे शेती अवजारे व पशुधन<br>५. निकुष्ट प्रतीची जमीन<br>६. इतर कारणांमुळे<br>७. लागू नाही | |

| | | |
|---|---|---|
| २७. | तुम्ही इतरांची जमीन खंडाने/ अर्धालीने कसण्यास घेता का?<br>१. होय २. नाही | |
| २८. | होय असल्यास किती एकर ? | |
| २९. | होय असल्यास जमिनीचा प्रकार सांगा.<br>१. जिरायत २. बागायत 3. जिरायत व बागायत दोन्ही ४. लागू नाही | |
| ३०. | तुमच्या कुटुंबाचा मुलभूत गरजांवर प्रती महिना किती खर्च होतो?(अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण,आरोग्य)<br>१. रु.२५००पेक्षा कमी<br>२. रु. २५०० तेरु. ५०००<br>३. रु.५००० ते रु.१०,०००<br>४. १०,००० रु. पेक्षा जास्त | |
| ३१. | तुमच्या कुटुंबाचा उपभोग्य गरजांवर प्रती महिना किती खर्च होतो? (उदा. करमणूकखर्च,टीव्ही.फोन, वाहन, मोबाईल खरेदी, फिरायला जाणे )<br>१. रु. ५००० पेक्षा कमी<br>२. रु.५००० रु. ते रु.१०,०००<br>३. रु.१०,०००पेक्षा जास्त | |
| ३२. | तुमच्या कुटुंबाने कर्ज घेतले आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ३३. | होय असल्यास कोणाकडून ?<br>१. बँक/ पतसंस्था<br>२. सावकार<br>३. मित्र/नातेवाईक<br>४. बचत गट<br>५. इतर(नमूद करा) | |
| ३४. | कर्ज घेतले असल्यास कोणत्या कारणासाठी कर्ज घेतले आहे?<br>१. उदरनिर्वाहासाठी<br>२. मुलांच्या शिक्षणासाठी<br>३. लग्न कार्यासाठी<br>४. देव धर्म/पूजा/नवस<br>५. शेती/उद्योग धंद्यासाठी<br>६. आजारपणात उपचारांसाठी<br>७. इतर कारण (नमूद करा ) | |
| ३५. | तुमचे पूर्वज कोणता व्यवसाय करीत होते? योग्य पर्यायासमोर ✓ अशी खूण करा. | |

| | |
|---|---|
| १. शेती | |
| २. शेत मजूरी | |
| ३. जनावरे पाळणे/राखायला घेणे | |
| ४. खाजगी नोकरी | |
| ५. सरकारी नोकरी | |
| ६. व्यवसाय | |
| ७. मासेमारी | |
| ८. शिकार करणे | |
| ९. भंगार गोळा करणे | |
| १०. बादली दुरुस्ती करणे | |
| ११. भिक्षा मागणे | |
| १२. इतर (नमूद करा) | |

| | | |
|---|---|---|
| ३६. | अजूनही तुम्ही भिक्षा मागणे हा पारंपारिक व्यवसाय करत आहात का?<br>१. होय २. नाही | |
| ३७. | तुम्ही सदर निवासस्थानी स्थलांतरित झाले आहात का?<br>१. होय २. नाही | |

| | | |
|---|---|---|
| ३८. | होय असल्यास, स्थलांतराचे कारण सांगा. | |
| ३९. | तुमचे कुटूंब स्थायिक झाले असल्यास, किती वर्षापूर्वी स्थायिक झाले आहे?<br>१. ३० वर्षापूर्वी<br>२. ३० ते ६० वर्षापूर्वी<br>३. ६० वर्षापेक्षा जास्त<br>४. लागू नाही<br>५. माहित नाही | |
| ४०. | बाळ जन्मल्यानंतर तुम्ही पाचवी बारावी व इतर कोणतीही विधी करता का?<br>१. होय २.नाही | |
| ४१. | बाळाच्या जन्माआधी काही विधी केले जातात का?<br>१. होय २. नाही | |
| ४२. | होय असल्यास कोणते ? | |
| ४३. | मुलींना प्रथम मासिक पाळी आल्यावर धार्मिक विधी केला जातो का?<br>१. होय २. नाही | |
| ४४. | लग्न विधी किती दिवस चालतो? | |
| ४५. | लग्न विधी दरम्यान कोणकोणते सांस्कृतिक कार्यक्रम करता? | |

| | | |
|---|---|---|
| ४६. | तुमच्या कुटुंबात आंतरजातीय विवाह केला आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ४७. | होय असल्यास विरोध झाला आहे का? | |
| ४८. | तुमच्या समाजात घटस्फोटीत/ विधवा महिला पुन्हा विवाह करू शकते का?<br>१. होय २. नाही | |
| ४९. | महिलांना घटस्फोटा नंतर पोटगी मिळते का?<br>१. होय २. नाही | |
| ५०. | मृत शरीराला कोणत्या पद्धतीने अंत्य संस्कार केले जातात?<br>१. पुरणे<br>२.जाळणे | |
| ५१. | व्यक्ती मृत झाल्यावर दशक्रिया विधी कोणत्या दिवशी केला जातो<br>१.तिसऱ्या<br>२.सातव्या<br>३.दहाव्या<br>४.बारावा<br>५.तेराव्या | |
| ५२. | तुम्ही मांसाहार करता का? | |

| | | |
|---|---|---|
| | १. होय २. नाही | |
| ५३. | करत असल्यास कोणते मांस खाता? योग्य पर्यासमोर ✓ अशी खूण करा.<br>१. मटन (मेंढी, बकरी)<br>२. चिकन (कोंबडी)<br>३ .पोर्क (डुक्कर)<br>४. मासे, खेकडे ई.<br>५. इतर (नमूद करा) | |
| ५४. | तुमच्या कुटुंबात कोणी व्यसन करतात का?<br>१. होय २. नाही | |
| ५५. | तुमचे कुटुंबाचे प्रमुख कुलदैवत कोणते आहे? | |
| ५६. | तुमच्या समाजाचे कुलदैवत व स्थान कोणते? | |
| ५७. | इतर समाजातील लोकांच्या समारंभात तुम्ही सहभागी होता का? (लग्न, भोजन वगैरे)<br>१. होय २. नाही | |
| ५८. | नसल्यास त्यामागील कारणे सांगा? | |

| | | |
|---|---|---|
| ५९. | इतर समाजाची लोक तुमच्या समाजाच्या समारंभात सहभागी होतात का? (लग्न, भोजन वगैरे)<br>१. होय २. नाही | |
| ६०. | नसल्यास त्यामागील कारणे सांगा. | |
| ६१. | तुम्हाला इतर समाजातील लोकांकडून कशी वागणूक मिळते?<br>१. समानतेची<br>२. भेदभावाची | |
| ६२. | तुम्हाला समुहाने राहावे लागते का?<br>१. होय २. नाही | |
| ६३. | तुमच्या समाजात हुंडा देण्याची/घेण्याची पद्धत आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ६४. | होय असल्यास हुंडा कोणाला मिळतो?<br>१.मुलगी २.मुलगा | |
| ६५. | तुमच्या कुटुंबात इतर जातींशी रोटी व्यवहार होतो का?<br>१. होय २. नाही | |
| ६६. | तुमच्या समाजात जात पंचायत आहे का?<br>१. होय २. नाही | |
| ६७. | होय असल्यास, जात पंचायतीचे नाव सांगा. | |
| ६८. | होय, असल्यास जात पंचायतीकडून कोणत्या समस्या सोडविल्या जातात? | |

| | | |
|---|---|---|
| | १. कौटुंबिक तंटा<br>२. इतर तंटा निवारण<br>३. विवाह संबधित<br>४. स्त्रियांवरील अत्याचार<br>५. इतर (नमूद करा) | |
| ६९. | जात पंचायतीकडून दिलेल्या शिक्षेचे स्वरूप काय असते?<br>१. वाळीत टाकणे<br>२. दंड<br>३. शारीरिक शिक्षा<br>४. समज देणे<br>५. दंड व वाळीत टाकणे दोन्ही<br>६. माहित नाही | |
| ७०. | आपणास गोसावी जातीसाठी असणा-या शासकीय योजना माहित आहेत का?<br>१. होय २. नाही | |
| ७१. | होय असल्यास शासकीय योजनेचे नाव सांगा? (माहित नसल्यास माहित नाही असे लिहावे) | |
| ७२. | कोणत्या कारणासाठी या योजनांचा लाभ तुम्ही घेतला आहे?<br>१. रोजगार व उपजीविका<br>२. शिक्षण<br>३. प्रशिक्षण<br>४. घरकुल<br>५. कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नाही<br>६. इतर (नमूद करा) | |
| ७३. | कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नसल्यास | |

| | | |
|---|---|---|
| | त्याचे प्रमुख कारण:<br>१. योजनांची माहिती नव्हती<br>२. कागदपत्रांची पूर्तता करण्यास असमर्थता<br>३. अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून उदासीनता<br>४. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम न भरता येणे<br>५. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता नसणे<br>६. योजनेचा लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई<br>७. इतर (उदा. स्पर्धा, बहिष्कार इ.)<br>लागू नाही | |
| ७४. | तुमच्या समाजाच्या संघटना आहेत का?<br>१. होय २. नाही | |
| ७५. | होय असल्यास संघटनेचे नाव सांगा. | |
| ७६. | तुम्हाला त्यांची कोणती मदत होते?<br>१. जातीचे प्रमाणपत्र मिळवून देणे<br>२. शासकीय योजना लोकांपर्यंत पोहचवणे<br>३. लोक प्रबोधन करणे<br>४. शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी प्रयत्न<br>५. कोणतीही मदत नाही | |
| ७७. | या संघटना मदतीसाठी तुमच्या कडून | |

| | | |
|---|---|---|
| | कोणती मागणी करतात?<br>१. लोक वर्गणी<br>२. वस्तू स्वरूपात मागणी<br>३. कोणतीही मागणी नाही | |
| ७८. | तुमच्या कुटुंबात बाबा-बुवा यांना मानतात का?<br>१. होय २. नाही | |
| ७९. | कुटुंबामध्ये धार्मिक विधी पूर्ण करण्यासाठी कोंबडा, बकरी इ. बळी दिल्या जातात का?<br>१. होय २. नाही | |
| ८०. | तुमच्या कुटुंबात पत्रिका जुळवून विवाह करतात का?<br>१. होय २. नाही | |
| ८१. | तुम्ही जादूटोणा मानतात का?<br>१. होय २. नाही | |
| ८२. | तुमच्यावर कुणी जादूटोणा केला आहे का ?<br>१. होय २. नाही | |
| ८३. | तुमच्या कुटुंबात कोणाच्या अंगात येते का?<br>१. होय २. नाही | |
| ८४. | तुमच्या कुटुंबात बायकांना मासिक पाळी आली असता बाजूला बसवतात का?<br>१. होय २. नाही | |
| ८५. | तुमच्या कुटुंबात बायकांना जटा असतात का? | |

| | | |
|---|---|---|
| | १. होय २. नाही | |
| ८६. | तुमच्या कुटुंबात मुलींचे लग्न कोणत्या वयात करतात?<br>१. १० वर्षापेक्षा कमी<br>२. १० वर्ष ते १८ वर्ष<br>३. १८ वर्षापेक्षा जास्त | |
| ८७. | तुमच्या कुटुंबात कोणी भिक्षा मागतात का?<br>१. होय २. नाही | |
| ८८. | तुमच्या कुटुंबात महिला बाळंत झाल्यावर कुटुंबात<br>विटाळ मानतात का?<br>१. होय २. नाही | |
| ८९. | तुमच्या कुटुंबात मूल जन्माच्या ५ व्या दिवशी सटवाईचे पूजा करता का?<br>१. होय २. नाही | |
| ९०. | कुटुंबात कोणी आजारी पडल्यास तुम्ही कोणाकडे उपचार करता?<br>१. घरगुती उपचार<br>२. भगत<br>३. पारंपारिक वैद्य<br>४. दवाखाना | |
| ९१. | कुटुंबात कोणाला खालीलपैकी दीर्घकालीन आजार आहेत का?<br>[क्षयरोग,कर्करोग (कॅन्सर), हत्तीरोग, कुष्ठरोग, गलगंड, दमा (अस्थमा), मधुमेह, हृदयरोग, इ.]<br>१. होय २. नाही | |
| ९२. | गोवर निघाल्यास तुम्ही गोवर पाळता का? | |

| | | |
|---|---|---|
| | १ .होय २. नाही | |
| ९३. | तुमच्या समाजावर इतर समाजाची दहशत आहे का?<br>१ .होय २. नाही | |
| ९४. | होय असल्यास कोणत्या समाजाची दहशत आहे? | |
| ९५. | क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ कायद्या विषयी तुम्हाला माहिती आहे का?<br>१ .होय २. नाही | |
| ९६. | होय असल्यास पूर्वी क्रिमिनल ट्राइब ॲक्ट १९२४ च्या अंतर्गत तुमच्या वर गुन्हा दाखल केला जात होता का?<br>१ .होय २. नाही | |
| ९७. | तुमच्या समाजाची कुठली यात्रा आहे का ज्यामध्ये गोसावी समाज बांधव सांस्कृतिक कार्यक्रमानिमित एकत्र येतात ?<br>१. होय २. नाही | |
| ९८. | होय असल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे नाव सांगा ? | |

| | |
|---|---|
| ९९. | तुम्ही कोणकोणते सण साजरे करता? |
| १००. | तुमच्या कुटुंबाला भेडसावणाऱ्या अडचणींचा/समस्यांवर काय उपाययोजना असावी असे तुम्हाला वाटते?<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ |
| १०१. | इतर जातींच्या समाजाकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ |
| १०२. | शासनाकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ |
| १०३. | गोसावी समाजाच्या संस्था,संघटनांकडून काय मदत व्हावी असे तुम्हाला वाटते?<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ |

| | |
|---|---|
| | ------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ |
| १०४. | तुम्हाला तुमचे काही अनुभव सांगावयाचे असल्यास सांगा.<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ |

**समतादुताचे नाव सही :-**

**समतादुताचे निरीक्षण :-**

समतादुतांनी कुटुंबाबतची त्यांची निरीक्षणे व इतर महत्वाची माहिती या पानावर लिहावी

## **महाराष्ट्रातील मागासवर्गीयांची यादी**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा ) कायदा १९७६

(१९७६ चा १०८ वा ) मधील परिशिष्ट १ मधील भाग-१० मध्ये नमूद केल्याप्रमाणे

अनुसूचित जाती (आरक्षण १३ %)

| | |
|---|---|
| 1)अगेर | 25)हलसार, हसलार, हुलसवार, हलसवार |
| 2)अनमुक | 26)होलार, व्हल्हार |
| 3)आरेमाला | 27)होलय, होलेर, होलेया, होलीया |
| 4)आरवामाला | 28)कैकाडी, |
| 5)बहाना, बहना | 29)कटिया, पथरिया |
| 6)बाकड, बंट | 30)खंगार, कनेरा, मिरधा |
| 7)बलाही, बलाई | 31)खाटिक, चिकवा, चिकवी |
| 8)बसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी, बसोड | 32)कोलुपूलवंद्ळू |
| 9)बेडा जंगन, बुडगा जंगम | 33)कोरी |
| 10)बेडर | 34)लिंगडेर |
| 11) भांबी, भांभी, असादारू, असोदी, चामडिया, चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळय्या, हराळी, खालपा, माचीगर, मोचीगर, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाटी मोची, राणीगर, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित, समगार, समागारा, सतनामी, सूरज्यबंशी, सूरज्यरामनामी, चर्मकार, परदेशी चमार, | 35)मादगी |
| 12)भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मिकी, कोरार, झाड्मल्ली, हेला. | 36)मादिगा |
| 13)बिंदला | 37)महार, मेहरा, तराळ, धेगु मेगु (नव बुद्धी) |
| 14)ब्यागारा | 38) माह्यवशी, धेड, वणकर, मारू वणकर, |
| 15)चलवादी, चन्नय्या | 39)माला |
| 16) चेन्नदासर, होलाया दासर, होलेया दासरी | 40)माला दासरी |
| 17)डक्कल, डोक्कलवार | 41)माला हन्नाई |

| | |
|---|---|
| 18)ढोर, कक्कय्या, कंकय्या, डोहोर | 42)मालाजंगम |
| 19)डोम, दुमार | 43)माला मस्ती |
| 20)येल्लमलवार, येल्लमलवंडलू | 44)माला साले, नेटकानी |
| 21)गंडा, गंडी | 45)माला संन्यासी |
| 22)गरोडा, गारो | 46) मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी मांग, मांग महशी, मदारी, गारुडी, राधे मांग, |
| 23)घासी, घासिया | 47)मांग गारोडी, मांग गारुडी |
| 24)हल्लीर | 48)मन्ने |
| 49)मशती | 55)सांसी |
| 50)मेघवाल, मेंघवर | 56)शेणवा, चेणवा, सेडमा, रावत |
| 51)मिठा अय्यलवार | 57)सिंधोल्लू, चिंदोल्लू |
| 52)मुक्री | 58)तिरगार, तिरबंदा, |
| 53)नाडीया, हादी | 59)तुरी |
| 54)पासी | |